# ।श्री दत्त विचार शलाका।

१००

जन्मशताब्दी वर्ष

प.पू. दत्तमहाराज कवीश्वर

॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ॥

# श्री दत्त विचार शलाका

१०० जन्मशताब्दी वर्ष

## प.पू. दत्तमहाराज कवीश्वर महाराज

- संपादन -

श्री. प्रकाश चं. पणशीकर

सौ. माधुरी प्र. पणशीकर

**सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन**

**प्रकाशन दिवस -**
श्रीदत्त जयंती (मार्गशीर्ष शु. १४ शके १९३१)
मंगळवार, दि. १ डिसेंबर २००९

**मुखपृष्ठ**
सुरेंद्र शिंदे

**मुद्रक -**
रमा एन्टरप्रायझेस
३९ स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव, मुंबई - ४००००४
दूरध्वनी : २३८५ २८४६
भ्रमणध्वनी : ९३२३२९१०३४

**प्रकाशक -**
श्री दत्त आश्रम संस्थान
प. पू. श्री दत्त महाराज कवीश्वर मार्ग,
सद्गुरु नगर, प्रशांती नगर समोर,
जालना - ४३१ २०३.
दूरध्वनी : ०२४८२ २३६८०५

॥श्री॥


卐 **प.पू.दत्तमहाराज कवीश्वर यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष आहे.** 卐

त्यांच्या प्रवचनातील १०० उताऱ्यांचे हे पुस्तक आम्ही साधकभक्तांच्या चिंतनासाठी समोर ठेवत आहोत.

रोजच्या धावपळीच्या जीवनात श्वास घ्यायलाही वेळ नसतो मग वाचायला कुठून मिळणार? तेव्हा एखादा छोटा अर्थगर्भ परिच्छेद वाचला तर दिवसभर त्यातल्या विचारांचे, सिद्धान्ताचे चिंतन नकळत आपले मन करेल आणि उच्च अशा आध्यात्मिक मुल्यांच्या प्रदेशात प.पू.महाराजांचे बोट धरून काही काळ विहार करेल ह्या हेतुने प्रस्तुत पुस्तकाची निर्मिती झाली आहे.

ही सेवा विश्वात्मक देवाच्या चरणी अर्पण !

।।श्रीगुरु:शरणम्।।



## प.पू. दत्तमहाराज कवीश्वर

भरोनि सद्भावाची अंजुळी । मियां वोवियाफुलें मोकळी ।
अर्पिली अंघ्रियुगुलीं । विश्वरुपाच्या ।

।।श्रीगुरु:शरणम्।।



# प. पू. ताईमहाराज चाटुफळे

ते कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्ती शोभा ।
जे विश्वबीजाचिया कोंभा । साउली केली ।।

श्री सच्चिदानंदरूपी परमात्मा तोच गुरुरूपी आहे. गुरुस्वरूप हे त्याचंच आहे. एक मार्गदर्शक आहे, एक नियामक आहे. ईश्वरस्वरूप आणि गुरुस्वरूप हे त्याच परमात्म्याचं रूप आहे. ईश्वरस्वरूप हे नियामक आहे. नियामक होण्याला इच्छाशक्ती परमेश्वराची मोठी आहे - ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती आणि इच्छाशक्ती! श्रीगुरु याचा अर्थ तोच आहे. श्री म्हणजे सर्वप्रकारची शक्ती. सर्वप्रकारचं ऐश्वर्य त्यांच्याजवळ आहे. तर ही इच्छाशक्ती जरी असली तरी जीवांचं नियमन जे ईश्वराकडून केलं जातं ते नियमन केवळ त्याच्या इच्छेने होत नाही. जीवांची कर्मं जी आहेत, ती सर्व कर्मं पाहून नियमन केलं जातं. म्हणून कोणताही दोष ईश्वराच्या ठिकाणी नाही. न्यायाधीश जो शिक्षा करतो, ती, तो रागद्वेषादी विकारी होऊन करत नाही. जो अपराधी आहे त्याचा अपराध बरोबर प्रमाणसिद्ध झाला म्हणजे त्याला तो शिक्षा करतो. तो अलिप्त असतो. त्याचप्रमाणे ईश्वर नियामक आहे याचा अर्थ तो व्यवस्थापक म्हणून आहे. निर्माणही तोच करतो, व्यवस्थाही तोच करतो आणि संहारही तोच करतो. हे सर्व कार्य चालू आहे. तेव्हा ज्ञानशक्ती केवढी मोठी आहे, क्रियाशक्ती केवढी आहे, इच्छाशक्ती केवढी आहे ! तर अशा रूपाने तो सच्चिदानंदघन परमात्मा आहे. 'सत्'म्हणजे त्रिकालाबाधित आहे. कालमर्यादा त्याला काही करू शकत नाही. तो सत् म्हणजे त्याचं नेहमी अस्तित्व आहे. जन्मानंतर मृत्यू, मृत्यूनंतर जन्म अशी परंपरा ईश्वराला नाही. त्याला जन्मही नाही आणि मृत्यूही नाही, तो कालत्रयातीत असल्याचं हे उदाहरण आहे. तर असा **'सत्'**परमात्मा त्रिकालाबाधित आहे. म्हणून तर तो सर्वांना मार्गदर्शन करू शकतो आणि तो स्वयंप्रकाशी आहे. आत्मप्रकाशी असल्याने त्याला दुसऱ्या कोणत्याही प्रकाशाची जरूरी नाही. त्याच्याच प्रकाशाने सर्वही जगत प्रकाशित होत आहे. आनंदस्वरूप आहे तो आणि हा आनंदस्वरूप परमात्मा सत्य आहे. कालमर्यादारहित आहे. नित्य आहे. हा आनंद मिळविण्याकरिता सर्व साधनमार्ग आहेत. सगळ्याही साधनांचं पर्यवसान त्याच्यात होतं, असा जो सच्चिदानंद परमात्मा तोच गुरु आहे. अशा सद्गुरुंना मी वंदन करतो.

*******

भगवान दत्तात्रेयांचं अज, अक्रिय आणि अस्पृह या शब्दांत वर्णन केलेलं आहे. त्यांना जन्म नाही, क्रिया नाहीत आणि काही इच्छाही नाहीत. इच्छाशक्तीचं जे वर्णन केलं आहे, ते सगळ्या जगताचं कार्य सुरू झाल्यावर ज्या शक्तीचा आविर्भाव होतो तिचं आहे. सर्व एकच असल्यामुळे कशाची इच्छा करायची आणि काय भोगायचं? पण त्यांना जेव्हा 'बहुस्याम' अशी तृष्णा उत्पन्न झाली, 'मी बहुरूप व्हावं' हा एक त्या चैतन्याचा, परमात्म्याचा संकल्प झाला आणि त्या संकल्पशक्तीच्या सहाय्याने या गुणमयी प्रकृतीने हे सगळं जग निर्माण केलं. प्रकृती जड आहे. अचेतन प्रकृतीपासून कार्य होऊ शकत नाही. सांख्यांचं खंडन ह्याच मुद्यावर केलं आहे आचार्य महाराजांनी. प्रकृती सगळं कार्य करू शकते असं सांख्य म्हणतात. पण ती जड आहे. आत्मा तुम्हाला मानायचा नाही. नुसता जडवाद जर तुम्ही मानलात तर नुसत्या जडाकडून कार्य होणार नाही. कुठेतरी, काहीतरी चेतनाचा संबंध पाहिजे. नाहीतर रचनाच व्यवस्थित होणार नाही. त्या चेतनाच्या संबंधामुळे प्रकृतीकडून हे कार्य झालेलं आहे. त्याच परमेश्वराने संपूर्ण विश्व उत्पन्न केलं. ब्रह्मादिक देवांपासून तृणापर्यंत सगळी सृष्टी झाली. तृणरूप झालेला जीवात्मा आणि ब्रह्मरूप झालेला जीवात्मा दोन्हीही जीवच आहेत. पण हा जो तृणरूपाने असलेला जीवात्मा आहे त्याला काही शक्ती नाही. वृक्ष वगैरे केवळ भोगयोनी मानलेले आहेत. हे संपूर्ण चराचर विश्व जे उत्पन्न केलेलं आहे, त्या सर्व जीवांमध्ये, हा जो नरोत्तम आहे तो संवित् पात्र म्हणून सांगत आहेत. तो ज्ञानाधिकारी आहे. ह्या जगाचा अधिष्ठाता कोण आहे, या विश्वाचा निर्माता कोण आहे हे जाणून घ्यायचा अधिकार मनुष्यांलाच आहे, हे समजलं पाहिजे. एवढी तरी इच्छा व्हायला पाहिजे. जिज्ञासा अगोदर पाहिजे. जिज्ञासेनंतर मग प्रयत्न. ज्ञानाची इच्छा पाहिजे, ती ज्ञानाची इच्छा उत्पन्न व्हायलाच कितीतरी काळ जातो. ज्ञान ही पहिली भूमिका आहे असं वसिष्ठ सांगतात. तर अशा मानवांमध्ये एखादाच त्या मार्गाचा अधिकारी होतो. योग्यता असली तरी प्रत्यक्ष कार्य करायला सुरुवात करणं, साधनमार्गाचा प्रत्यक्ष अभ्यास करणं अतिशय कठीण आहे.

*******

प्रलयाच्या वेळेला सृष्टीकार्य करण्याकरता म्हणून कर्मामध्ये शक्ती निर्माण केली आहे. जीवात्म्याकडून जे पापपुण्यात्मक कर्म झालं आहे, ते कर्म फल दिल्याशिवाय नाहीसं होत नाही. आपण समजतो, ‘आपण करून गेलो, संपलं ते कर्म, आता आपल्याला कोण विचारणार आहे?’ नाही. संपत नाही. कर्मामध्ये शक्ती आहे. सारखा जन्म घेणं, त्या जन्मामध्ये सुद्धा पापपुण्यात्मक कर्माचा फल म्हणून सुखदुःखात्मक अनुभव घेणं, अशीही कार्यशक्ती सतत कार्यान्वित आहे. त्यामुळे सृष्टी चालू आहे.

प्रलयाच्या वेळेला ही शक्ती बंद झाली. स्थगित झाली. त्यामुळे सृष्टी संपली. त्यावेळेस ही जी कर्मं झालेली आहेत, ही कुठे राहतात, कोणी याची नोंद ठेवली, नोंद करायला किती कागद लागेल! एवढं लिहून ठेवणं शक्य तरी आहे का? एका माणसाची एका जन्मातलीच कितीतरी कर्म होतील. रोज मानसिक कर्म आहेत, वाचिक कर्म आहेत, कायिक कर्म आहेत. रोज मानसिक वृत्ती इतक्या निरनिराळ्या उत्पन्न होत आहेत की त्यांचा उल्लेख करणं कितीतरी कठीण आहे. या सर्व कर्मांच्या वासना संस्काररुपाने मनामध्ये राहतात. क्रिया होऊन गेल्या. पण त्या क्रियांचे संस्कार मनावरती आहेत! कोण मनुष्य ऑफिसमध्ये वेळेवर येतो, चांगलं काम करतो, रोजचं काम करून जातो, त्याचे सगळे संस्कार वरच्या अधिकाऱ्याकडे जमा आहेत. त्या संस्कारांच्या शक्तीमुळे त्या माणसाची त्याचा अधिकारी बढती करू शकतो. कर्मशक्ती मानली की ईश्वरशक्ती मानावीच लागते. कर्म अचेतन आहे. ते संस्काररूपाने मनामध्ये राहील. परंतु कोणतं कर्म कोणत्या वेळेला फलोन्मुख होईल, हे सगळं ज्ञान पाहिजे ना! त्याप्रमाणे त्याला त्याच्या कर्माप्रमाणे कोणत्या जन्मात घालायचं, हा सगळा विचार करून कार्य चाललं आहे. तर सर्व प्राण्यांच्या वासना आहेत, संस्कार सगळे मनामध्ये आहेत. मन अत्यंत सूक्ष्म आहे म्हणतात पण त्याच्यामध्ये ह्या सर्व वासना आहेत. प्रत्यक्ष वासना प्रकट झाल्या, कर्माचं फळ मिळायला लागलं, शरीर उत्पन्न झालं. सगळी कार्य बंद झाली.फक्त मन तेवढं आहे. सूक्ष्म शरीर ज्याला म्हणतो आपण, त्यातलं मनच मुख्य आहे. त्या मनाचा योग ईश्वरस्वरूपाशी झाला, त्यालाच निद्रा असं म्हणतात. सगळ्या स्थूल रूपाचा, व्यक्त रूपाचा संहार झाला पण सूक्ष्म रूपाने सर्व संस्कार घेऊन मन शिल्लक राहिलं. ती योगनिद्रा सर्व संहार रूप झाली आहे. पुढे तो संहारकाल संपला. कालही कारण आहे आणि संस्कारूपाने दिसणारी सर्व कर्मंही कारण आहेत. सर्व सृष्टीची सगळी कारणसामुग्री आहे ईश्वराजवळ. त्यामुळे त्याचा संकल्प फक्त झाला आणि सगळी सृष्टी निर्माण झाली.

*******

आत्मसाक्षात्कार करून घ्यायचा म्हणजे साधनचतुष्ट्य संपत्ती पाहिजे. नित्यानित्यविवेक, इहामुत्रार्थफलभोगविराग, दम, शम, उपरती, तितिक्षा, समाधान, श्रद्धा ही षट् संपत्ती आणि तीव्र मुमुक्षा. ही साधनचतुष्ट्य संपत्ती ज्याने मिळवली तो क्रमाने श्रवण, मनन, निदिध्यासन हे करू लागतो. आत्मानात्म विचाराकडे त्याची प्रवृत्ती होते. त्या विचारांच्या भूमिका आहेत. अगोदर श्रवण भूमिका आहे संपूर्ण. एकंदर उपनिषदांमध्ये काय सांगितलेलं आहे, आत्मस्वरूप कसं आहे, हे समजून घेणं त्याच्या नंतर हे ज्ञान दृढ करण्याकरता मनन भूमिका आहे. मनातून सर्व असंभावना गेल्या. एक परमात्मा, परब्रह्म आहे ही भावना दृढ झाली. त्याचं प्रमाणही आहे - उपनिषदरूपी! ही प्रमाणाचीही असंभावना गेली. प्रमेय जे ब्रह्मतत्त्व आहे ते प्रमाणाने सिद्ध आहे, ही सुद्धा असंभावना गेली. मग त्याचं साधन सुरू झालं.

निदिध्यासन ही साधन भूमिका आहे. ध्यान सुरू झालं. त्या ध्यानामध्ये सगुणाचं ध्यान आहे आणि उपासनाही आहे. तर हे निदिध्यासन जे आहे ते विपरीत बुद्धी दूर करण्याकरता आहे. प्रमेयालाही प्रमाण नाही ही जी असंभावना होती चित्तामध्ये, ते दोष श्रवण मननाने गेले. ध्यानाला सुरुवात केल्यानंतर, एक परमात्मा आहे, सर्वस्वरूप परमात्मा आहे, हे जे काही दिसत आहे ते सर्व वासुदेवरूपच आहे, ही बुद्धी होण्याकरता हे जे स्थूल विश्व दिसत आहे त्या विश्वरूपाचं ध्यान किंवा सूक्ष्म मनोमय अशा प्रकारचं जे वर्णन केलेलं आहे त्या स्वरूपाचं ध्यान आहे. म्हणजे दृष्य रूप आहे, विश्वरूपाच्या ध्यानामध्ये मन जर अशाप्रकारे स्थिर झालं तर विपरीत बुद्धी हळुहळू कमी होते, अहंकार कमी होतो, कामक्रोधादिक विकारही कमी होतात, ममता कमी होते. हे सगळे दोष कमी करण्याकरता 'निदिध्यासन' म्हणजे सगुण परमेश्वराचं ध्यान सांगितलं आहे. पुढे निर्गुण स्वरूपाच्या ठिकाणी चित्त स्थिर झालं की झालं. सगुणाचं ध्यान किंवा निर्गुणाचं ध्यान ह्यात श्रेष्ठ कनिष्ठ काही नाही.

ध्यान करणं ह्याचाच अर्थ मनाची स्थिरता आहे. मनाची स्थिरता झाल्यावर वासनाक्षय होऊन मनावरचे सगळे कुसंस्कार नष्ट होतात. आमचा वासना क्षय न होण्याचं कारण असं आहे की आमच्या अनेक जन्मांच्या वासना पक्क्या झाल्या आहेत आणि त्या वासना पक्क्या करण्याकरता पुन्हा आम्ही विषय भोग घेतो, संसारामध्ये पडतो म्हणजे जास्तीच त्या दृढ होत जाताहेत. स्थिर नाहीना मन! त्यामुळे त्या विषय वासनांचाच अभ्यास जास्तीजास्ती होतो. पण ज्ञान भूमिकेवर आल्याबरोबर त्या वासनांचा क्षय होऊन जातो आणि मनाची स्थिरता येते.

*******

शंकरांचं आत्मलिंग जे आहे त्याची गणेशांकडून स्थापना झालेली आहे. ते शिवलिंग रावणाकडे कसं आलं? त्याने ते कसं मिळवलं? याचा वृतांत सिद्धांनी सांगितला आहे. रावणाची माता शिवभक्त होती. रावणही शिवभक्त होता पण तो अर्थार्थी भक्त होता. जिज्ञासू किंवा आर्त असा नव्हता. जास्तीत जास्त आपली इच्छा पूर्ण करावी, ज्या ज्या इच्छा, वासना आहेत त्या ईश्वरकृपेने पूर्ण करून घ्याव्यात असा विचार करणारे काही भक्त असतात. वासनांचा निरोध करणं, इंद्रियांचा निरोध करणं इकडे त्यांचं लक्ष नसतं. इंद्रियांनी विषयांचा भोग घेत असतांना वासना वृद्धी होत असते. विषयांचा उपभोग घेतल्यानंतर सगळ्या इच्छा पूर्ण होतील असं वाटतं लोकांना; कामना, इच्छा ह्या विषय भोगाने पूर्ण करून घ्यायला काय हरकत आहे? पण तसं होऊ शकत नाही. ज्या विषय वासना मनामध्ये उत्पन्न होतात त्या थांबत नाहीत. तृप्ती होत नाही. भोगाने तृप्ती होईल, वासनाक्षय होईल, हा मार्गच योग्य नाही. मनाला जास्ती जास्ती विषयभोग मिळायला लागले म्हणजे मनामध्ये त्या विषयींच्या इच्छा वाढत जातात म्हणून काम, वासना, इच्छा या घालवल्या पाहिजेत. त्या नाहीशा करण्याकरता म्हणूनबाह्येंद्रियं आणि आतंरेंद्रियं यांचा निरोध प्रथम केला पाहिजे. निरोध केल्यानंतर ज्या काही वासना साठल्या असतील पूर्वींच्या भोगाने, त्यांचीच निवृत्ती होते. नवीन वासनांची भर काही पडत नाही. त्यासाठी इंद्रियांचा निरोध प्रथम करायला सांगितलेला आहे.

मनाचा निरोध करणं हे कर्तव्य आहे. परंतु त्या वासना जर तशाच राहिल्या तर तत्त्वज्ञान झाल्यानंतर सुद्धा वासनाक्षयाचा एक स्वतंत्र अभ्यास करावा लागतो. 'मीच ब्रह्मरूप आहे, सर्वव्यापी मी आहे, अनन्यस्वरूप मी आहे', हे कळलं, सगळं दु:ख गेलं. परंतु मनामध्ये असणाऱ्या सगळ्या वासनांचा क्षय होण्याकरता पुन्हा अभ्यास पाहिजे. समाधीअवस्था कायम टिकवण्याकरता प्रयत्न पाहिजेत. प्रयत्न केल्यानंतर सुद्धा जर प्रारब्ध कर्माचा प्रतिबंध असेल तर समाधी टिकू शकत नाही.

झोप घेण्याचं ठरवून जरी आम्ही निजलो तरी सुद्धा प्रारब्ध कर्माने जागृतावस्था येते. आमच्या इच्छेप्रमाणे आम्ही झोपही घेऊ शकत नाही. 'मला झोप यावी' असा कुंभकर्णाने वर मागून घेतला होता म्हणून तो सहा-सहा महिने निजत होता. इतकंही आम्हाला शक्य नाही. मग समाधी अवस्था तर कितीतरी दूरची आहे. मनोनाश, निर्वृत्तिक मन करणं, स्थिर मन करणं हे कठीण आहे. समाधीअवस्था ही सुद्धा कायम राहू शकत नाही. समाधीतून उठल्यावर ज्या वासना मनात उत्पन्न झालेल्या असतात किंवा होतात त्यांचा क्षय करण्याचा अभ्यास केला पाहिजे. भगवंताच्या नामस्मरणाने, चिंतनाने, वाचनाने तो वासनाक्षय करायचा आहे. त्याशिवाय विदेहमुक्ती प्राप्त होत नाही. देहसंबंध कायमचा सुटत नाही. श्रीपाद श्रीवल्लभांनी रजकाला विचारलं, ''तुझ्या मनामध्ये वासना आहेत. तुला ह्या जन्मात राजा व्हायचं आहे की पुढच्या?'' रजक म्हणाला, '' मी आता म्हातारा झालो आहे, ह्या म्हातारपणात राज्य करून काय उपयोग होणार आहे?'' श्रीपाद म्हणाले, ''म्हणजे तुझ्या मनांत राजा व्हायची इच्छा आहे हे सिद्ध झालं. जा, काही हरकत नाही.'' म्हणजे संत महात्म्यांचा प्रसाद झालेला आहे पण त्याची (जीवाची) वासनाच त्याच्या आड आलेली आहे.

*******

जगताची तीन कारणे - काल कारण, कर्म कारण आणि गुण कारण. प्रलयाच्या वेळेस साम्यावस्थेमध्ये सर्व गुण असतात. आता सृष्टी निर्माण करायची तर त्या गुणांमध्ये क्षोभ, वैषम्य निर्माण करणं हे कालामुळे घडतं. कर्मांमुळे त्या गुणांपासून कोणता देह उत्पन्न व्हायचा, कोणती सृष्टी निर्माण करायची ते ठरतं. त्यांचंच कार्यरूप आणि परिणाम रूपांतर म्हणजे ही सृष्टी आहे. ही सृष्टी आभासात्मक आहे. कोणतीही सृष्टी स्थिर नाही. शारीरिक अवस्था ज्याप्रमाणे बदलतात त्याप्रमाणे शरीर धारण केलं जातं. पुन्हा ते सोडून दिलं जातं. जन्ममृत्यू हेही त्याचप्रमाणे आहेत. हे भ्रमण सारखं चाललं आहे आणि हा भ्रमही सतत चालू आहे. 'हा माझा आहे' असं समजून आनंद वाटतो आणि तो गेला की दु:ख वाटतं. हे दोन्हीही भ्रम आहेत. हा भ्रम कशाने जाईल?

सद्‌गुरुंचा प्रसाद जर झाला तरच हा संसारभ्रम पूर्णपणे नाहीसा होतो. 'पुनरपि जननं पुनरपि मरणं' हे सारखं चाललेलं आहे. कोणाच्या ना कोणाच्या जन्मात जीवाला जावंच लागतं. सद्‌गुरुंचा प्रसाद होऊन, मार्गदर्शन मिळाल्यावर जीवाकडून प्रयत्न घडतात. ते प्रयत्न सुद्धा अखंड चालू पाहिजेत, दीर्घकालपर्यंत चालू पाहिजेत, असं योगसूत्रकार सांगतात. साधनाभ्यास दीर्घकालपर्यंत चालू राहिला पाहिजे. परीक्षेला ज्या विद्यार्थ्याला बसायचं असेल त्याने केव्हातरी सुट्टीच्या दिवशी अभ्यास करून कसं चालेल ?असं केलं तर तो वार्षिक परीक्षेत पास होईलच असं नाही. सतत निरंतर अभ्यास करावा लागतो. एखाद्या दिवशी जास्त वेळ, एखाद्या दिवशी काहीच अभ्यास नाही असं करून चालणार नाही. रोज नियमितपणे अभ्यास चालू पाहिजे आणि तोही विश्वास ठेवून. ' मी जे काही प्रयत्न करतो आहे त्या माझ्या प्रयत्नांना यश मिळालंच पाहिजे.' अशा विश्वासाने अभ्यासाचा प्रयत्न झाला पाहिजे. तरच त्याचं फळ मिळतं. सद्‌गुरुंचा जर प्रसाद झाला नाही तर तो जीव पुन्हा जन्ममरणाच्या फेऱ्यात सापडतो.

स्थूल शरीर हे फक्त काही काळ राहाणारं असतं. पण याच्यामध्ये राहणारा जो साधनवर्ग - ज्याला लिंगशरीर किंवा सूक्ष्म शरीर म्हणतात - तो मात्र मोक्षापर्यंत राहाणारा आहे. या लिंग किंवा सूक्ष्म शरीराचा जीवात्मा बनलेला आहे. अंत:करण मन वगैरे सर्व आहे. संस्कार आहेत. पण, 'सगळी इंद्रियं, मन बुद्धी म्हणजेच मी आहे ' असं तो जीवात्मा समजतो. 'मला राग द्वेष वगैरे आहेत', म्हणजेच मनाचे जे धर्म आहेत ते सगळे माझेच धर्म आहेत, इतका त्या मनोबुद्धीमध्ये तो अध्यस्थ झाला आहे. त्यामुळे ती गेली की हा सुद्धा गेल्यासारखा होतो. मला जायला पाहिजे, यायला पाहिजे, मला जन्ममृत्यू आला असं तो मानतो इतका तो तादात्म्य पावलेला आहे.

*******

नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांनी आपल्या ब्रह्मचारी, गृहस्थाश्रमी, संन्यासी शिष्यांना त्यांचे त्यांचे आचारधर्म समजावून सांगितले. 'तुम्ही तुमच्या आचारधर्माचं पालन केलं नाहीत तर तुमचा अध:पात होईल' असं सांगितलं. गृहस्थाश्रमी शिष्यांना त्यांच्या त्यांच्या घरी पाठवून दिलं. संन्यासी शिष्यांना मात्र तीर्थयात्रा करायला सांगितल्या. काशी, प्रयाग, गया, श्रीशैल्य, नैमिषारण्य, कुरुक्षेत्र, बद्रिकाश्रम, गोकर्ण, अयोध्या वगैरे सर्व क्षेत्रांचा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे गंगा, यमुना, सरस्वती, चंद्रभागा, गोदावरी अशा अनेक नद्यांच्या तीरावर संचार करावा, स्नान करावं, त्यांच्या तीर्थांचं दर्शन घ्यावं असं सांगितलं.

प.पू. श्रीमद्‌सद्‌गुरू वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी या संदर्भात थोडा विचार मांडला आहे. संन्यासी शिष्यांना तीर्थयात्रा करण्यासाठी का पाठवलं? काय कारण आहे? वास्तविक तीर्थयात्रा ही कनिष्ठ आहे. सहज पूजाही होणे कठीण आहे. सर्व कर्म ही परमेश्वराची पूजाच आहे, अशी सहजपूजा जो करतो तो उत्तम अधिकारी आहे. योगाभ्यासाने अंत:करणाची बाहेरच्या विषयांपासून निवृत्ती करायची, प्रत्याहार वगैरेनी इंद्रियांना निवृत्त करून एकाच ठिकाणी चित्त लावायचं हे मध्यम आहे. प्रतिमापूजा ही अगदी कनिष्ठ आहे. अगदी परिच्छिन्न मूर्तीमध्ये अपरिच्छिन्न परमात्मा आहे, हाच अभ्यास आहे ना! अपरिच्छिन्न परमात्म्याचं स्वरूप मनामध्ये यायला किती वेळ लागेल? तिथे मनाला स्थिरता यावी अशी अपेक्षा आहे. प्रतिमापूजा अधम आहे, याचा अर्थ 'त्याज्य'असा नाही. कुठेच चित्त लागत नसेल तर ते एका ठिकाणी प्रतिमेच्या ठिकाणी राहू शकतं आणि तोच परमात्मा आहे अशी दृढ भावना झाली तर त्याचं फळही मिळतं.

तीर्थयात्रा उपयोगी आहेत हे कसं काय? आता त्यात मनाची पात्रता कशी आहे त्यावर ते अवलंबून आहे. पुण्यक्षेत्रात जायचं असेल तर आपल्या हातून काया-वाचा-मने करून पाप घडणार नाही याची काळजी घेऊन जायला पाहिजे. नाहीतर पुण्यक्षेत्री घडलेलं पाप न जाता वज्रलेप होऊन जाईल. ज्ञान होण्याकरता पापक्षय झाला पाहिजे. आत्मस्वरूप बुद्धीग्राह्य आहे पण बुद्धी शुद्ध झाली पाहिजे. आरशावर जर मळ असेल तर आपलं प्रतिबिंब आरशांत चांगलं दिसत नाही. त्यासाठी आरसा स्वच्छ केला पाहिजे. पापक्षय झाल्याशिवाय आत्मज्ञान होत नाही. पापक्षय होण्याकरता योगाभ्यास, यज्ञयागानुष्ठानं सांगितली आहेत. ही साधनं फार मोठी आहेत असं काहींना वाटतं. मोक्ष तर पाहिजे. दु:ख जावीत असं तर वाटतं. विरक्तता चित्तामध्ये उत्पन्न झाली आहे. पण योगाभ्यास, यज्ञयागादिक मात्र करता येत नाहीत. मग ज्ञानप्रतिबंधक पापं जाणार कशी? त्याकरता तीर्थयात्रा सांगितल्या आहेत.

*******

जीवन असेपर्यंत रोज थोडं तरी वेदांताचं चिंतन घडलं पाहिजे, सद्‌गुरुंची सेवा आणि ईश्वराची उपासना घडली पाहिजे. अज्ञानदशेमध्ये या उपासनेचं फल म्हणजे 'ज्ञान' प्राप्त होतं आणि ज्ञान ज्यांच्या कृपेने झालं त्यांच्याबद्दल पुढे कृतघ्नता येऊ नये, याकरिता नंतरही उपासना चालू राहिली पाहिजे, अशी शास्त्राज्ञा आहे.

भगवान प्रसन्न झाल्यावर जगामध्ये अलभ्य काही नाही असं शंकराचार्य महाराज म्हणतात. परंतु भगवत भक्त काही मागत नाही, ही दुसरी बाजूही त्यांनी सांगितली आहे. भगवंताचं अखंड चिंतन रहावं अशी ज्यांना खरी इच्छा आहे, निर्वासन ज्यांचं मन झालं आहे ते देवाजवळ काहीही इच्छा व्यक्त करत नाहीत, मागत नाहीत. मागितल्याशिवाय देव देतो हेही खरं आहे. सुदामजींना त्यांनी दिलं. पत्नीच्या आग्रहावरून सुदामजी निघाले.अगोदर दोन-चार वेळेला पत्नीने आग्रह केला, 'जाऊन या, जाऊन या; ते तुमचे मित्र आहेत, द्वारकेचे राजे आहेत, तुम्हाला पुष्कळ धन मिळेल.' भगवान गोपाळकृष्णांबरोबर ज्यांचं अध्ययन झालं त्यांचा अधिकार केवढा मोठा असला पाहिजे. तेव्हा निरिच्छवृत्तीने राहणारे सुदामजी पत्नीच्या इच्छेवरून द्वारकेला जायला निघाले. पत्नीने जरी सांगितलं तरी जातांना त्यांच्या मनात असे विचार आले नाहीत की श्रीकृष्णांना भेटलो म्हणजे पुष्कळ धन, संपत्ती मिळेल. त्या 'उत्तम श्लोकाचं' (श्रीकृष्णाचं) दर्शन मला आज पत्नीच्या आग्रहामुळे घडणार आहे हा मोठा लाभ आहे, अशी त्यांची वृत्ती आहे. द्वारकेत पोचल्यावर भगवंतांचं दर्शन झालं, भेट झाली. भगवान गोपाळकृष्णाने अत्यंत प्रेमाने, आदराने त्यांची पूजा वगैरे केली. सुदामजींनी काही मागितलं नाही. श्रीकृष्णांनीही काही दिलं नाही. परंतु भगवंतांनी मला द्रव्य दिलं नाही याविषयी गोपाळकृष्णांबद्दल त्यांच्या मनामध्ये अनादर नव्हता. उलट, ''हा जन्मापासून दरिद्री असलेला ब्राह्मण. देव दयाळू आहे. मला त्यांनी धन दिलं नाही याचा अर्थ त्याची माझ्यावर दया आहे. या दरिद्री ब्राह्मणाला जर द्रव्य मिळालं तर ह्याला अहंकार होईल. मदामध्ये याचं सगळं आयुष्य जाईल. हा मला विसरून जाईल. माझं विस्मरण ह्याला होऊ नये असं देवांनी मनामध्ये आणलेलं आहे. ही त्यांची केवढी दया आहे'' असं सुदामजींना वाटलं. तेव्हा अशा प्रकारचे अधिकारी महात्मे होऊन गेले. काहीही देवाजवळ मागायचं नाही अशी त्यांची वृत्ती होती.

*******

देवाचं अखंड सान्निध्य होण्याकरिता अर्चनही व्यवस्थित चालू पाहिजे. श्रद्धेने चालू पाहिजे. जास्तीत जास्त अखंड अर्चन व्हावं, उत्सव महोत्सव वगैरे व्हावे असं भगवंतांनी उद्धवजींना उपदेश करतांना सांगितलं आहे. म्हणजे भगवंताचं सान्निध्य त्या ठिकाणी निरंतर असतं आणि देवाचं सान्निध्य असतं त्या ठिकाणी दैवी संपत्तीही आपोआप मिळते. देव सान्निध्याचा उपयोग म्हणजे दैवी संपत्तीचा लाभ, तसे जे अधिकारी महात्म्ये असतील त्यांना तो होतो आणि त्यांच्या द्वाराने इतरत्रही त्या दैवी संपत्तीचा प्रसार होतो. तो प्रसार झाला पाहिजे. मनांत येणारे दुर्विचार दूर झाले पाहिजेत. आणखी सर्वांची मनं शुद्ध, पवित्र झाली पाहिजेत. देवाच्या सान्निध्याचा उपयोग म्हणजे दैवी संपत्ती निर्माण होणार आहे. त्याची सध्या जरूरी आहे. बाह्य संपत्ती पुष्कळ मिळेल परंतु त्या बाह्य संपत्तीपेक्षा दैवी संपत्ती महत्वाची आहे. ती मोक्षदायी आहे असं भगवान सांगतात. भगवान गोपाळकृष्णांनी जन्माला आल्यापासून आपली ईशशक्ती जिकडेतिकडे वापरली. ज्ञानाची इच्छा करणारा त्यांना कोणी मिळाला नाही, असं काही म्हणता येणार नाही. उद्धवजींना शेवटी त्यांनी आपला ज्ञाननिधी दिला आणि नंतर ते निजधामाला गेले. संरक्षण करणारा पाहिजे कोणीतरी.एवढं त्यांना पहावं लागलं. अर्जुनाला ज्ञान दिलं, मोह त्याचा तेवढा दूर झाला. कर्माधिकारी तो आहे. त्यामुळे त्या कर्माला प्रतिबंधक जो मोह उत्पन्न झाला होता, अविवेक, तो अविवेक दूर केला आणि 'करिष्ये वचनं तव' ही ईश्वराची आज्ञा आपण पालन केली पाहिजे अशी बुद्धी त्याला झाली आणि त्याचा सगळा मोह दूर झाल्यामुळे तो पुढे विजयी झाला.

आचार्य महाराजांनी पंचायतन पूजेची स्थापना, उपासना सर्वांना करायला सांगितली, यद्यपि त्यांचा अद्वैत सिद्धांत आहे. परंतु व्यवहार दृष्टीने सर्वांचं कल्याण होण्याकरीता, अधिकार वाढविण्याकरीता, उपासना मार्गही चांगला चालावा म्हणून भगवान शंकराचार्य महाराजांनी पंचायतन पद्धती चालू केली. सद्‌गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज हेही त्या संन्यास परंपरेतीलच आहेत. त्यांची दत्तात्रेयांची उपासना आहे. पण आचार्यमहाराजाच्या प्रमाणे त्यांनी सर्वही देवतांवर स्तोत्रे केलेली आहेत. सर्वत्र एक परमात्मा आहे, ही अभेद बुद्धी आहे. ही अभेद बुद्धी अंत:करणामध्ये राहाणं हाच खरा योग आहे.

*******

दत्तात्रेयांनी अनंत जीवांना मार्गदर्शन करून त्यांचा उद्धार करण्याकरता अवतार घेतलेला आहे. ह्या अवताराचे कार्य मर्यादित नाही, हा सद्‌गुरु अवतार आहे. मार्गदर्शक अवतार आहे. अज्ञान नाश करण्याकरता झालेला अवतार आहे. जीवांना मुक्त करण्याकरता झालेला अवतार आहे. भूतकाळात होऊन गेलेले जीवात्मे, आज असणारे, पुढच्या काळात होणारे, ह्या सगळ्यांनाही मार्गदर्शन करणारा हा अवतार आहे. म्हणजे ह्या अवताराला कालमर्यादा नाही. रामकृष्णादि अवतार झाले ते एका विशिष्ट कार्यासाठी होते. रावणाचा नाश करायचा होता, कंसाचा नाश करायचा होता, धर्मविरोधी वृत्तीच्या लोकांचा नाश करूनच भगवंतांना धर्माची स्थापना करायची होती. त्याशिवाय ती काही झाली नसती. तसं कार्य इथे नाही. दत्तात्रेय अवतारामध्ये प्रत्यक्ष शस्त्र हातात घेऊन कोणाचा नाश केला आहे असं नाही. ईश्वर नित्य आहे असे सांगतात योगसूत्रकार. ईश्वर सर्वांचा गुरु आहे, कारण त्याला कालमर्यादा नाही. कालमर्यादा जीवात्म्याला आहे. जन्माला जरी आला तरी त्याच्या आयुष्याची कालमर्यादा ठरलेली आहे. मानव जन्मामध्ये सुद्धा पूर्ण आयुष्य पदरात पडेल असे सांगता येत नाही. अशी कालमर्यादा जीवांना आहे. ईश्वराला ती नाही म्हणून सर्वही कालांमध्ये असणारे जे जीवात्मे आहेत त्यांना मार्गदर्शन ईश्वर करू शकतो. ब्रह्मादिक जीवांनासुद्धा मार्गदर्शन करून त्यांच्या द्वाराने ईश्वर कार्य करतो आहे. दत्तात्रेय अवतार हा अनंत आहे. त्याला मर्यादा नाही. देशमर्यादाही नाही. भगवान दत्तात्रेयांची पुष्कळ रूपं आहेत. चतुर्भुज आहे, षड्‌भुज आहे. अनसुयेच्या पोटी अवतार घेऊन दत्तात्रेयांचं कार्य अविच्छिन्नपणे चाललं आहे. माहूर क्षेत्रामध्ये अत्रीअनसुयेचा आश्रम आहे. तिथे त्यांचं वास्तव्य आहे. तिथून ते रोज सबंध भारतवर्षात संचार करतात. काशीमध्ये त्यांचं रोज प्रात:काळी गंगास्नान होतं आणि कऱ्हाडला कृष्णा-कोयना संगमावर ते प्रात:संध्या करतात. चंदन लावण्यासाठी पंढरपूरला जातात आणि भिक्षा मागायला कोल्हापूरला येतात. जेवण्यासाठी पांचाळेश्वराला, गोदावरीच्या तीरावर असतात. अशा अनेक स्थानांमध्ये जे साधक जीव असतील त्यांना काय अडचणी आल्या आहेत हे ते स्वत: पाहतात.

ईश्वर आम्हाला दिसत नाही, मग तो कशाला मानायचा, अशी पुष्कळ चिकित्सा आपण करतो. ईश्वर दिसत नाही खरा पण तो हृदयस्थ आहे, प्रेरक आहे, असे त्याचे स्थान स्वत: ईश्वरानेच सांगितले आहे. सर्वांच्या बुद्धीला प्रेरणा करणारी ईश्वरशक्ती जी आहे तिला अंतर्यामी म्हटलेले आहे बृहदारण्यकोपनिषदामध्ये! सर्वत्र अंतर्यामी तो आहे. सर्वांच्या बुद्धीला प्रेरणा करायची म्हणजे त्याची किती शक्ती असली पाहिजे? त्याकरता सर्व ठिकाणी त्याचे वास्तव्य पाहिजे. कोणता जीव कोणत्या योग्यतेचा आहे हे पाहण्याकरता दत्तात्रेय रोज सर्वत्र संचार करतात. निरनिराळ्या स्थानांमध्ये जे साधक जीव असतील त्यांना काय अडचणी आल्या आहेत हे ते स्वत: पाहतात. अनेक प्रकारचे प्रतिबंध असतात. प्रयत्न करतो मनुष्य. प्रपंचामध्येही आपण प्रयत्न करतो. पारमार्थिक प्रयत्न करणारीही मंडळी आहेत. पण त्या प्रयत्नांमध्ये प्रतिबंधही पुष्कळ आहेत. अनेक प्रकारचे प्रतिबंध उत्पन्न होतात ते सगळे प्रतिबंध दूर करून साधकांचा मार्ग निर्वेध करणं, त्यांचा प्रयत्न सफल करणं, त्यांना सहाय्य करणं हे कार्य दुसरं कोण करणार?

*******

ज्ञान म्हणजे काय ते भगवंतांनी गीतेच्या तेराव्या अध्यायामध्ये सांगितलेलं आहे.

अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् ।
आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥

हे गुण सांगितलेले आहेत. तेच ज्ञान आहे. अमानित्व सिद्ध झालं म्हणजे ते ज्ञानच आहे. ज्ञान आणखी दुसरं कोणतं? 'अहम् ब्रह्मास्मि' नुसतं म्हणत बसणं वेगळं. पूर्ण अमानित्वाची व्याख्या करतांना ज्ञानेश्वरमहाराजांनी म्हटलं आहे,

पूज्यता डोळा न देखावी । स्वकीर्ति कानी नायकावी ।
हा अमुका ऐसी नोहावी । सेचि लोका ॥

हे अमानित्वाचे लक्षण आहे. ह्या अमानित्वाचा अभ्यास व्हायला किती काळ जायला पाहिजे! चार किंवा सहा वर्षांचा महाविद्यालयातला कोर्स आहे का हा? 'पूज्यता डोळा न देखावी' हे शक्य आहे काय? कितीही अभ्यास करू देत. आपल्या गळ्यात हार घातलेला पहायला मिळावा, आपली पूजा केलेली पहायला मिळावी, आपली स्तुती केलेली ऐकायला मिळावी, ही माणसाची इच्छा असते. तिकडे ज्ञानराज म्हणतात, 'स्वकीर्ति कानी नायकावी' हे शक्य कसं आहे? आणि माझी आठवण कोणालाही होऊ नये, ही अमानित्वाची शेवटची व्याख्या आहे. भगवंतानी सांगितलेला एकेक गुण, ज्याचं भगवंतांनी ज्ञान म्हणून वर्णन केलेलं आहे तो पूर्णपणे आपल्या अंगी बाणवायचा, हा अभ्यास कितीतरी जन्म केला तरी पूर्ण होणार नाही. त्यात काहीतरी प्रतिबंध येतात. काहीतरी प्रयत्न शिल्लक राहतोच. बळीराजाने दान केल्याची कथा सर्वांना माहीत आहे. वामन वेषात भगवंतांनी त्याच्याकडे येऊन तीन पावलं भूमी मागितली. बळीराजाने हसून म्हटलं, ''माझ्यासारख्या राजाजवळ फक्त तीन पावलं भूमी मागतोस? निदान शे-दोनशे एकर तरी जमीन मागून घे. म्हणजे तुला जन्मभर कसली विवंचना करावी लागणार नाही.'' म्हणजे हे बोलणं अहंकाराचंच आहे. वामनानं सांगितलं, ''नको मला तेवढी पुरे. जास्ती घेण्याची आवश्यकताच नाही.'' आणि ज्यावेळेला बळीराजाने दान केलं आणि भगवंतांनी आपलं विश्वरूप प्रकट केलं तेव्हा त्या तीन पावलांत सर्वस्व घेतलं. स्वर्ग आणि भूमी दोन पावलांत घेतली. पण त्या दानाचं फळ त्याला मिळालं. त्या दानाच्या निमित्ताने बळीराजाला विश्वरूप दर्शन झालं हे मोठ फलं आहे. पण मनामध्ये थोडा अहंकार शिल्लक आहे. मानित्व आहे, अमानित्व नाहीये. वामनांनी विचारलं, ''तिसरा पाय कुठे ठेवायचा? नरकात?'' बळीराजाने सांगितलं, ''हे माझं शरीर शिल्लक आहे की. माझ्या मस्तकावर तिसरा पाय ठेवा म्हणजे त्रिपाद भूमी देण्याचा माझा संकल्पही पूर्ण होईल.'' बळीराजाने शरीरही देऊन टाकलं. बाह्यदृष्टीने हे अतिशय मोठं दान आहे. पण बळीराजाच्या बुद्धीमध्ये जो दोष राहिला तो त्याच्या पत्नीने प्रकट केला. तिने प्रार्थना केली, ''देवा, ह्यांच्या बुद्धीत थोडी सुधारणा होणं आवश्यक आहे. हे अजून म्हणताहेत - हे माझं शरीर आहे त्याच्यावर तिसरा पाय ठेवा. ह्यांचं हे जे शरीर, हे त्यांनी कुठून आणलं? पंचमहाभूतांच्या अंशांपासून निर्माण झालेलं हे मानवी शरीर यांनी कधी तयार केलं? हे काय ह्यांचं सामर्थ्य आहे?'' म्हणजे ईश्वराला सर्वस्व दान करूनसुद्धा मानित्व गेलं नाही. अमानित्व सिद्ध करायला कितीतरी अभ्यास केला पाहिजे.

*******

तैत्तिरीय उपनिषदामध्ये राजाच्या आनंदापासून सुरूवात करून इतर सर्वांच्या आनंदाचं वर्णन केलेलं आहे. सम्राट राजाचा आनंद त्यांनी पहिला गृहित धरला. मनुष्यामध्ये अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे सुख म्हणजे राजाचे आहे. त्याच्या तोंडून जो शब्द येईल त्याप्रमाणे घडून येते ना! राष्ट्रपती जो हुकूम देतील त्याप्रमाणेच सगळं घडतं की नाही! उच्च सत्ता ज्याला मिळालेली आहे त्याच्या हुकूमाप्रमाणेच सगळं घडून येतं. सगळ्या सुखसोयी त्याला असतात. पण कालमर्यादा आहे. काल कमी आहे हा एक मोठा दोष आहे. पण तो दोष सगळ्याच सुखात आहे. अमुक कालपर्यंतच सुख मिळेल. त्याच्या पुढे कोणाला इथे राहता येणार नाही असं असू नये, असं माणसाला वाटतं. त्याच्या एका बाजूला ज्याच्या मनामध्ये काहीही वासनाच नाहीत असा अकाम महात्मा आहे. त्याच्या मनात काहीही इच्छा नाही. ही स्थितप्रज्ञाची भूमिका आहे. भगवद् गीतेच्या दुसऱ्या अध्यायाच्या शेवटी भगवंतांनी ती भूमिका सांगितली आहे. ते सांगतात, अशा महात्म्यांच्या मनात कोणतीही इच्छा, वासना राहिलेली नाही. हे सगळे आनंद त्याच्याजवळ आहेत. राजाचा आनंद आहे, देवांचा आनंद आहे, गंधर्वांचा आनंद आहे, ब्रह्मदेवाचा आनंद आहे. त्याच्या मनात कसली इच्छाच नाही. निर्वासन अंत:करण त्याचं झालेलं आहे. 'मी आनंदरुप आहे.' असं तो म्हणतो. ज्याला आनंदरुप आत्मस्वरुप समजलेलं आहे त्याला सगळे आनंद प्राप्त होतात. ह्याला दैवी प्रकृती म्हणतात. ही दैवी प्रकृती ज्याच्याजवळ आहे त्याच्या प्रकृतीतील रजोगुण व तमोगुण जवळजवळ संपल्यासारखे आहेत म्हणजेच कार्य करू शकत नाहीत. सत्वगुणांचं प्राबल्य त्याच्या मनामध्ये आहे. सात्विक विचारच जास्ती त्याच्या मनामध्ये येतात, रजोगुणाचे किंवा तमोगुणाचे विचार येतच नाहीत. योग्यअयोग्याचा विचार नेहमी करणं, ज्ञानविचारप्रधान वृत्ती असणं आणि त्याप्रमाणे वागणं हे शुद्ध सत्त्व गुणांचं लक्षण आहे. रजोगुणाने सारख्या क्रिया होताहेत. जगातले सर्वही पदार्थ रजोगुणामुळे कियाशील आहेत असा एक सिद्धांत आहे. सारखं काहीतरी करायचं आता ते योग्य असलं तर हरकत नाही पण त्रासही तितकाच होतो ना! व्याप तितका संताप म्हणतात. समर्थांनी, ''सत्कर्मयोगे वय घालवावे'' हे अगोदर सांगितलं. आपण वैयक्तिक कर्म उत्तम करायचं. चांगलं वागायचं आणि ''सर्वांमुखी मंगल बोलवावे'' हेही सांगितलं. मनाप्रमाणे वागणं हे सत्कर्म नाही. शास्त्र हे ईश्वराची आज्ञा आहे. त्याप्रमाणे वागलो तर आपलं कल्याण होणार आहे. धर्माचरणाने आपली उन्नती होणार आहे. पण केवळ आपली वैयक्तिक उन्नती झाली असली किंवा होत असली तरी आपल्याबरोबर इतरांनाही सहाय्य केलं पाहिजे. ''एकएका सहाय्य करू ।अवघे धरू सुपंथ।'' केवळ एकट्यानेच सन्मार्गाने जाण्यापेक्षा परस्परांना सहाय्य करून त्यांनाही आपल्याबरोबर सुपंथाला नेणं ह्याच्यामध्ये विशेष समाधान आहे. शांती आहे. मार्गदर्शन आहे. तोही उपदेश तुकाराम महाराजांनी केला आणि त्याप्रमाणे आचरण करून दाखवलं.

*******

सात्विक कोणतं आचरण आहे, राजस कोणतं आचरण आहे आणि तामस कोणतं आचरण आहे-या प्रत्येकाचे विभाग शास्त्रकारांनी सांगून ठेवलेले आहेत. त्यामध्ये सात्विक जे असेल त्याप्रमाणे आपण वागायचं. तो प्रयत्न आपण करायचा. हा एक निश्चय मनामध्ये बाळगून त्याप्रमाणे वागणारा जो आहे त्याला पुष्कळ अडचणी आहेत. प्रात:काली उठलं पाहिजे. ईश्वराचं, सत्पुरुषाचं ध्यान केलं पाहिजे. प्रात:स्नान करणं, ईश्वराची स्तुती करणं, पूजा करणं वगैरे जे काही धर्म सांगितले आहेत त्या सगळ्यांचं आचरण करायचं म्हणजे शरीराची आसक्ती कमी झाली पाहिजे. ती जर कमी झाली तरच असं वागता येतं. हे सगळं धर्माचरण शरीराची आसक्ती कमी झाली तरच होऊ शकतं. दैत्यलोकसुद्धा स्वर्गप्राप्तीच्या इच्छेने तपश्चर्या करतात. कितीतरी दैत्यांनी उग्र तपश्चर्या केली. सृष्टीकर्त्या ब्रह्मदेवांपासून वर मागून घेतला आणि मग देवांना घालवून स्वर्गात जाऊन बसले, हे काही सत्कर्म होणार नाही. देवांना त्यांच्या स्थानातून घालवून देऊन त्यांचं स्थान घ्यायचं हा काही न्याय्य मार्ग नाही. परंतु तशी प्रवृत्ती होते. मनामध्ये अशाप्रकारच्या ज्या वृत्ती उत्पन्न होतात त्या कमी झाल्या पाहिजेत. ह्या राजस, तामस वृत्ती आहेत. 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म हे सर्वेश्वर पूजनाचे ॥' असं महात्मे सांगतात. आपली शुद्ध सात्विक वृत्ती वाढवावी आपण ईश्वराचं सात्विक भक्त व्हावं अशी इच्छा करणारे जे आहेत ते राजस, तामस मार्गांनी जात नाहीत.

व्यास महर्षींनी कौरव-पांडवांचा इतिहास महाभारतामध्ये लिहून ठेवला आहे. चांगलं कर्म केलं म्हणजे काय होतं, वाईट कर्म केलं म्हणजे काय होतं हे दाखविण्याकरीताच त्यांनी हा ग्रंथ लिहिला. धर्मराज आणि पांडव कसे वागले आणि दुर्योधन आणि कौरव कसे वागले! वास्तविक पांडवांच्यावर फार कठीण प्रसंग आलेले आहेत. पण शेवटपर्यंत त्यांनी धर्माचरण मात्र सोडलेलं नाही. सम्राट राजा झाल्यानंतर धर्मराजाने राजसूय यज्ञ केला. साम्राज्य पांडवांचं होत. त्यांनी मिळवलेलं होतं. श्रीकृष्णाच्या नेतृत्वाखाली राजसूय यज्ञ उत्तम प्रकारे पार पडला. यज्ञ पार पडल्याबरोबर द्यूतक्रीडा झाली आणि त्यात हरल्यामुळे पांडवांना वनवासात जावं लागलं. दुर्योधनाला यज्ञ वगैरे न करता आयतंच साम्राज्य मिळालं. त्यामुळे आपल्या मनामध्ये संशय निर्माण होतो. द्रौपदीच्या मनामध्येही संशय निर्माण झाला. धर्मराजाला तिने वारंवार म्हणावं, ''धर्माचरणाचं फल आहे की नाही असा मला प्रश्न पडला आहे. ईश्वर आहे की नाही या जगात? कारण धर्माचरण करून, ईश्वराची भक्ती करून, तुमच्या नशिबी शेवटी वनवासच आला आणि यातलं काहीच न करतां दुर्योधनाला आयतं सगळं साम्राज्य मिळालं. म्हणजे धर्माचं फळ काही मिळत नाही असं म्हणायचं का?''

पण धर्मराजांचा आपल्या ध्येयावर पक्का विश्वास होता. ते म्हणाले, ''मी काही अमुक एक फल मिळावं, सत्ता मिळावी म्हणून धर्माचरण करत नाही. ईश्वराची आज्ञा म्हणून मी धर्माचरण करतो. ज्याने जन्माला घातलं त्याच्या आज्ञेचं पालन करणं एवढंच माझं कर्तव्य आहे. अमुक फल मिळावं म्हणून धर्माचरण करणं म्हणजे धर्माचा व्यापार केल्यासारखं होईल.'' तो खरा धर्मशील होता. त्याने हे उत्तर देऊन द्रौपदीचं समाधान केलं.

*******

महाभारतामध्ये धर्मराजाच्या धर्माचरणाला विशेष प्राधान्य दिलं आहे. धर्मानेच संरक्षण होतं, हा सिद्धांत मांडण्याकरता महाभारत लिहिलं आहे. धर्मराजानेही आपलं ध्येय शेवटपर्यंत सोडलं नाही. रामचंद्रांनीही आपलं ध्येय सोडलं नाही. न्याय्य मार्गाने प्रयत्न केले. परस्त्री हरण करणारा जो आहे त्याला शासन झालंच पाहिजे, असा त्यांचा निश्चय होता. तसं पहायला गेलं तर ते फक्त दोघेच बंधू होते. जवळ काही सैन्य नाही काही नाही. रावण केवढा बलाढ्य होता. सुवर्णाची लंका नगरी आहे. कोट्यावधी राक्षस त्याचे नोकर आहेत. इंद्राचासुद्धा पराजय करणारा मुलगा आहे. किती त्याच्याकडे सामुग्री आहे. पण रामचंद्रांजवळ निराशा नाही. भारतवर्षामध्ये निराशेला जागा नाही. शास्त्रदृष्टीने धर्माधर्माचा विचार झाला तरच आशावादी दृष्टी उत्पन्न होते. आम्ही आतापर्यंत जे वागलेले आहोत त्याचे फळ आता जरी मिळाले नाही तरी ते पुढे मिळणार आहे. कारण देह म्हणजे मी नाही. देहात राहणारा मी या ठिकाणी बदलून आलेला आहे. इथून माझी बदली होणार आहे. इथे केलेल्या कर्मामुळेच बदली झाली की नाही! चांगला वागला तर प्रमोशन मिळेल. देहापेक्षा मी वेगळा आहे, मी अजरामर आहे, हा मोठा सिद्धांत भगवद्गीतेच्या आरंभाला भगवंतांनी सांगितला आहे.

अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ता: शरीरिणा: ।
अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥

तू पुण्यकर्म, सत्कर्म केलं पाहिजेस. शरीराकडे लक्ष देऊ नकोस. शरीर केव्हातरी पडणार आहे. पण शरीरात जो तू आलेला आहेस, तो तू नित्य आहेस. अजरामर आहेस. तेव्हा कीर्ती मिळव. चांगली उन्नती करून घे.

अर्जुनाला उपदेश करताना भगवंतांनी हा सिद्धांत मुद्दाम सांगितला की देहाकडे लक्ष देऊन तू वागू नकोस. देह हे माध्यम आहे. ह्या देहामध्ये राहून जो ईश्वराच्या आज्ञेने चांगलं वागेल त्याला त्याचं फळ निश्चित मिळेल. कारण फळ देणारा सर्वशक्तीसंपन्न आहे. ईश्वर सर्वज्ञ आहे. तो फळ देणारा आहे ही जर निष्ठा असेल आणि देहापेक्षा मी निराळा आहे हे जर कळलं तर ज्ञानमार्गामध्ये जास्तीजास्ती उन्नती होत जाईल. कितीतरी शरीरं मिळाली आणि गेली तरी मी माझी बुद्धी, माझं मन घेऊनच त्या शरीरामध्ये जाणार आहे. ते मन, ती बुद्धी जर मी चांगली बनवली असेल तर नवीन शरीरात गेलो तरी तेथे माझा हाच प्रयत्न राहील. आपल्या भारतीय वैदिक संस्कृतीमध्ये हा जो पुनर्जन्मवाद आहे त्यातच आशा आहे. तेव्हा हा जो जीवात्मा आहे तो अजरामर आहे. शरीरं बदलणारी आहेत. हे सगळे सिद्धांत भगवतगीतेत आलेले आहेत. जीवात्म्याने धर्माचरण करावं. ईश्वराची भक्ती करावी. त्याच्या भक्तीने साधनमार्गात येणारे सर्व प्रतिबंध दूर करून घ्यावेत. प्रतिबंध पुष्कळ येतात. आपल्या मनाने आपण एखादी गोष्ट करायची ठरवली तरी शरीर ताब्यात पाहिजे ना! पण शरीर ताब्यात राहात नाही. ऋतुमानात बदल झाला म्हणजे प्रकृती बिघडू शकते. त्यामुळेही उपासनेमध्ये खंड पडतो. हे सगळे प्रतिबंध दूर करण्याकरता ईश्वराची उपासना सांगितली आहे. जीवात्म्याने प्रयत्न केला, ईश्वराची भक्ती केली तर ईश्वरही त्याला सहाय्य करतो. त्याच्या उपासनेतले प्रतिबंध दूर करतो. त्याच्या इच्छेप्रमाणे ईश्वर फळ देतो. मानवाने इच्छा कोणती करायची हे ठरविण्याकरतासुद्धा ईश्वराची कृपा पाहिजे. मनाच्या, बुद्धीच्या चंचलतेमुळे कोणतं सुख आपण घ्यायचं हे देखील आपल्याला समजत नाही. म्हणून ज्यांनी स्थिर बुद्धीने ईश्वराची कृपा संपादन करून घेतली आहे त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागल्यानंतर आपल्याला कोणतं सुख पाहिजे हे समजतं. मग त्या सुखाची साधनं कोणती ते समजून घेऊन त्याप्रमाणे आपला साधनाभ्यास सुरू होतो.

*******

मानवजन्म प्राप्त झालेला असतांना काहीतरी ईश्वराची सेवा घडावी, आपली सर्व पापं नष्ट व्हावीत, ईश्वरकृपेला आपण प्राप्त व्हावं हे सर्व संतमहात्मे सांगतात. त्याप्रमाणे त्यांनी ईश्वराची सेवा करून जन्माचं सार्थक करून घेतलेलं आहे. ईश्वराचं कार्य कसं होतं? तर भगवंतांनी अर्जुनाला जो उपदेश केलेला आहे, त्यात सांगितलं की, ''ददामि बुद्धीयोगंतं'' मी बुद्धी देतो. मानवाला मी स्वतः बुद्धी देतो. ही एक ईश्वराने दिलेली बुद्धी वेगळी आहे. ''बुद्धी कर्मानुसारिणी'' असाही एक सिद्धांत आहे. पूर्वी पाप-पुण्य जसं करून आपण आलो, त्याप्रमाणे आपली बुद्धी तिकडे प्रवृत्त होते. परंतु ईश्वराची ज्याच्यावर कृपा आहे त्याला उत्तम बुद्धी प्राप्त होते. दैवीसंपत्ती म्हणून ज्याला म्हटलेलं आहे ती ईश्वराच्या कृपेने प्राप्त होते. प्रल्हाद पाच वर्षांचा होता आणि त्याचा पिता हिरण्यकश्यपू त्रैलोक्याचा राजा होता. सर्व विश्व त्यांच्या ताब्यामध्ये होतं. परंतु प्रल्हादाची मन:स्थिती वेगळी होती. परमेश्वराचं सारखं भजन करावं असं त्याला वाटायचं. प्रल्हादाच्या अंत:करणामध्ये नारद महर्षींनी प्रेरणा केली होती. नारदांचे शिष्य प्रल्हादजी. पहिलं नाव आहे त्यांचं भक्तांमध्ये. ईश्वराची कृपा संपादन करण्याकरता हा जन्म आहे हा त्याचा पक्का निश्चय झाला होता. हिरण्यकश्यपू जो त्याचा बाप, तो त्याच्या विरुद्ध आहे. देवाचं भजन बिजन काही करायचं नाही म्हणाला. ''मी कोण आहे तुला माहीत आहे की नाही? संपूर्ण त्रैलोक्यात माझी आज्ञा कोणीही भंग करू शकत नाही. मी इतका मोठा असतांना तू माझ्या आज्ञेच्या विरुद्ध कसा वागतोस?'' प्रल्हादजींनी उत्तर दिलं आहे, '' पिताजी सर्व त्रैलोक्य जिंकलं आहे असं आपण म्हणता, पण स्वत:चं मनसुद्धा आपण जिंकलेलं नाही.'' हे ऐकून त्यांनी प्रल्हादाचा पुष्कळ छळ केलेला आहे. सगळी शस्त्रास्त्रे वापरली पण काही उपयोग झाला नाही. हिरण्यकश्यपू म्हणाला, ''मुलगा बिलगा मी काही जाणत नाही. मुलाला सुद्धा मी ठार मारीन.'' पण मारू शकला नाही. जी निर्भयता त्या मुलाच्या ठिकाणी उत्पन्न झालेली आहे ती मोठी आहे. वेदव्यास महर्षींनी प्रल्हाद चरित्रात वर्णन केलेलं आहे. ते म्हणतात की ही निर्भयता जी बुद्धीमध्ये निर्माण झाली ती ईश्वराने दिलेली आहे. ईश्वराच्या कृपेने बुद्धी निर्भय होते. 'अभयंसत्वसंशुद्धि:' - भगवतगीतेमध्ये अभय हे दैवी संपत्तीचं पहिलं लक्षण सांगितलेलं आहे. दैवी संपत्तीच निर्भय असते. भगवंताचा भक्त निर्भय असतो. कुणीही कितीही त्रास दिला तरी त्याच्या मनावर परिणाम होत नाही. निर्भयपणाने आपलं जे कर्तव्य आहे ते तो करत राहतो. प्रल्हादाची निर्भयता अशी की शेवटी त्याच्या पित्याचाच नाश झाला.

आपली बुद्धी चांगली व्हावी म्हणून रोज देवदर्शन करणं, काहीतरी थोडंसं नामस्मरण करणं हे झालं पाहिजे. अभ्यास करून चांगले ग्रंथ आपल्या वाचनात राहिले तर त्याच्या योगाने आपलं मन शुद्ध, पवित्र होऊन जातं.

*******

ययाती राजा हा यदुचा पिता. ययातीला शुक्राचार्यांनी शाप दिल्यामुळे वृद्धापकाळ प्राप्त झाला. तो शुक्राचार्यांना शरण गेला आणि म्हणाला, ''माझ्या विषय वासना अद्यापि आहेत आणि मी वृद्ध झालो.'' शुक्राचार्य म्हणाले, ''जर तुझ्या मुलांपैकी कोणी तुला आपलं तारुण्य देत असेल तर ते तू घे आणि तुझं वृद्धत्व त्याला दे.'' शर्मिष्ठेचा कनिष्ठ मुलगा पुरू, तो म्हणाला, ''मी तुमचं वृद्धत्व घेतो. माझं तारुण्य तुम्ही घ्या आणि राज्य करा.'' नंतर ययातीने पुष्कळ वर्ष राज्य केलं आणि आपल्याला उपयोगी जो मुलगा पडला आहे त्याला म्हणजे पुरूला राज्य देऊन तो वनात जायला निघाला. वास्तविक राज्य ज्येष्ठ मुलगा यदु, त्याला मिळायचं पण ते त्याला मिळालं नाही म्हणून त्याला दुःख झालं. यदु रानामध्ये निघून गेला. तिथे भगवान दत्तात्रेय एका झाडाखाली पडलेले त्याला दिसले. पूर्ण शक्ती आहे त्यांच्याजवळ पण त्या शक्तीची त्यांना आठवणही नाही. स्वस्थ पडून होते. यदुराजाला त्यांच्याजवळ गेल्यावर आनंद वाटला. नमस्कार करून त्यांनी विचारलं, ''महाराज आपण इकडे झाडाखाली का पडून राहिलात? तुमच्या जवळ काही पात्र नाही, काही सामग्री नाही. तरी आपण सुखात आहात, आनंदात आहात. इतका आनंद तुम्हाला कसा मिळाला?'' त्यांनी उत्तर दिलं आहे यदुराजाला, ''सुख म्हणजे आत्मरुप आहे. आत्मा हा असंग आहे. स्वतःच्या स्वरुपाचा तो आनंद आहे. बाहेरच्या संग्रहाने, धन संग्रहाने वगैरे जे काही सुख मिळतं ते नश्वर आहे. धन संपलं की सुख संपलं. मी कसलीही इच्छा करत नाही. इच्छा करून प्रयत्न करणारे सर्व जीव दुःखामध्ये सापडलेले आहेत. पूर्ण सुख त्यांना मिळत नाही. म्हणून मी काहीही करायचं नाही असं ठरवलं आहे.'' गुणातीत अवस्था आहे ही. पूर्ण ज्ञानसंपन्न आहेत भगवान. हे ज्ञान त्यांना कसं मिळालं त्याकरीता २४ गुरुंची कल्पना त्यांनी सांगितली. ''मी म्हणाले २४ गुरु केले ज्ञान मिळवण्याकरता. गुण कोणता आणि दोष कोणता हे दोन्ही समजलं पाहिजे. दोष टाकण्याकरता समजला पाहिजे आणि गुण घेण्याकरता समजला पाहिजे. 'हेयोपादेय विवेक' म्हणतात याला. हेय काय? टाकायचं काय? घ्यायचं काय? हेच समजत नाही आपल्याला. आपल्या मनाचा निश्चय पूर्ण कधीच होत नाही. तो विवेक पक्का झाला पाहिजे.'' तो विवेक पक्का होण्याकरिता म्हणून त्यांनी २४ गुरुंची कथा सांगितली. पृथ्वी, जल वगैरे पंचमहाभूतं हेही गुरुच आहेत. त्यांच्यात काय काय गुण आहेत ते त्यांनी सांगितलं. ''जो जो जयाचा घेतला गुण । तो तो मी गुरु केला जाण ॥'' अशी एकदा बुद्धी निर्माण झाली म्हणजे काही आपल्याला घरदार सोडून जाण्याचं कारण नाही. ज्याचे जे गुण असतील ते घ्यायचे, दोष असतील ते सोडून द्यायचे. उपेक्षा करायची. यदू राजाला हा उपदेश केला आणि कृतार्थही केलं.

*******

'सुहृद' ह्या शब्दाचा अर्थ आचार्य महाराजांनी, 'प्रत्युपकार निरपेक्षतया उपकारिणम् ।' असा केला आहे. ईश्वराला आपली पूजा करावी, आपल्यावर उपकार करावे, आपली सेवा करावी, अशी काही इच्छा नाही. त्यामुळे काहीही उपकाराची अपेक्षा नसताना उपकार करणारा हा परमात्मा आहे. हा वात्सल्यभाव आहे. हे आहे भक्त वात्सल्य! कोणत्याही प्रत्युपकाराची त्याला अपेक्षा नाही. या रूपाने भगवंताच्या स्वरुपाचं ज्ञान झालं म्हणजे शांती मिळते. ईश्वरस्वरुपाचं पूर्ण ज्ञान होण्याकरता म्हणून श्रवण, मनन, निदिध्यासन यांची आवश्यकता आहे. उपनिषद भाष्य आहे. संतमहात्म्यांचे ग्रंथ आहेत. त्यांचं श्रवण, मनन, निदिध्यासन अखंड चालू राहिलं पाहिजे. त्या श्रवण, मनन, निदिध्यासनालाही साधनचतुष्टय संपत्ती आरंभालाच सांगितलेली आहे. साधनचतुष्टय संपत्तीमध्ये शमाला प्राधान्य दिलेलं आहे. संपूर्ण वासना त्याग, म्हणजे शम असं आचार्य म्हणतात. मनातल्या वासना कमी झाल्या पाहिजेत. निर्वासन मन ज्याचं होतं तो खरा अधिकारी पुरुष आहे. निदिध्यासनाचा, श्रवणाचा, ईश्वरदर्शनाचा अधिकारी! निर्वासन अंत:करण होणं, मनामध्ये कोणतीही वासना न राहणं, ही भूमिका तयार झाल्याशिवाय श्रवण नाही. ही भूमिका तयार व्हायची तर त्याचं पूर्वांग आणि उत्तरांग त्यांनी सांगितलं आहे. तीव्र वैराग्य हे पूर्वांग आहे. त्यात शमादि साधनं आहेत. शमादि साधनं संपत्तीमध्ये 'उपरती' म्हणून एक आहे. शास्त्रज्ञ उपरती शब्दाचे दोन अर्थ करतात. एक पूर्ण व्यवहार निवृत्ती. व्यवहारातलं लक्ष पूर्णपणे बाजूला झालं पाहिजे. भागवतामध्ये एक कथा आलेली आहे. रहूगण नावाचा राजा आहे. त्याला जडभरत उपदेश करतात. आरंभाला त्याच्या शिपायांनी जडभरताला धरून आणलं. पालखी उचलायला लावली. तरी त्याला मानापमान काही वाटला नाही. पण हा केवढा ज्ञानी महात्मा आहे हे कळल्यावर रहूगण राजा शरण आलेला आहे. राजाने एक प्रश्न विचारला. ''व्यवहारापासून निवृत्त व्हायचं, संसार सोडून जायचं तर हा संसार खोटा आहे असं कुठे आहे? संसार खरा आहे की! खोटा असेल तर सोडून द्यायचा. संसार असल्यावर संसारसंबंध आहे.'' त्याने उदाहरण दिलं. पातेल ठेवलं आहे चुलीवर. खाली लाकडं पेटलेली आहेत. पातेल्यात पाणी आहे. लाकडं पेटल्यावर ते पातेलं तापतं, पाणी तापतं आणि त्यात तांदूळ घातल्यावर तांदूळ शिजून भात तयार होतो. त्याप्रमाणे देह, इंद्रिय, प्राण, स्थूल शरीर, सूक्ष्म शरीर यासर्वांशी संबंध ठेवणारा आत्मा, त्याला संसार नाही, सुखदु:ख नाही, असं कसं समजायचं? यावर जडभरताने उत्तर दिलं आहे, ''हे सगळं सत्य आहे असं गृहीत धरून तू प्रश्न विचारलेला आहेस. पण ही ज्ञानी माणसाची दृष्टी नाही. कारण त्याला संसाराविषयी सत्यत्व वाटत नाही. खऱ्या ज्ञानी महात्म्याच्या बाबतीत व्यवहार आणि तत्त्वविमर्श एकत्र राहू शकत नाहीत. तत्त्वविमर्शाच्या वेळेला व्यवहार संपलेला आहे. व्यवहार खरा समजून तू प्रश्न केलेला आहेस. जोपर्यंत मनामध्ये व्यवहाराविषयीं सत्यत्व बुद्धी आहे तोपर्यंत ज्ञान नाही. केवळ अध्ययनाने ज्ञान होत नाही. महात्मे जे आहेत त्या महात्म्यांना शरण गेल्याशिवाय, त्यांची कृपादृष्टी झाल्याशिवाय ज्ञान होणार नाही.'' तर ह्या दृष्टीने उपरती म्हणजे पूर्ण व्यवहार निवृत्ती किंवा उपरती म्हणजे संन्यास हाही अर्थ घेतलेला आहे.

*******

अनेक जन्म गेले, ईश्वराची उपासना झाली, कर्मानुष्ठानं केली म्हणजेच संतमहात्म्याची कृपा होते. असे संतमहात्मे थोडा वेळ का होईना एकदा भेटले, त्यांनी मार्गदर्शन केलं म्हणजे लगेच बोध होतो. आचार्य महाराजांनी साधनपंचकाच्या शेवटी सांगितलेलं आहे, 'एकान्ते सुखमाह्यताम्' - एकांतामध्ये आसनावर बसावं, मनामध्ये काही वासना नसाव्यात आणि सच्चिदानंद परमात्म्याच्या ठिकाणी अंत:करण स्थिर करावं. आपलं मन हे दृष्याच्या बाहेर जाऊ शकत नाही. मूर्त पदार्थ जगामध्ये आहेत. अमूर्त पदार्थ जगामध्ये नाहीत अशी आपल्या मनाची कल्पना झालेली आहे. पण अमूर्त अशाप्रकारचं जे अव्यक्त स्वरुप आहे ते, शब्दशास्त्रज्ञ जे महात्मे आहेत त्यांच्या वाक्यावरून समजून घेऊन श्रद्धेने त्याचं ध्यान करावं. श्रवण झालं, मनन झालं आता निदिध्यासन सांगत आहेत आचार्य महाराज या निदिध्यासनाच्या योगाने समाधीसिद्धी झाली म्हणजे पूर्ण आत्मा जो आहे, सच्चिदानंदपरमात्मा त्याचा साक्षात्कार करून घ्यावा. आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर शेवटी हे संपूर्ण जग बाधित होतं. समाधीसिद्धीने जगाचा नाश नाही असाही एक सिद्धांत आहे. जगाचा प्रवाह सारखा नित्य मानणारे लोक आहेत. परंतु जगाचा नाश होतो. हे ज्ञान 'वासुदेव: सर्वंम्' हे ज्ञान झाल्यानंतर होतं. सबंध जग संपलेलं आहे. जगाचा नाश झाला, अज्ञानही गेलं.

देहमुक्तीची अवस्था ही संन्यासी महात्म्यांकरता सांगितली आहे. खरा अधिकारी संन्यासी आहे. गृहस्थाश्रमी माणसाने वेदांत ऐकायचा नाही, असं नाही. चांगला वेदांताचा विषय श्रद्धेने ऐकला तर पापक्षय होतो. पण वासना क्षय होत नाही ना! पूर्वसंचित पुष्कळ आहे. क्रियमाणकर्म होतं आणि वासना जास्ती जास्ती वाढतात. अशा स्थितीमध्ये वासना क्षय कसा होणार? कर्म संपल्याशिवाय जन्म थांबणार नाही. जन्म नको असेल तर कर्म संपली पाहिजेत. कर्म संपण्याकरता कर्मयोग आहे, ध्यानयोग आहे, भक्तीयोग आहे, अष्टांगयोग आहे. हे सगळे उपाय शास्त्रकारांनी सांगिलेले आहेत. ज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ करून ठेवलेला आहे. पण त्यातली, 'एकतरी ओवी अनुभवावी' इथपर्यंत गेलं पाहिजे. पण आपलं मन तिथपर्यंत जात नाही. अनुभवात्मक ज्ञान व्हायला पाहिजे त्यासाठी चित्तामध्ये अहंकार न ठेवता श्रद्धेने पूर्ण मुमुक्षा धारण करायला हवी. चिंतन करायला हवं. चिंतन मननाचे दोन प्रकार सांगितलेले आहेत. एकट्याने मनन करणं किंवा बरोबरीची जी मंडळी असतील सहाध्यायी म्हणा, गुरु म्हणा त्यांच्याबरोबर विचार करणं हेही मननच आहे. आता तसं मनन प्रत्यक्ष ज्ञानराजांच्या बरोबर करण्याचं आपलं भाग्य नाही. म्हणून त्यांचं जे स्थान आहे त्या स्थानामध्ये जाऊन त्या ग्रंथाचं चिंतन करायला सुरवात केल्यानंतर त्यांच्याच प्रेरणेने बुद्धीमध्ये 'एकतरी ओवी अनुभवावी' ही वेळ येणार नाही, असं होणार नाही. परंतु त्यासाठी आस्था पाहिजे, श्रद्धा पाहिजे. ज्ञानराज म्हणतात, 'ऐसा कर्तृत्वाचा मदु । आणि कर्मफलाचा आस्वादु । याचे नाव बंधु । कर्माचा ॥' मी कर्म करतो, मला अमुक ज्ञान मिळालेलं आहे, या कर्माचं फळ मला मिळालं पाहिजे अशी कर्माभिलाषा असते. हाच बंध आहे म्हणतात ज्ञानराज. हा बंध गेल्याशिवाय अनुभव कसा यायचा ओवीचा ?

*******

अनुभवापर्यंत तत्त्वज्ञान झालं पाहिजे. शब्दाने तत्त्वज्ञान होतं. नाही असं नाही. शब्दप्रमाण त्याकरताच आहे. तत्त्व, अतत्त्व विचार करण्याकरता शब्दप्रमाण आहे. बुद्धी त्याला अनुरुप असावी एवढंच शास्त्रज्ञांचं सांगणं आहे. आचार्य महाराज म्हणतात, बुद्धी प्रमाण आहे, सर्व महर्षींनी बुद्धी प्रमाण मानलेली आहे. परंतु ती शास्त्रप्रमाणानुसारी असावी. 'संस्कृत' असावी असं त्यांचं म्हणणं आहे. केवळ बुद्धीने पूर्ण निर्णय करता येत नाही. पूर्ण बुद्धीचे महात्मे म्हणजे साक्षात् ईश्वररुपच झालेले असतात. तेव्हा ज्यांची बुद्धी अत्यंत स्थिर झालेली आहे, आत्मस्वरुपाकार झालेली आहे, अशा महात्म्यांचा जो संकल्प झालेला आहे, त्यांची दृष्टीसुद्धा इतकी शक्तीसंपन्न असते की ती ज्याच्यावर पडेल त्याचा सर्वही पापक्षय होतो. सत्पुरुष किंवा ज्ञानी महात्मा याला मोक्ष कसा मिळतो, हा एक विचार उपनिषदांमध्ये आलेला आहे. मुक्त होणं याचा अर्थ कर्म संपणं. सगळी कर्म संपल्यानंतर देहसंबंध संपला. नवीन देहाच्या संबंधाचं कारण काय? तर त्याने केलेली जी कर्म आहेत त्या कर्मांमुळे देहसंबंध येतो. त्याच्या कर्माप्रमाणे त्याला देह प्राप्त होतो, हा एक सिद्धांत त्यांनी मांडला. ती कर्म संपली, म्हणजे, कारणच नाहीसं झाल्यानंतर, देहरुपी कार्य होणारच नाही. अर्थात देहसंबंध संपला. देहसंबंध असेपर्यंत सुखदु:ख द्वंद्वाची जाणीव राहणार. तीही संपली, देहाचा संबंध संपल्यामुळे. देहसंबंधाला कारण असलेली सर्व कर्म संपून जाणं हे मुक्त पुरुषाचं स्वरुप आहे.

सर्व कर्म कशी संपणार हा एक मोठा प्रश्न आहे. परमात्म स्वरुपाचं प्रत्यक्ष ज्ञान, नुसतं शब्दज्ञान नाही, प्रत्यक्ष ज्ञान हे सर्व कर्मक्षयाला कारण आहे. सर्व कर्माचा नाश ज्ञानाग्नीने होतो असं सांगतात भगवान. जर सर्व कर्म संपवायची असतील तर आत्मज्ञान प्राप्त व्हावं लागतं. ते प्राप्त करून घेण्याकरता साधन म्हणजे बुद्धीची स्थिरता. बुद्धीची जरुरी जशी व्यवहाराकरता सांगितली जाते, त्याप्रमाणे मोक्षाकरतासुद्धा बुद्धीची जरुरी आहे. संसार आणि अपवर्ग म्हणजे मोक्ष, दोघांनाही बुद्धीची जरुरी आहे.

धीमान जो खरा आहे त्याला कोणताही जगामध्ये अविषय नाही. सगळ्या विषयांचं ज्ञान तो संपादन करू शकतो. पण त्या बुद्धीमध्ये चंचलता हा दोष आहे. चांचल्यापुढे अर्जुनासारख्यालाही हात टेकावे लागले. तो म्हणाला, 'माझं मन मी आवरू शकत नाही.' केवढी अस्त्रविद्या संपादन केली होती अर्जुनाने. शंकरांच्यापासून त्याला उत्तम विद्या मिळाल्या होत्या. संगीतविद्यासुद्धा अर्जुन शिकला. ईश्वराबद्दल अत्यंत श्रद्धा आहे, भक्ती आहे, गुरुभक्ती आहे, गुरुकृपा आहे, सगळं आहे. अशा अवस्थेमध्ये असणारा अर्जुन म्हणतो,

चञ्चलं हि मन: कृष्ण प्रमाथि बलवत् दृढम् ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥

मनाचा निग्रह फार कठीण आहे, हे अर्जुनाचे उद्‌गार आहेत. भगवान म्हणाले, ''हे खरं आहे. मन निग्रह करण्याला फार कठीण आहे. पण निग्रह करता येणार नाही असं नाही.'' भारतीय संस्कृतीमध्ये आशावाद फार आहे. अनेक प्रकारची साधनं सांगितलेली आहेत. त्या निरनिराळ्या साधनांचा अभ्यास करून आपल्या मनाची, बुद्धीची स्थिरता संपादन करणं हे मुख्य सांगितलेलं आहे. बुद्धीस्थैर्य हे आत्मज्ञानाला अत्यंत उपयोगी आहे.

*******

योगशास्त्रकार प्रयत्नवादी आहेत. प्रयत्नांनी सगळं साध्य करता येतं असं त्यांचं म्हणणं आहे. केवळ प्रारब्धावर ते अवलंबून राहिलेले नाहीत. संतमहात्म्यांनी जरी प्रारब्धाचा विचार मांडलेला असला तरी ईश्वराची शक्ती मोठी आहे एवढचं त्यांना सांगायचं आहे. 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' असं तुकाराम महाराज सांगतात म्हणजे ते प्रारब्धवाद मानतात, लोकांचा बुद्धीभेद करतात, असा आक्षेप घेण्याचं काही कारण नाही. त्या अनंताची शक्ती इतकी मोठी आहे की त्याला अनुसरावं लागतं. अपरिहार्य आहे. हा त्यांचा अभिप्राय आहे. ते निरहंकार झालेले आहेत. अहंकार त्यांच्या बुद्धीतून पूर्णपणे निघून गेलेला आहे. त्याशिवाय पूर्ण शक्ती, पूर्ण ज्ञान प्राप्त होणं शक्य नाही. तुकाराम महाराजांची सर्व अभंग गाथा बुडवून टाकली इंद्रायणी नदीमध्ये आणि तुकाराम महाराज तेथे अन्नपाणी टाकून बसले. पुढे दहा-बारा दिवसांनी जशाच्या तशा वह्या मिळाल्या असं आपण ऐकतो. म्हणजे तुकाराम महाराज,'आपले अभंग गेले, आपले अभंग गेले, ते मिळावे' असं म्हणत बसले होते का? आपण अभंग केले आहेत अशी त्यांची भावना होती का? ''आपुलीया बळे नाही मी बोलत । सखा कृपावंत वाचा त्याची ॥'' ही त्यांची बुद्धी आहे. निरहंकार बुद्धी आहे. कर्तृत्व आपलं नाही. अशी अहंकाररहित बुद्धी ज्यांची आहे ते सर्वसंकल्प संन्यासी असतात. कधीही कशाबद्दलही संकल्प करायचा नाही. अशा महात्म्यांच्या मनामध्ये जर त्या शिष्याबद्दल संकल्प निर्माण झाला तर ते शिष्याचं भाग्य आहे. 'तुल्य निंदा स्तुती' हे त्या महात्म्यांचं वर्णन. त्यांना स्वत:च्या मानापमानाची काही अपेक्षा नाही. पण त्या शिष्याची सेवाबुद्धी, शुद्धबुद्धी पाहून त्यांच्या मनामध्ये संकल्प उत्पन्न झाला. तो सत्यसंकल्प आहे. मग त्या शिष्याच्या बुद्धीतील कामक्रोधादिक विकार नाहीसे होऊन त्याची बुद्धी स्थिर होते. ज्ञानाचा अभ्यास सुरू होतो. तो स्वरुपानुसंधान करु लागतो. ध्यानापेक्षा पुढची समाधी अवस्था त्याला प्राप्त होते व त्याचं पर्यवसान म्हणजे प्रत्यक्ष साक्षात्कार. तो नंतर होतो.

*******

संसार देवाचा आहे, ही भावना होणं हे अहंकार कमी झाल्याचं चिन्ह आहे. तुकाराम महाराज ह्यालाच भक्ती म्हणतात. 'हेची थोर भक्ती आवडते देवा। संकल्पावी माया संसाराची' । संसार टाका असा त्याचा अर्थ नाही. माया कमी करा, आसक्ती कमी करा, म्हणजे अहंकार कमी करा. ममता कमी झाली पाहिजे. संकल्प विकल्पाने मनाचं जे काम वाढतं ते कमी झालं पाहिजे.

दुसरं म्हणजे मनाची अस्थिर अवस्था जाऊन निश्चयात्मक बुद्धीची अवस्था मिळाली पाहिजे. राजस, तामस, अहंकार कमी झाला पाहिजे. ईश्वराची भक्ती सोडायची नाही. वयाच्या पाचव्या वर्षी प्रल्हादजींच्या मनात, डोक्यावर टांगती तलवार असतानाही भगवत् भक्तीचा निश्चय पक्का झाला आहे. सबंध जगाचा स्वामी असलेला बापच त्याला मारण्याचा प्रयत्न करतो आहे. पण जगाचा स्वामी एकच आहे. ईश्वराशिवाय कोणीही जगाचा स्वामी असू शकत नाही, या विचारामुळे त्याच्या मनामध्ये निर्भयता आहे. त्यामुळे त्या सत्वाची शुद्धी इतकी झालेली आहे की गुरुजींनी त्याला विचारलं, " अरे तू भजन कशाला करतोस? बापाच्या विरुद्ध कशाला जातोस?" प्रल्हादजी म्हणाले, "गुरुमहाराज मी भजन करतच नाही. माझ्या बुद्धीला प्रेरणा करणारा तो अंतर्यामी परमात्मा आहे. बुद्धीला पाहणारा, द्रष्टा, प्रेरणा करणारा परमात्मा त्याच्याच इच्छेने माझं मन तिकडे जातं त्याला मी काय करु?" केवढी तयारी आहे! किती मन ताब्यात आहे! प्राण जाण्याची वेळ आली आहे पण मन तिकडे जात नाही. देहात्म बुद्धी संपलेली आहे. शुद्ध बुद्धी अंत:करणात उत्पन्न झाल्यावर देहात्म बुद्धी जाऊ शकते याचं हे उदाहरण आहे. पाच वर्षाच्या मुलाला मृत्यूची भीती नाहीये. त्याच्या शरीरावर शस्त्रप्रहार होताहेत पण त्याला काही लागतच नाहीये. संरक्षण करणारा परमेश्वर आहे ह्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतो आहे प्रल्हाद. ईश्वर संरक्षण करणारा आहे ही नुसती आस्तिक्य बुद्धी नाही तर त्याला त्याचा अनुभव आलेला आहे. त्या चक्रपाणीच्या इच्छेने सर्व चाललेलं आहे ही त्याची भावना आहे. "माझं संरक्षण करणंही त्याचंच कार्य आहे, माझा काही संबंध नाही." इतका अहंकार बाजूला झालेला आहे. तो इतका शुद्ध झालेला आहे की त्या शुद्धीमुळे सर्व कार्य चाललेलं आहे.

*******

रामाने अवतार कशाला धारण केला? रावणाला मारायला? रावणाला मारणं किती क्षुल्लक काम आहे. त्यासाठी अवतार कशाला घ्यायला पाहिजे? त्याचं कारण सांगताहेत भगवान् मारुतीरायांना. मनुष्यरुप धारण करून केवढं कार्य केलं रामचंद्रांनी! त्या कार्याचं नुसतं चिंतन जरी केलं तरी मनातला सगळा अहंकार जातो. कशाला अहंकार बाळगायचा? केवढे आम्ही खाली आहोत. जमीनअस्मानाचा फरक आहे आमच्यात आणि त्यांच्यात. कवी वर्णन करतात ते ऐकतांना सुद्धा किती आनंद होतो!

भगवान रामचंद्रांचं सामर्थ्य कवी सांगतो आहे - रामचंद्र आणि सीतामाई एकदा बोलत बसले असतांना एक कावळा त्या ठिकाणी आला आणि सीतामाईंना त्रास देऊ लागला. जवळच एक गवताची काडी पडलेली होती ती उचलून घेऊन, मंत्राने तिच्यावर अभिमंत्रण करून ती रामचंद्रांनी कावळ्याकडे फेकली. त्या कावळ्याला त्या काडीची इतकी भीती वाटली की संरक्षणासाठी सगळ्या विश्वात तो फिरून आला पण त्याला कोणीही अभय देऊ शकलं नाही. एका तृणावर अस्त्र प्रयोग केला, त्या तृणाने कावळ्याला जर्जर केलं शेवटी तो शरण आला. त्याचा एक डोळा काढून घेतला. तेव्हापासून कावळ्याला एकच डोळा आहे.

विश्वामित्र ऋषी रामलक्ष्मणांना बरोबर घेऊन निघाले. गौतमऋषींचा आश्रम ओसाड पडलेला आहे. तिथे एक शिळा पडलेली आहे. विश्वामित्र म्हणाले, ''रामा, या शिळेला पाय लाव.'' रामचंद्रांना या सांगण्याचा ,अर्थ काही समजेना. त्यांना वाटलं, ''पाय कशाला लावायचा?'' पण त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांनी शिळेला स्पर्श करताच गौतमऋषींची पत्नी अहिल्या त्या शिळेतून प्रकट झाली.

भरताला पादुका दिल्या. ''मी राज्य करणार नाही. राज्य करीन पण तुमचं राज्य म्हणून करीन'' असं भरताने सांगितलं. केवढा त्याग आहे हा! रामांना सुद्धा भरताच्या त्यागाचं वर्णन करावं लागलं. ते म्हणाले, ''भरता, माझ्यापेक्षाही तुझा त्याग मोठा आहे. मला अद्यापि राज्य मिळायचं होतं. राज्याभिषेक व्हायचं ठरलं होतं, पण तो झाला नाही. त्याच्या पूर्वीच मला वनात जावं लागलं. तुझ्या आईने तुझ्याकरता वर मागून राज्य मिळवून दिलं.'' ईश्वराने जरी मोहामध्ये टाकायचा प्रयत्न केला तरी भरताला मोह नाही. तो म्हणाला, ''आईची आज्ञा पाळली पाहिजे अशी तुमची आज्ञा आहे ना! त्या आईला मी आई म्हणायला तयार नाही. तुम्हाला वनामध्ये पाठवणारी ती माझी आई राहणार नाही.'' पण रामचंद्र म्हणाले,''भरता असं बोलणं योग्य नाही. मी जर सगळ्या वडील मंडळींचं ऐकतो तर तुला न ऐकायला काय झालं.'' भरताने विचारलं,''काय आज्ञा आहे?'' ''तू राज्य करावेस'' भरत म्हणाला, ''करतो. पण तुमच्या पादुका द्या.''

त्याने सिंहासनावर पादुका स्थापन केल्या. राज्य करणं हीसुद्धा उपासना आहे. संसार नीट करणं हीसुद्धा ईश्वराची भक्ती आहे. 'संकल्पावी माया संसाराची' एवढं मात्र साध्य झालं पाहिजे.

*******

कालमर्यादा सर्वांना आहे. कालरूप ज्याने धारण केलं तोच जीवाला त्या कालमर्यादेतून मोकळं करणार. किती वेळा जन्माला यावं लागलं, किती वेळा मृत्यू झाला, किती सुखदु:ख भोगावी लागली ह्याची सामान्य जीवांना कल्पना करता येणार नाही. काल अनंत आहे. नामरुपात्मक सगुण विश्व जे आहे, ते मनातून मिथ्या म्हणून काढून टाकायचं म्हणजे मनाची केवढी तयारी पाहिजे. कालमर्यादा, देशमर्यादा सगळी जायला पाहिजे. त्यासाठी मनाची फार मोठी योग्यता असायला हवी. मन अत्यंत शुद्ध झालं पाहिजे, अत्यंत स्थिर झालं पाहिजे. केवळ एक परब्रह्म आहे, सच्चिदानंद परमात्मा आणि चैतन्यरुपी जगदंबा एकच आहे, दुसरं काहीही नाही, हे मनात पक्क ठसलं पाहिजे.

हे नुसतं तोंडाने म्हणणं निराळं. काळाची मर्यादा घेऊनच आम्ही जन्माला आलो आहोत आणि ती घेऊनच आमचे आणखी किती जन्म जाणार आहेत कोणास ठाऊक! त्या मर्यादेच्या पलीकडे काही आपण जाऊ शकत नाही. आचार्य महाराजांनी काही साधनांचा अभ्यास करायला सांगितला आहे. ते म्हणतात, सगळं ज्ञान समजावून घ्या. वेद म्हणजे परमेश्वराचंच रुप आहे. 'शब्दब्रह्म' म्हणतात त्याला. ब्रह्म म्हणजे विचार. शब्दात्मक आहे म्हणून त्याला सर्वज्ञ म्हणतात. सर्वज्ञासारखा वेद आहे. वेद अनंत आहे. सर्वही ऋषीमंडळींचं वेदाभ्यास करणं हेच तप चालू आहे.

प्राणवायूवर (श्वासोच्छ्वासावर) आयुष्याची कल्पना झाली आहे. शंभर वर्षे आयुष्य सर्वसाधारणपणे मानवाचं समजलं गेलं आहे. शंभर वर्षात किती श्वासोच्छ्वास होतात याचं गणित किती मोठं होईल! एकवीस हजार सहाशे श्वासोच्छ्वास आपले रोज चालू असतात. आमचा श्वास कधीही बंद होत नाही. प्राणवायूची क्रिया अखंड चालू आहे. प्राणायामादिकांचा अभ्यास करणारे महर्षी आहेत. संध्येमध्येही प्राणायाम सांगितलेला आहे. संध्या करायलाच वेळ नाही तर प्राणायाम करायला वेळ कुठला होणार आम्हाला! प्राणवायूचा निग्रह साध्य झाला तर सर्व इंद्रियं आणि मनसुद्धा निग्रहीत होतं, असं प्राणशक्तीचं महात्म्य योगशास्त्रकार सांगतात. पण त्या प्राणशक्तीला ताब्यामध्ये घेणं फार कठीण आहे. प्राणाचा निग्रह करायचा म्हणजे सगळ्या इंद्रियांचा निग्रह करायचा आणि मनालाही स्वस्थ बसवायचं आहे. मनाला निश्चल, स्थिर करायचं आहे. पण मन कधीही स्थिर होत नाही आणि प्राणवायूही कधीच स्थिर नाही अशी आपली स्थिती असते. या दोघांच्यापैकी कोणाही एकाला स्थिर करता आल्यानंतर दुसराही स्थिर होतो. जोपर्यंत श्वासोच्छ्वासाच्या रुपाने प्राणवायुची हालचाल चालू आहे, तोपर्यंत मनाची अस्थिरता कायम आहे. प्राण स्थिर झाला म्हणजे मनही स्थिर होतं. अथवा विचार, विवेक, वैराग्यादि साधनांनी मन जर स्थिर झालं, ज्ञान समजावून सांगणारे महात्मे जर भेटले तर मनात उत्पन्न होणारे विकार, संशय वगैरे सर्व त्यांच्या मार्गदर्शनाने नष्ट होतात.

*******

कोणत्याही विषयाचं, पदार्थाचं ज्ञान आपल्याला ज्ञानेंद्रियानी मिळतं. डोळ्यांनी आपण भगवंताची स्थानं पाहतो. कानांनी भगवंताच्या लीला ऐकू शकतो. त्यामुळे काहीतरी संस्कार होतो की नाही? परिणाम होतो की नाही? त्या परमेश्वराचं चरित्र, लीला ऐकण्याचं साधन आम्हाला मिळालेलं आहे - श्रोत्रेंदिय त्याना म्हणतात. त्याने ते ज्ञान होतं. शब्द समजतो आणि शब्दांच्या द्वाराने अर्थ समजतो. इथे दोन प्रमाणं आहेत. एक प्रत्यक्ष प्रमाण आहे, शब्द ऐकण्याकरता कर्णेंद्रिय पाहिजे. ऐकायला यायला पाहिजे कानाने आणि त्या शब्दांचा अर्थ मनाला समजला पाहिजे. ही पुढची पायरी आहे. म्हणजे शब्द हा कानाच्या योगाने ऐकायचा आणि त्या शब्दाच्या योगाने अर्थाचं ज्ञान करून घ्यायचं. कानांनी फक्त शब्द समजतो. ईश्वराच्या सृष्टीमध्ये काय विलक्षण चमत्कार आहेत सगळे! श्रवणेंद्रियाने ऐकायचं म्हणजे फक्त शब्द ऐकायचा नाही तर त्या शब्दाच्या द्वाराने अर्थ समजावून घ्यायचा. श्रवण हे ज्ञानाचं पहिलं साधन सांगितलेलं आहे ना! नंतर मनाचा उपयोग आहे. मन हे इंद्रिय नंतर कार्य करणारं आहे.

भगवान अर्जुनाला सांगताहेत, '' मी महाकाल आहे. सर्व लोकांचा संहार मला या ठिकाणी करायचा आहे. माझा तसा संकल्प झालेला आहे. तेव्हा तू युद्ध कर आणि सोडून गेलास तरी हे लोक कोणीही जिवंत राहणार नाहीत. 'मी युद्धातून बाजूला झालो तर त्यांचा नाश होणार नाही'असं वाटणं हासुद्धा अहंकार आहे. ही दया नाही. मनाने तू विचार करतो आहेस, पण मी तुझ्यासमोर प्रत्यक्ष उभा राहून शब्दांनी तुला सांगतो आहे. माझं मूळ स्वरुप दाखवून तुला सगळी ओळख करून दिली तरीसुद्धा 'माझ्या मनाला हे पटत नाही' असं तू जर म्हणत असलास तर निघून जा. या लोकांना तू वाचविणारा नाहीस किंवा मारणाराही नाहीस'' हे त्याला पटवून दिलं. ऐकायला येतंय अर्जुनाला. कान आहेत. शब्द ऐकायला येत आहेत. आणि त्या शब्दांचा अर्थ त्या शब्दांतूनच निघतो आहे.''सर्व लोकांचा क्षय करणारा मी काल आहे. मी आज सर्वांचा नाश करणार आहे कालरुपाने!'' हे स्वत: भगवान् सांगत आहेत, हे काय अर्जुनाला समजत नाही? कान या माध्यमातून शब्द ऐकायला आले आणि शब्दांच्या माध्यमातून, 'मी सर्वांचा संहार करणार आहे.' हे शब्दार्थ ज्ञान त्याला झालेलं आहे. भीष्म, द्रोण कोणीही राहणार नाहीत, हे समजलेलं आहे अर्जुनाला. परंतु त्याच्या मनाने तक्रार केली, ''असं कसं शक्य आहे? एवढे अतिरथी, मोठमोठे वीर सगळे जाणार म्हणता तुम्ही युद्धामध्ये? आणि मी युद्ध सोडून गेल्यानंतर जाणार?'' हा अर्जुनाचा अहंकार आहे. 'मीच मोठा आहे, मी युद्धातून बाजूला झालो तर हे जिवंत राहतील. अहिंसा परमो धर्म:' हे सर्व अर्जुन आपल्या मनानेच ठरवतो आहे. धर्माधर्माचा विचार करणारी एक मोठी शक्ती अर्जुन आपल्या डोळ्यांनी पाहतो आहे. त्या विश्वरुपी परमात्म्याचं सामर्थ्य तो प्रत्यक्ष पाहतो आहे. हजारो नेत्र आहेत, हजारो मुखं आहेत, जिकडे पहावं तिकडे ते विश्वरुप आहे. पण विश्वरुप परमात्म्याच्या विश्वरुपातच माझा अंतर्भाव असल्यामुळे मीही त्याच्याच रुपात अंतर्भूत आहे. हा विचार त्याच्या मनामध्ये येत नाही याचाच अर्थ तो अहंकार त्याला परमेश्वराच्या रूपापर्यंत जाऊ देत नाही.

*******

वेद बुद्धीमध्ये असलेले दोष नाहीसे करतात. मेधा म्हणजे 'धारणावति मेधा'! म्हणजे अभ्यास केलेलं ज्ञान बुद्धीमध्ये स्थिर होणं. पण आपल्याला विसर पडतो. किती अभ्यास करायचा? जन्मभर अभ्यास केला तरी बुद्धीमध्ये काही राहणार नाही. स्मरण राहिलं पाहिजे अखंड, अशी बुद्धी बनवायची आहे. ही बुद्धी बनविण्यासाठी लागणारे संस्कार करायची योजना वेदांनीच सांगितलेली आहे आणि मुख्य म्हणजे आपल्या मनामध्ये अत्यंत शुभ वासना असल्या पाहिजेत. संपूर्ण वेदांचं अध्ययन करून त्याप्रमाणे आचरण करणाऱ्यांची इच्छा पूर्ण होणार नाही का? ते उपाशी राहतील का? मंत्रामध्ये असणाऱ्या विलक्षण शक्तींचा आज आम्हाला अनुभव नाही. तो अनुभव घेण्यासाठी सर्वप्रथम शरीर शुद्ध पाहिजे. शरीर शुद्ध राहण्याकरता अन्न शुद्ध पाहिजे. अन्नाने मन बनतं. पवित्र आहार घेतल्याने मनातलं किल्मिष जातं. भगवान् मुद्दाम सांगतात,

'यज्ञशिष्टाशिन:सन्तो मुंच्यंते सर्व किल्मिषै:'

म्हणजे यज्ञातून शिष्ट जो आहार असेल तो घ्यावा. त्यामुळे सर्व किल्मिष म्हणजे दोष जातात. मन शुद्ध होतं. आहार शुद्ध असला म्हणजे अंत:करण शुद्ध होतं आणि मग ते शुद्ध अंत:करणच वेदज्ञान मिळवून त्याप्रमाणे आचरण करण्याकडे लक्ष देतं. मनात अशा वेदमंत्रांबद्दल अत्यंत आदरभाव ठेवून निग्रह केला तर त्याचं फळ मिळतं.

सद्गुरु वासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांच्या चरित्रात अशी एक गोष्ट वाचली असेल पुष्कळांनी. त्यांचं नुकतंच उपनयन झालं होतं. आणि वेदाध्ययनाला सुरुवात झाली होती. पण त्या वयातही वेदमंत्रांची शक्ती त्यांनी मिळवली होती. वेदाध्ययन तर पूर्णही झालं नव्हतं. गणपतीचे उत्सव असायचे. कोकणामध्ये लांब लांब लोक रहायचे. रात्री गणपतीच्या आरतीला मंत्रपुष्पांजलीला जाऊन मंडळी आपल्या घरी परत जात. अशीच काही मित्रमंडळी घेऊन महाराज निघालेले आहेत. अचानक एक नाग वाटेत आला. महाराजांनी हातात माती घेऊन मंत्र म्हणून त्या नागाच्या सभोवती टाकली. तो नाग तिथेच थांबला आणि ही मंडळी पुढे निघून गेली. जिथे गणपतीच्या आरतीला जायचं होतं तिथे जाऊन परत येताना त्या नागाबद्दल ते विसरून गेले. महाराज घरी परत आले आणि दुसऱ्या दिवशी एकदम त्या नागाची त्यांना आठवण झाली. लगेच ते तिथे गेले आणि बघतात तो नाग त्याच ठिकाणी होता. हातात माती घेऊन महाराजांनी जे अभिमंत्रण केलं होतं त्याच्या बाहेर तो नाग येऊ शकत नव्हता. महाराजांनी पुन्हा त्या मंत्राचा उपसंहार केला. म्हणजे त्या मंत्राचे जे सामर्थ्य आहे ते काढून घेतलं. एकदम जागा मोकळी झाली आणि तो नाग निघून गेला. म्हणजे आठ-दहा वर्षांच्या वयातच वेदाध्ययन चालू असताना सुद्धा वेदमंत्रांमधलं सामर्थ्य दाखवून दिलं महाराजांनी. दाखवून देणारा तसा पाहिजे आणि ते समजून घेणारी बुद्धी अत्यंत शुद्ध पाहिजे. निष्ठा पाहिजे. सगळ्यामध्ये निष्ठेला अतिशय महत्व आहे.

*******

ईश्वराने जे निरनिराळे अवतार धारण केले आहेत त्या स्वरुपाच्या ठिकाणी ज्ञानी मनुष्याची निष्ठा जन्मजन्मांतरीची असते. 'बहुत सुकृताची जोडी' म्हणजे अनेक जन्मांचं सुकृत आहे, एका जन्माचं नाहीये, त्यामुळे ती आवड आहे, ती वासना आहे - ते स्वरूप आपल्या डोळ्यांसमोर निरंतर असावं. ब्रह्मसुख आणि सर्वही सुख ह्याच ठिकाणी आहेत ही भावना दृढ आहे. म्हणून दुसऱ्या सुखाकडे मन जाऊ शकत नाही.

वेदान्त तत्त्वज्ञान हे खरं आहे, नाही असं नाही. परंतु त्या वेदान्त तत्त्वज्ञानाच्या भूमिकेपर्यंत जाणारे आचार्य महाराज हे सुद्धा, 'शरण्यो लोकेशो मम भवतु कृष्णोऽक्षि विषयः ।' असं म्हणतात. म्हणजे भगवान श्रीकृष्ण हे माझ्या डोळ्यांसमोर येऊ देत; ते मला दिसावेत ही इच्छा ते करत आहेत. त्यांचं शुद्ध ब्रह्मस्वरूप त्यांना माहीत आहे, पण 'मला कृष्णांचं दर्शन पाहिजे' ही जी प्रेमभावना अंतःकरणामध्ये आहे ती कशाला घालवायची?

ज्ञानी मनुष्याजवळ आग्रह नाहीये. बुद्धीमध्ये जे जे संस्कार दृढ झालेले आहेत, पक्के झालेले आहेत, त्या त्या संस्कारांप्रमाणे ती बुद्धी, ते मन, त्या त्या वेळेला, त्या त्या स्वरूपाकडे जातं. सगुणाकडे जाईल. निर्गुणाकडेही जाईल. ते मन इतकं समर्थ बनलेलं आहे की ते मोकळेपणाने कोणत्याही स्वरूपाकडे जाऊ शकेल. अनेक जन्मांची पुण्याई आहे. कर्म झालेलं आहे. भक्तीचा अभ्यास झालेला आहे. ज्ञान झालेलं आहे, सगळं झालेलं आहे. अंतरंग साधनं, बहिरंग साधनं, बाह्यपूजा, अंतःपूजा हे जे उपासना मार्गामध्ये सांगितलेलं आहे ते सगळं त्यांचं झालेलं आहे. त्यामुळे निर्गुणापर्यंत जाणारी त्यांची बुद्धी सगुणापर्यंत आल्यानंतर त्यांना वाईट वाटत नाही.

आम्ही अज्ञानी जीव आहोत. 'निर्गुण श्रेष्ठ', असं एकाने म्हणायचं तर एकाने 'सगुण श्रेष्ठ' म्हणायचं. सगुण श्रेष्ठ आहे कारण आचार्य महाराज कृष्णांचं दर्शन व्हावं म्हणून स्तोत्र करताहेत. हा पुरावा आम्ही द्यायचा. वादाशिवाय आमच्याजवळ काहीच नाही. सगुणामध्येही राहू शकत नाही आमचं मन, निर्गुणात तर नाहीच नाही.त्याला किती जन्म लागतील सांगता येत नाही. निर्गुण श्रेष्ठ की सगुण श्रेष्ठ हे सगळं कशाकरता? आनंदस्वरूप परमात्मा सगुण आहे आणि तो निर्गुणही आहे. असेना कोणतंही रुप! जो आनंद आहे तो आनंद सगळीकडे समान आहे.

पण ज्ञानी महात्म्यांची भूमिका वेगळी आहे. ते आग्रहाच्या पलीकडे गेलेले आहेत. बुद्धीला जे योग्य वाटेल ते घ्यायला हरकत नाही. 'जे जे भेटिजे भूत । ते ते मानिजे भगवंत ।' म्हणजेच सर्व भूते भगवत स्वरूप आहेत ही सुद्धा एक श्रेष्ठ भूमिका आहे. 'ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या' हाही सिद्धांत आहे. आचार्य महाराजांचा हा सिद्धांत ज्ञानेश्वर महाराजांनी चांगदेव पासष्टीच्या सुरुवातीलाच मांडला आहे. आणि चिद्विलासही सांगत आहेत. तर आग्रह ज्या बुद्धीमध्ये नाही, ते कसे सांगतात, कसे बोलतात, त्याप्रमाणे आपण होण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

*******

काल हा सुद्धा सृष्टीला एक कारण आहे. अधर्माची बुद्धी काही कालामध्ये वाढत असते. धर्मबुद्धीही वाढत असते. काही काल धर्माला अनुकूल असतो. काही काल अधर्माला अनुकूल असतो. अधर्माचरणाचे आणि धर्माचरणाचे फल देणारा तोच काल असतो. ऋषीमंडळींनी धर्माचरण केलं ते फुकट गेलं असा त्याचा अर्थ नाही. ते धर्माचरण अत्यंत शुद्ध धर्माचरण आहे. त्यांनी देहतादात्म्य सोडून धर्माचरण केलं. त्याशिवाय धर्माचरण होणारच नाही. परलोक आहे, इहलोकाचा त्याग आपल्याला केव्हांतरी करायचाच आहे मग, 'देह म्हणजे मी नाही. हा देह इथेच राहणार आहे. हा देह सोडून आणखी कुठेतरी जाणं मला अत्यंत आवश्यक आहे, मला गेलंच पाहिजे, जावं लागेल, तिथूनही आणखी पुढे प्रवास करायचा आहे.' हे जाणून तिथे मला सुख मिळावं यासाठी केलेला प्रयत्न दीर्घदृष्टीचा नाही का? शास्त्र हे दीर्घदृष्टी दाखविणारे आहे. 'आता काही सुख मिळालं तर ते मिळवावं, वाढवावं, नीतीअनीतीचा काही विचार करण्याची जरूरी नाही.' हे विचार तात्कालिक सुखाकरता आहेत. इथे दीर्घदृष्टी नाहीये. पुढे आपलं कसं होणार? शरीर हे साधन आहे, धन हे साधन आहे हे विसरूनच जातो आपण. हे साध्य आहे अशीच आमची बुद्धी झाली आहे. धनच पुष्कळ पाहिजे, शरीरच कायम राहिलं पाहिजे असं आम्हाला वाटतं. शरीर, धन यांचा उपयोग आपल्याला पुढच्या सुखासाठी करून घायचा आहे हा विचारचआपल्या मनांत येत नाही. म्हणून ऋषीमंडळी देहतादात्म्य सोडून धर्माचरण करतात. धर्माचरण करणाऱ्या मनुष्याची बुद्धी आणि धर्माचरणापासून बाजूला राहणाऱ्या, नेहमी अधर्माचरण करणाऱ्याची बुद्धी याचा विचार केला पाहिजे. देहतादात्म्य वाढवून अधर्माचरण करणारा मनुष्य भित्रा असतो. आपल्या कर्तव्यकर्माची जाणीव असणारे क्षत्रीय, देहतादात्म्य कमी झाल्यामुळे युद्धभूमीवर जातात. देह पडला तरी हरकत नाही ही निर्भयता त्यांच्याकडे आहे.

अनंत जीव या जगामध्ये आहेत. चांगलेही आहेत, वाईटही आहेत. दैत्य आहेत ते आपल्या बुद्धीप्रमाणे कार्य करणार. त्यांची बुद्धी देहतादात्म्य होण्यापुरतीच आहे आणि याच देहाला म्हणजे आपल्याला सगळी सुखं मिळाली पाहिजेत असं त्यांना वाटतं. सर्व कार्य कालरूपाने परमात्मा करतो. संकटं आली तरी जातात. अनुकूल परिस्थिती आली तरी ती सुद्धा जाते. जाणं, टिकाऊ नसणं हे सुखाच्या ठिकाणी आहे आणि दुःखाच्या ठिकाणीही आहे. 'सुखदुःखे समेकृत्वा' याचा अर्थ काय? दुःखाच्या वेळेलाही सुख मानायचं असा याचा अर्थ घ्यायचा का? किंवा सुखाच्या वेळेस, 'मी दुःखात आहे' असं दाखवायचं का? **सम** याचा अर्थ असा आहे की, सुख मिळालंय आज त्याच्यामध्ये आनंद मानून उपयोग नाही. ते जाणारं आहे, टिकाऊ नाही. भगवान म्हणतात,

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्ण सुखदुःखदाः।
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥

सर्व अनित्य आहे. सुख जाणार आहे आणि दुखःही जाणार आहे. सुख मिळालं म्हणजे अहंकारादिक विकार वाढतात आणि ते वाढले म्हणजे रागद्वेष वाढतात. सुख टिकवण्याकरता पुन्हा प्रयत्न केला जातो. प्रयत्न करूनही सुख जाणारच. ज्याला उत्पत्ती आहे त्याचा नाश ठरलेला आहे.

*******

वेदव्यास महर्षींनी अनेक प्रकारची पुराणं केली. शिवमहात्म्य, शिवपुराण, विष्णुचं महात्म्य सांगणारं विष्णूपुराण. त्या देवतांनी कोणकोणते अवतार धारण केले आणि ते अवतार धारण करायला लावणारे भक्त कोण या दोघांचीही चरित्रं सांगितलेली आहेत. सर्वांनी श्रवण करावं असं ईश्वराचं चरित्र आहेच आहे. त्यामुळे प्रेम निर्माण होतं. ईश्वरभक्तांची चरित्र वेदव्यासांनी वर्णन केली आहेत तसंच ''देवीभागवत'' त्यांनी जनमेजय राजाला सांगितलेलं आहे. त्याच्यामध्ये देवीच्या अवतारांचं वर्णन केलं आहे. जगामध्ये अशी विविधता ईश्वरानेसुद्धा धारण केलेली दिसते. भक्तांच्या मनांत प्रेम आहे पण प्रेमाचं प्रतीक मात्र प्रत्येक भक्ताचं वेगवेगळं आहे. भगवंतांची गोपींच्या बरोबर रासक्रीडा चाललेली असतांना गोपींना थोडासा अहंकार झाला की, ''सर्वही जगामध्ये आम्ही श्रेष्ठ आहोत. भगवान गोपालकृष्ण आमच्या ताब्यात आहेत.'' हे कळल्यावर भगवंत एकदम गुप्त झाले. हा अहंकार गेला पाहिजे. ईश्वराच्या सान्निध्यात जायचे म्हणजे समीपता मुक्तीच आहे. सलोकता, समीपता, स्वरूपता आणि सायुज्य असे मुक्तीचेही शास्त्रकारांनी भेद सांगितले आहेत. उपासना करणारे भक्त त्या उपास्य देवतेच्या लोकामध्ये जाऊन राहू शकतील. तिथेही रोज दर्शन घडेल असं नाही. पण वास्तव्य त्या लोकांमध्ये होतं. उदाहरणार्थ वैकुंठ लोक, कैलास पर्वत. देवीलोकामध्ये मणिद्वीप पर्वतावर भुवनेश्वरीचं वास्तव्य आहे. त्या लोकांमध्ये राहिले तरी पुष्कळ कल्याण आहे ना! मनाला समाधान आहे. केव्हांतरी दर्शन घेण्याचा संभव आहे.

पण त्याच्याहीपेक्षा समीपता ही महत्वाची मुक्ती आहे. देवाच्या समीप राहणं. ईश्वराच्या समीप रहायला मिळणं हे वास्तविक भाग्य आहे. उपनिषदांमध्ये ईश्वर अत्यंत दूर आहे आणि अत्यंत समीप आहे असं वर्णन आलं आहे. दूरही आहे आणि जवळही आहे म्हणजे काय? हे परस्पर विरोधी आहे असं वाटतं. पण ज्ञानेश्वरमहाराज खुलासा करतात

जै जगा धाकुटे होईजे । तै जवळीक माझी ॥

मी जवळही आहे, पण कोणाला? जो जगाला नम्र झालेला आहे, निरहंकार वृत्ती ज्याची बनलेली आहे त्याला ईश्वर जवळ आहे. त्याला समीपता मुक्ती मिळू शकते. जीवात्मा ईश्वराच्या जवळ राहू शकतो. पण या समीपतेमुळे त्या गोपींसारखा एखाद्या वेळेस अहंकार उत्पन्न होण्याचा संभव आहे.

जयविजयांच्या हातून संतांचा, भक्तांचा अपमान झाला. अमर्यादा केली त्यांनी म्हणून त्यांना पुन्हा मृत्यूलोकांत यावं लागलं. समीपता आहे. सरूपताही आहे त्यांना. तसाच गोपींनाही अभिमान उत्पन्न झाला. हा अभिमान, अहंकार ईश्वराच्या भक्तीमुळे दूर होतो.

*******

किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिन्हीं लोकीं ॥
भजिजो आदिपुरुखी । अखंडित ॥

त्या आदिपुरुषाला सर्व लोकांनी विसरु नये, ही प्रार्थना आहे. पूर्ण लोकशक्ती, ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती, इच्छाशक्ती इ. शक्तींचा समन्वय ज्ञानेश्वरमहाराजांच्या चरित्रात आपल्याला दिसून येतो. नियमनशक्ती ही फार मोठी शक्ती आहे. सर्वांचे नियमन करणे ही गोष्ट निराळी, परंतु स्वत:ची इंद्रिये, मन आणि बुद्धी यांचं नियमन करणं हे अतिशय कठीण आहे. सर्व इंद्रियं आपल्या ताब्यात असणं, ही मोठी योगशक्ती आहे. पूर्ण वैराग्य आहे, पूर्ण अमानित्व आहे. अमानित्वाची व्याख्याच त्यांनी स्वत:वरून केली आहे.

पूज्यता डोळा न देखावी । स्वकीर्ती कानी नायकावी ॥
हा आमुका ऐसी नोहावी । सेचि लोका ॥

हे अमानित्व, ही ज्ञानसाधना, ह्याला भगवान ज्ञानच म्हणतात. अमानित्व हे यांच्या ठिकाणी इतकं आहे की ते साक्षात् ज्ञानच आहे. त्यामुळे त्यांचं नेतृत्व, त्यांचं मार्गदर्शकत्व आजही सर्व लोकांना मान्य आहे.

अष्टमीला, नवमीला पुण्याला पालखी येते तेव्हा दर्शनाला हजारो लोक रस्त्यामध्ये असतात. विद्यार्थी, प्राध्यापक, बायका, पुरुष सर्वही जण वाट पहात असतात की पालखी केव्हा येते आणि केव्हा पादुकांचं दर्शन होतं. प्रत्यक्ष ज्ञानेश्वर महाराजांचं दर्शन ज्यांना झालेलं असेल, त्यांची संगती ज्यांना प्रत्यक्ष लाभली असेल, ती त्यावेळची मंडळी किती पुण्यवान, भाग्यवान असतील याची कल्पनाही आपल्याला करता येणार नाही. भारतवर्षाचं हे मोठं भाग्य आहे की असे महात्मे ईश्वररुपच झालेले आहेत. भगवतगीतेत भगवान सांगतात, ''ममैवांशो जीवलोके जीवभूत: सनातन:'' सर्व जीव म्हणजे माझे अंश आहेत. म्हणजे सर्वही जीव ईश्वररुप आहेत. गीतेमध्ये १० व्या अध्यायात विभूती विचार आला आहे. सर्व विश्व हे परमेश्वराचं स्वरुप असलं तरी 'विभूती' म्हणून जे आहे ते वेगळे आहे. विशेषत्वाने ज्या ठिकाणी तेजाचा, विभूतीस्वरुपाचा आविष्कार झाला आहे, ते विभूतीस्वरुप म्हणून भगवान सांगताहेत. म्हणजे ध्यान वगैरे करण्याच्या दृष्टीने त्याचा उपयोग होतो. संपूर्ण विश्वाचं ध्यान करणं, सर्वही विश्व परमेश्वर स्वरुप आहे, अशी भावना होणं, ह्याला कितीतरी जन्म घ्यावे लागतील. पण निदान ज्या ठिकाणी अशा प्रकारचं लोकोत्तरत्व आहे, त्या त्या वस्तुंचं विभूती रुपाने दिग्दर्शन भगवंतांनी केलं आहे. त्या वस्तुचं ध्यान म्हणजे परमेश्वराचं ध्यान आहे असं समजायला हरकत नाही.

त्याप्रमाणे सर्व संतमहात्मे हे भगवंताच्या विभूती आहेत. ज्या ठिकाणी ज्ञान आहे, पूर्ण वैराग्य आहे, पूर्ण नियामक शक्ती आहे, संकल्पशक्ती मोठी आहे, अशा लोकोत्तर शक्तींचा आविर्भाव ज्या ठिकाणी झालेला आहे, ती ईश्वराची विभूती आहे असं भगवान सांगत आहेत. ज्ञानेश्वर महाराजांचं चरित्र विलक्षण आहे. लहान वयामध्ये सर्वज्ञता मिळाली. सुकृतामध्येच ज्यांचे अनेक जन्म गेलेले आहेत, ईश्वराची पूर्ण कृपा ज्यांनी संपादन केली, ईश्वरस्वरुपाचा ज्यांनी साक्षात्कार करून घेतला, असे जे महात्मे आहेत, ते सर्वज्ञ असतात. म्हणजे ते ईश्वरस्वरुपच झालेले असतात. अशा प्रकारचे महात्मे ज्ञानेश्वर महाराज आहेत. भगवंतांनी ज्या विद्येचं महत्व वर्णन करून ठेवलं आहे, ज्या विद्येच्या सहाय्याने जीवभावही नाहीसा होतो, जीव ईश्वरस्वरुप होतो ती खरी अध्यात्मविद्या. अशी विद्या लोकांना समजावी याकरता भावार्थदीपिका, अमृतानुभव यासारखी काही ग्रंथ रचनाही त्यांनी करून ठेवली आहे.

*******

''नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एकतरी ओवी अनुभवावी '' असं म्हटलं आहे. अध्यात्मविद्या मिळेल, समजेल पण अनुभवात्मक जे ज्ञान आहे ते शेवटचं ज्ञान आहे. जे अनुभवात्मक ज्ञान आहे त्याचं फळ आचार्य महाराज असं सांगतात की, त्या ज्ञानाने इंद्रियांची शांती झालीच पाहिजे. ते ज्ञान म्हणजे ईश्वरस्वरुपाचा साक्षात्कार. 'श्रद्धावान् लभते ज्ञानम्' असं भगवान सांगतात. ज्ञानाच्या साधनांमध्ये श्रद्धा हे अंतरंग साधन आहे. बहिरंग साधना त्यांनी आरंभाला सांगितली. ''तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवयार। उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिन: ॥'' तत्वदर्शी जे महात्मे आहेत, ते या ज्ञानाचा उपदेश करता आहेत. कशानी? तर ह्या तीन साधनांनी. प्रथम प्रणिपात! जिज्ञासुंनी नमस्कार करणं, नम्रतेने त्यांच्या जवळ जाणं ही सुद्धा साधना आहे. नंतर जे आपल्या मनात आलेलं आहे ते बोलून दाखवणं, प्रश्न करणं. ते महात्मे त्याला उत्तर देऊ शकतात. त्यांच्याजवळ दोन्ही प्रकारची शक्ती आहे. ज्ञान जरी मिळवलं तरी ते ज्ञान दुसऱ्यांपर्यंत पोचविण्याची शक्ती त्यांच्याजवळ आहे. दुसऱ्याला ज्ञान द्यायचं म्हणजे त्याच्यामध्ये अनेक अडथळे येतात. अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण होतात. अनेक संदेह निर्माण होतात. त्या सगळ्या संदेहांची निवृत्ती करणं आणि ते ज्ञान त्याला पटवून देणं ही सुद्धा मोठी शक्ती आहे. 'शाब्देपरेच निष्णात्' असं त्या महात्म्यांचं वर्णन केलेलं आहे. शब्दांनी सुद्धा ज्ञान दिलं जातं. परिश्रम करणारा पाहिजे आणि सेवा हे तर साधन आहेच. पण ह्या साधनांनी सुद्धा ज्ञानाचा उपदेश होईलच असं म्हणत नाहीत. उपदेश करतील म्हणाले योग्यता वगैरे पाहून! ही सगळी साधनं सुद्धा बहिरंग साधनं आहेत. कारण परीक्षा पाहण्याकरीता कोणीही नमस्कार करू शकतो. प्रश्न कोणालाही विचारता येतात. ते काय जिज्ञासू बुद्धीने विचारले पाहिजेत असं नाही. म्हणून ही जी साधनं आहेत ती बहिरंग साधनं आहेत.

अंतरंग साधनं भगवान शेवटी सांगत आहेत. 'श्रद्धावान् लभते ज्ञानम्' म्हणजे ज्याच्या मनात श्रद्धा, विश्वास निर्माण झालेला आहे, गुरुवाक्यावर व उपनिषदवाक्यावर ज्याचा विश्वास आहे त्याला ज्ञान मिळतं. उपनिषदवाक्यं ही ईश्वराची वाक्यं आहेत. गुरुवाक्याची महती इथे सांगितली आहे. सद्गुरुस्वरुप हे देखील ईश्वराचेच स्वरुप आहे. नियमन करण्यासाठी ईश्वराचे अनेक अवतार झाले आहेत. धर्माधर्माचा विचार नुसत्या शब्दांनी काही मांडता येत नाही किंवा त्याप्रमाणे सगळ्यांचं आचरण होऊ शकत नाही म्हणून अधार्मिक अशाप्रकारचे जे राजे होऊन गेले, रावणासारखे म्हणा, त्याला शासन करण्यासाठी ईश्वराने अवतार धारण केला. ''विनाशायच दुष्कृताम्'' म्हटलं आहे. समाजामध्ये श्रेष्ठता मिळवलेला जो आहे तो कशाही प्रकारे श्रेष्ठता मिळवू शकतो. तो जर शास्त्रमर्यादेचं उल्लंघन करू लागला तर प्रथम त्याला शासन करायचं आणि शास्त्रमर्यादेचं जो निर्भयपणे संरक्षण करणारा आहे त्याचं संरक्षण करायचं, ही ईश्वराची कार्ये आहेत. संतांची, सज्जनांची, संरक्षण करणाऱ्यांची बुद्धी सुरक्षित ठेवणं आणि धर्ममर्यादेचं उल्लंघन करणाऱ्यांची बुद्धी बाजूला करणं हे फार मोठं काम आहे. हे ईश्वराशिवाय कोणीही करू शकणार नाही. त्यासाठी शब्दांमध्ये शक्ती पाहिजे आणि मानसशक्तीही फार मोठी पाहिजे.

*******

सज्जनांचं संरक्षण करणं म्हणजे त्यांच्या बुद्धीचं संरक्षण करणं आणि दुर्जनांच्या बुद्धीचा नाश करणं हे नियामक शक्तीचे कार्य आहे. पण ह्या नियामक शक्तीचं दुसरंही एक कार्य आहे. ते कार्य म्हणजे अनेक जीव वारंवार जन्माला येतात, त्यांना मृत्यू येतो. असे कितीतरी जीव जन्म घेत असतात, त्यांना अध्यात्मविद्या कशी मिळायची आणि त्यांचा उद्धार कसा व्हावयाचा? हे एक मोठंच कार्य आहे. त्याकरता ईश्वराचं दुसरं स्वरुप म्हणजे गुरुस्वरुप आहे. सद्गुरुस्वरुप हाही अवतार आहे. भगवान दत्तात्रेय, ज्ञानेश्वरमहाराज, भगवान शंकराचार्य महाराज हे सगळे अवतारी महात्मे आहेत, विभूतीरूप आहेत.

यांच्या अवतारांचे प्रयोजन म्हणजे, लोकांच्या बुद्धीचं संरक्षण करणं, म्हणजे त्या बुद्धीला मार्गदर्शन करणं. सज्जनांच्या बुद्धीच्या संरक्षणाकरीता प्रयत्न केला पाहिजे, त्यांना प्रतिबंध करणारी दुर्जनांची बुद्धी ईश्वराने बाजूला ठेवली तरीसुद्धा धर्ममर्यादा पालन करणाऱ्यांच्या बुद्धीमध्येसुद्धा दोष निर्माण होण्याचा संभव आहे, तो दोष कोणी दूर करायचा?

ज्ञानेश्वरमहाराजांच्या चरित्रामध्ये चांगदेवांचं चरित्र आहे. ज्ञानेश्वरमहाराजांची ज्ञानशक्ती आपल्या जवळ असलेल्या योगशक्तीपेक्षा मोठी आहे, याची चांगदेवांना जाणीव होती. ज्ञानाची सगळी साधनं साधकावस्थेत आरंभाला परिपूर्ण झालेली नसतात. साक्षात्कार झाल्यानंतर ती परिपूर्ण होतात. अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह, यमनियम हे सगळं सांगितलेलं आहे पण त्या नियमांची पूर्णता शेवटी होते. चांगदेवांच्या मनामध्ये ज्ञानेश्वररमहाराजांच्या विषयी आदरभाव आहे. पण आपल्या जवळच्या शक्तीचा अभिमानही आहे. त्यामुळेच त्यांना पत्र लिहायला बसल्यानंतर त्यांच्या मनामध्ये संशय निर्माण झाला की, ज्ञानेश्वर महाराजांना नमस्कार लिहावा की आशीर्वाद लिहावा? अज्ञान, अश्रद्धा आणि संशय हे तीन दोष धर्ममर्यादा पालन करणाऱ्याच्या मनामध्येही निर्माण होऊ शकतात ह्याचं हे उदाहरण आहे. मृत्यूलासुद्धा ज्यांनी चौदावेळा बाजूला केलं, 'शतायु पुरुष' म्हणतात त्यांना, त्यांच्या मनात दोष निर्माण झाला. त्यांची द्विधा चित्तवृत्ती झाली. 'संशयात्मा विनश्यति' संशय घेण्यापेक्षा, विपरित ज्ञान असण्यापेक्षा, 'ते मोठे आहेत मी लहानच आहे' असं वाटलं असतं तर काय हरकत होती? पण मोठेपणा मानावा की लहानपणा मानावा, त्यांना नमस्कार करावा की आशीर्वाद द्यावा ह्या संदेहाने कार्य बंद झालं. सर्व शास्त्र ही संदेहबुद्धी दूर करण्याकरता जन्माला आली आहेत. संशय हा फार मोठा प्रतिबंध आहे. तो संशय दूर करण्याकरता सर्व शास्त्र आहे. शेवटी त्यांनी कोराच कागद पाठवून दिला. 'चौदाशे वर्ष जगून हा कोराच राहिलेला आहे' असं मुक्ताबाई स्पष्टपणे म्हणाली. काय उपयोग आहे? दीर्घायुष्य मिळालं, योगशक्ती असेल पण मनाचा निर्धार करण्याची जी शक्ती आहे, ज्ञानशक्ती ज्याला म्हणतात ती अद्याप नाही. ज्ञानेश्वर महाराजांना आज्ञा झाली, 'उत्तर पाठवा'आता पत्रात काही लिहिलं असेल तर उत्तर द्यायचं. पण त्यांनी उत्तर दिलं आणि चांगदेवपासष्टी तयार झाली.

*******

चांगदेवपासष्टीची पहिली ओवी अशी आहे,

स्वति श्री वटेशु । जो लपोनी जगदाभासु ।
दावी मग ग्रासु । प्रगटला जगी ॥

वटेश्वर चांगदेव हे त्यांचं नाव होत. 'वटेश्वर चांगदेवांचं कल्याण असो.' असं ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. त्यांच्या मनांत काही संदेह नाही. लहान असले तरी लहानांनी सुद्धा मोठ्यांच्या कल्याणाचं चिंतन करण्यात काही अयोग्य नाही. गुरुभावना असेल तर मोठ्यांनाही लहानांचं कल्याण चिंतता येत. दोन्हीकडे लागणारा शब्द आहे 'स्वस्ति'. वटेश्वर चांगदेवांकडे पाहण्याची ज्ञानेश्वरांची बुद्धी ही अध्यात्मबुद्धी आहे. वटेश्वर चांगदेव म्हणजे आत्मरुप आहेत. सच्चिदानंदपरमात्मा जो आहे, सर्वव्यापी, सर्वस्वरुप, देशकालमर्यादारहित जो आहे, विश्वव्यापी जो आहे तो चांगदेव झालेला आहे. तो जर लपून राहिला म्हणजे अज्ञानाचं आवरण त्याच्यावर आलं तर हा जगदाभास म्हणजे सगळा व्यवहार दृढ होतो. हा चांगदेवांना उपदेश आहे आणि अध्यात्मविद्येचं प्रगटीकरणही आहे. चांगदेव म्हणजे परमात्मस्वरुप आहेत. परमात्मा आवृत्त झाला, आच्छादित झाला, तर अज्ञानाचं कार्य म्हणजे आभास, सगळा व्यवहार तिथे येतो आणि तोच जर प्रगट झाला तर सगळा विश्वाभास नाहीसा होतो.

म्हणजे चांगदेवांकडे पाहण्याची ज्ञानेश्वरांची वृत्ती परमात्मस्वरुप आहे, विश्वात्मक आहे, पण चांगदेवांची दृष्टी तशी नाही. 'ज्ञानेश्वर लहान आहेत, मी मोठा आहे' असं ते मानतात. म्हणजे देहापर्यंतच त्यांची बुद्धी राहिलेली आहे. चौदाशे वर्ष आयुष्य फक्त देहाचं आहे. आत्म्याला काही आयुष्य वगैरे नाही, आत्मा अनादि अनंत आहे, त्याला कसलं आहे आयुष्य? अजरामर आहे तो. पण देहाला आयुष्य आहे. तेव्हा, 'मी चौदाशे वर्षांचा आहे म्हणजे मी मोठा आहे, ज्ञानेश्वर महाराज एकवीस वर्षांचे आहेत म्हणजे ते लहान आहेत.'हा विचार त्यांच्या मनात आला, म्हणजेच ते ज्ञानेश्वर महाराजांकडे सुद्धा देहबुद्धीने पाहत आहेत. गुरुबुद्धी अद्याप उत्पन्न झालेली नाही. ही गुरुबुद्धी उत्पन्न झाल्यानंतर अध्यात्मविद्येकडे प्रवेश आहे. त्याशिवाय अध्यात्मविद्येकडे प्रवेश नाही. देहबुद्धीवरच ते थांबलेले आहेत. पुढे अद्यापि गेलेलेच नाहीत. म्हणून त्यांना ज्ञानेश्वर महाराजांनी समजावून सांगितले आहे की, 'बाबा तूही विश्वात्मा आहेस. परमात्मस्वरुप आहेस.' ज्ञानेश्वर महाराज आत्मदृष्टीने सर्व जगताकडे पाहत आहेत. चांगदेवमात्र स्वतःकडे, 'मी चांगदेव आहे.' ह्या दृष्टीने बघत असल्याने त्यांच्या मनांत गुरुभक्ती उत्पन्न होणं कठीण होतं.

बाहेरच्या एकंदर सर्वही विश्वाकडे परमात्मरुपाने पाहणं हे ज्ञानी पुरुषाचं लक्षण आहे आणि जो अज्ञानी आहे तो प्रत्यक्ष गुरुबुद्धी ज्या ठिकाणी ठेवायची त्या गुरुंकडे सुद्धा देहबुद्धीने पाहतो. म्हणजे माझ्यामध्ये आणि त्यांच्यामध्ये अंतर नाहीच आहे असा विचार त्याच्या मनात आपोआप येतो. ज्ञानेश्वर महाराजांची दृष्टी व्यापक आहे. वय देहाला आहे, या वयाला काहीही महत्व नाही. जे दिव्य ज्ञान आहे, त्या दिव्यज्ञानाचं महत्व आजही लोकांना पटलेलं आहे.

*******

भगवान शंकराचार्यांनी संपूर्ण उपनिषद विद्या प्रगट केली आहे. भगवद् गीतेवरही भाष्य केलं आहे. भगवद्गीता संपूर्ण उपनिषदांचे साररूप आहे. उपनिषदांमध्ये असलेला अर्थ भगवंतांनी सांगितला आणि व्यासांनी लिहून ठेवला, तो ही मोठा उपकारक आहे. साक्षात् उपनिषद वाक्यांचा अर्थ समजण्याकरता लागणारी जी बुद्धी आहे, ती वेगळी आहे. त्या करता 'वाक्यशास्त्र' म्हणून शास्त्रकारांनी केलेलं आहे. मीमांसाशास्त्र आणि वेदांतशास्त्र ही दोन वाक्यशास्त्र आहेत. वाक्याचा अर्थ कसा करावा ह्याचा ह्या शास्त्रामध्ये विचार आहे. नुसतं एखादं वाक्य ऐकलं, मागचा संदर्भ नाही, पुढचा संदर्भ नाही, तेवढ्यापुरतं आपल्याला पटेल तसं ऐकलं असा वाक्यविचार करत नाहीत.

'ईशावास्य उपनिषदामध्ये' परमात्मस्वरूप हे जसं दूर आहे, तसंच जवळही आहे असं म्हटलं आहे. हे असं परस्परविरोधी का लिहिलेलं आहे? तो अर्थ समजून घेणारी जी ज्ञानी माणसाची दृष्टी आहे ती वेगळी आहे. ज्ञानेश्वरमहाराजांनी याचा खुलासा केलेला दिसतो.

म्हणुनी थोरपण पऱ्हांचि सांडिजे । व्युत्पत्ती आघवी विसरीजे ।
जै जगा धाकुटे होईजे । तै जवळीक माझी ॥

जगामध्ये आपलं महत्व नाही. 'हा आमुका ऐसी नोहावी । सेचि लोका ॥'
ज्ञानेश्वरमहाराज सांगत आहेत. स्वतःबद्दल काहीही उल्लेख नाही. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय हे पंचकोष किंवा सूक्ष्मकारण देह वगैरे यांच्यापासून बाजूला जो झालेला आहे असा शुद्ध अहं मी आहे आणि तो शुद्ध अहं परमात्मा आहे इथपर्यंत ज्यांची बुद्धी गेलेली आहे त्यांच्या मनात काही अहंकार नसल्यामुळे त्यांना हे कळलं आहे की ईश्वर जवळ आहे आणि ते स्वतः ईश्वररूपच आहेत.

म्हणजे उपनिषदांचा अर्थ लावतानासुद्धा बुद्धीची योग्यता कशी पाहिजे हे ही ज्ञानेश्वरमहाराजांनी सुचविलेलं आहे. फार कठीण आहे ते. वेदवाक्याचा अर्थ आपल्या इच्छेने लावायचा नाही. कोषामध्ये असलेल्या शब्दांचा अर्थ पाहून काही उपनिषदांचा अर्थ समजून घ्यायचा नाही. श्रेष्ठ जे महात्मे आहेत त्यांच्या मुखातूनच वेदांत श्रवण झाला पाहिजे, तर त्याचा काहीतरी परिणाम आपल्या बुद्धीवर होईल. त्या करिता ज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ करून ठेवलेला आहे. त्याच्या ९००० ओव्या आहेत. निरनिराळ्या रीतीने मानवाच्या बुद्धीमध्ये उत्पन्न होणारे जे काही अनुकूल-प्रतिकूल विचार असतील, ते विचार बाजूला झाले पाहिजेत. त्या करिता शंकराचार्य महाराजांनी भाष्य करून ठेवलं आहे. ज्ञानेश्वरमहाराजांनीही भाष्य मराठीत केलं आहे. अध्यात्मविद्येचे जिज्ञासू अधिकारी महात्मे फार थोडे असतात असं भगवान म्हणतात. ऐकणारा एखादाच, सांगणारा एखादाच आणि जाणणाराही एखादाच. आमची बुद्धी बाह्य संस्कारांनी भरलेली आहे त्यामुळे त्या बाह्य संस्काराना अनुसरून काही असेल तर ते आमच्या बुद्धीला पटतं. त्यामुळे आचार्यमहाराज सांगत आहेत त्या स्वानुभवापर्यंत आमची बुद्धी जाऊच शकत नाही.

*******

श्रद्धा म्हणून जे महत्वाचं अंतरंग साधन सांगितलं आहे, ती श्रद्धा आपल्या बुद्धीमध्ये उत्पन्न होत नाही. श्रद्धा उत्पन्न झाल्यानंतर जिज्ञासा ज्याला म्हणतात ती हवी. अश्रद्धा जर असेल तर जिज्ञासासुद्धा थांबून जाईल किंवा त्या जिज्ञासेतून विरूद्ध ज्ञान निर्माण होण्याचा संभव अधिक आहे. म्हणून '**ते निश्चित आहे**' ही श्रद्धा हवी म्हणजे शब्दप्रमाणावर बुद्धीचा विश्वास बसला पाहिजे. अनेक जन्मांचे संस्कार आहेत त्यामुळे शब्दप्रमाण जरी आहे तरी त्यावर आमचा विश्वास नाही. उपनिषदवाक्य हे ईश्वराचं वाक्य आहे. त्याने सर्वही ईश्वरस्वरुपाचं प्रतिपादन केलेलं आहे. आत्मस्वरुप कसं आहे, ते सगळं मांडून दाखविलेलं आहे. आता यापैकी आम्हाला जीव आणि आत्मा याची कल्पना नाही. स्वत: जीव शरीरामध्ये असतांनासुद्धा, देहामध्ये असणारा मी एक स्वतंत्र जीव आहे याचीसुद्धा आम्हाला कल्पना येत नाही. ही कल्पना आल्याशिवाय धर्माचरण म्हणा, ईश्वराची भक्ती म्हणा हा पुढचा मार्गच नाही. देहात राहणारा देही निराळा आहे हे आधी समजायला हवं.

भगवद्गीतेच्या उपदेशाला सुरुवात झाली तेव्हा आरंभाला भगवंतांनी हेच सांगितलं आहे. देही निराळा आहे. अंतवंत इमे देहा...युद्धस्व भारत। अर्जुना तू स्वधर्माचरण केलं पाहिजे. स्वधर्माचरणवृत्ती होण्याकरता देह निराळा आणि देही म्हणजे देहात राहणारा जीवात्मा वेगळा आहे, तो अनादि अनंत आहे, देह नाशवंत आहे, हे प्रारंभाला सांगितलेलं आहे. देहापेक्षा देही वेगळा आहे. हे समजून मग तत्वज्ञानाचा अभ्यास करावा लागतो. हा सगळा पारमार्थिक विचार, देही वेगळा आहे ही बुद्धी असल्याशिवाय करताच येत नाही. पण जो खरा प्रत्यक्षदर्शी आहे, प्रत्यक्ष ज्ञान ज्याला झालेलं आहे, त्याच्या शब्दांवर विश्वास ठेवायला काय हरकत आहे? ईश्वराने जे गुरुस्वरुप धारण केलं आहे, त्या गुरुस्वरुपावर, त्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवायला पाहिजे, ते तत्वदर्शी आहेत ना!

आधुनिक बुद्धीवादाच्या दृष्टीने प्रत्यक्ष प्रमाण श्रेष्ठ. प्राचीनकाळी प्रत्यक्ष प्रमाणाचं श्रेष्ठत्व मानलं नाही असं नाही. पण प्रत्यक्ष प्रमाणालासुद्धा मर्यादा आहेत. त्याचीसुद्धा शक्ती मर्यादीत आहे. डोळ्यांना समोरचं दिसतं, पाठीमागचा पदार्थ दिसत नाही. भिंतीच्या पलीकडे असणारा पदार्थ डोळे पाहू शकत नाहीत. त्या डोळ्यातील शक्तीसुद्धा मर्यादित आहे. पाहिल्यानंतर स्पष्ट ज्ञान करून देणं एवढी शक्ती त्या डोळ्यांमध्ये आहे. परंतु त्याने जे पाहिलं नाही ते जगामध्ये नाहीच असं मानणं धाडसाचं ठरेल. गुरुचरित्रात गोष्ट सांगितली आहे. नृसिंहसरस्वती महाराज गाणगापूरला गेले होते. दुपारच्या वेळेला ते एका गरीब ब्राह्मणाकडे गेले. त्याच्या घरात एक म्हैस होती पण ती वांझ होती. महाराज म्हणाले, 'बाई तुमच्याकडे तर म्हैस आहे, आम्हाला काही अन्नाचीच भिक्षा पाहिजे असं नाही. थोड दूध जरी दिलंत तरी हरकत नाही.' आता इथे मोठा पेच निर्माण झाला. प्रत्यक्षप्रमाण म्हैस दूध न देणारी आहे आणि हा महात्मा सांगतो आहे, 'दूध काढा, मला द्या, इच्छा नसली तर मी जातो.' म्हणजे शब्दप्रमाणावर विश्वास ठेवायचा की प्रत्यक्षप्रमाणावर विश्वास ठेवायचा अशी परिस्थिती निर्माण झाली. परंतु ती स्त्री धर्मशील होती आणि प्रत्यक्ष महाराजांनी सांगितल्यावरून ती धार काढायला गेली. तिने दूध काढलं ते महाराजांना अर्पण केलं आणि दूध पिऊन महाराज गेले. आता श्रद्धावान लभते ज्ञानम्, म्हणजे बाह्यव्यवहारामध्ये सुद्धा श्रद्धेचा उपयोग होतो.

*******

शास्त्रकारांनी धर्ममर्यादा घालून दिलेल्या आहेत. त्या धर्ममर्यादांचं संरक्षण करणं हे ईश्वराच्या अवताराचं कार्य आहे. ज्ञानेश्वरमहाराज, नामदेवमहाराज, एकनाथमहाराज, तुकाराममहाराज यांच्यासारख्या ईश्वरस्वरुप झालेल्या महात्म्यांना कर्तव्य काही उरलेलं नाही. परंतु, 'सर्वेपि सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः' हा संकल्प मात्र त्यांचा आहे. वासना कोणचीही असू नये म्हणतात. वासना ही मोक्षाला प्रतिबंधक आहे. परंतु 'सर्वेपि सुखिनः सन्तु' ही वासना जर संतमहात्म्यांच्या मनात नसती तर सर्वांचं कल्याण कसं झालं असतं? सर्वांना सुख मिळावं, सर्वही निरामय असावे, सर्वही आरोग्यसंपन्न असावे हीच संतमहात्म्यांची भावना, इच्छा, वासना आहे आणि त्यांचा वशिला प्रत्यक्ष विश्वेश्वराजवळ आहे. विश्वेश्वरालाही ते नाकारता येणार नाही. हे विश्व ज्याने निर्माण केलं त्या विश्वाच्या कामामध्ये सहाय्यभूत हे सगळे संतमहात्मे आहेत! स्वार्थ त्यांच्याजवळ बिलकूल नाही. सर्वांनी आरोग्यसंपन्न रहावं हीच संतमहात्म्यांची इच्छा आहे. परंतु त्याला पुष्कळ प्रतिबंध निर्माण होऊ शकतात.काही पूर्वकर्मामुळेही आरोग्य बिघडतं. पण आरोग्य प्राप्त होण्याकरता अनेक प्रकारची साधनं, शास्त्र देखील ईश्वराने निर्माण केली आहेत.

पूर्वकर्मामुळे आपल्याला व्याधी वगैरे होतात हा एक कर्मवाद भारतीय संस्कृतीशिवाय दुसरीकडे कुठेही नाही. तो मानावाच लागतो. कितीही बुद्धीवादाने उत्तर देण्याचा प्रयत्न केला तरी उत्तर देता येत नाही. उत्तम उत्तम औषधं आहेत. त्याचा अभ्यास करणारी उत्तम उत्तम मंडळीही आहेत. ते औषध एखाद्याला लागू पडतं आणि तो रोगमुक्त होतो पण तेच औषध तशाच प्रकारच्या दुसऱ्या रोग्याला दिल्यानंतर तो बरा होत नाही. त्याचं आयुष्य संपतं. ह्याच कारण काय? डॉक्टरला नीट निदान झालं नाही असं म्हणायचं? तोच डॉक्टर आहे. त्यानेच निदान केलेला एक रोगी बरा होतो. मग दुसरा का बरा होत नाही? असे अनेक प्रश्न करता येण्यासारखे आहेत. त्यामुळे शरीरापेक्षा वेगळा असणारा हा जीवात्मा आपलं पूर्वकर्म घेऊन जन्माला आलेला आहे हे आपोआपच येतं. 'वाढिल्या उद्वेग दुःखची केवळ । भोगणे ते फळ संचिताचे ॥' असं तुकाराममहाराजांनी सांगून ठेवलेलं आहे. पूर्वकर्माचं फळ जीवाला भोगावं लागतं. आणि अशा प्रकारचा एक कर्मवाद, कर्मशक्ती जगताच्या कार्याकरता परमेश्वराने निर्माण केली. जीवाला त्याच्या कर्माप्रमाणेच फळ द्यायचं एवढचं त्या शक्तीचं कार्य आहे. परमात्मा स्वतः अलिप्त आहे. ही कर्मशक्ती एकदा सिद्ध झाल्यानंतर ईश्वर मानावाच लागतो. जीवाने केलेल्या कर्माचं फळ मिळतं हे एकदा मान्य केल्यानंतर तो जाणणारा कोणीतरी पाहिजे की नाही? ऑफिसमध्ये हा गृहस्थ कधीही रजा घेत नाही. आपली काम उत्तम प्रकाराने करतो हे जाणणारा कोणीतरी पाहिजे की नको? तर त्याला बढती मिळेल. त्याने नुसतं कर्म केलं तर फळ मिळत नाही. केवळ कर्म हे जड आहे. तेव्हा आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये कर्मशक्ती शास्त्रकारांनी सिद्ध केलेली आहे आणि आपल्याला अनुभवही येतो. त्याचा ज्ञाता सर्वज्ञ परमेश्वरआहे. 'आपदामपहर्तारं दातारं सर्व संपदाम् । लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहं ॥' असं बुधकौशिक मुनींनी सांगितलेलं आहे. कोणतीही आपत्ती आपल्या पूर्वकर्मामुळे आलेली असो ती दूर करण्याची शक्ती त्या परमेश्वराची आहे, ही जाणीव झाली पाहिजे.

*******

महर्षी व्यासांनी ईश्वरस्वरुपाचा विचार केला. सद्गुरु स्वरुपाचा विचार केला. नंतर त्यांना थोडा खेद झाला. त्यांना वाटलं इतके ग्रंथ केले, महाभारत लिहिलं, पुराणं लिहिली, वेगळ्यावेगळ्या देवतांचं महत्व सांगितलं. लोकांची बुद्धी शुद्ध व्हावी हा त्यांचा मुख्य उद्देश होता. ईश्वरीस्वरुपाबद्दल भक्ती उत्पन्न व्हायला हवी. आत्मानात्म विचार करायला हवा. कठोपनिषदामध्ये आलं आहे, लहान वय होतं नचिकेताचं. तरीसुद्धा यमधर्माच्या पुढे विरक्तपणे त्यांनी काहीही मागितलं नाही. ही बुद्धीची स्थिरता त्याला काही एका जन्मामध्ये मिळालेली नाही. तर व्यास महर्षींना थोडं वाईट वाटलं. कोणीही आपलं म्हणणं ऐकून घ्यायला तयार नाही. अर्थकामाच्याच पाठीमागे सगळं विश्व लागलेलं आहे. उत्तम अभ्यास केलेली मंडळी असोत, अभ्यास न केलेली असोत. अर्थ-काम सगळ्यांनाच पाहिजे आहे. 'प्रपंची पाहिजे सुवर्ण ।' इतकीच सगळ्यांची बुद्धी आहे. व्यासांच्या नंतर व्यासांचे अनुकरण करणारे जे झाले त्यांनी आणि संतमहात्म्यांनी, व्यासांनी जे प्रतिपादन केलं आहे तेच निरनिराळ्या पद्धतीने सांगितलं.

कालिदासाने 'मालविकाग्निमित्र' ह्या नाटकात एक श्लोक घातला आहे. ईश्वराची कृपा आपल्यावर कशी व्हावी?भगवान शंकरांचं त्यांनी वर्णन केलं आहे. भगवान शंकर कसे आहेत? तर पूर्ण ऐश्वर्य त्यांच्याजवळ आहे. जे कोण काही मागेल ते द्यायची शक्ती त्यांच्याजवळ आहे. ते पूर्ण शक्तीसंपन्न आहेत. हे सगळं असून सुद्धा आपल्या त्या शक्तीचा वापर ते आपल्याकरता करत नाहीत.

भगवान एक व्याघ्रचर्म पांघरून बसलेले आहेत. काही आकांक्षा नाही आणि आकांक्षारहित मन होणं हीच मुक्ती आहे. अकाम महत् व्यक्तीला सर्व आनंद प्राप्त होतात असं उपनिषदामध्ये सांगितलेलं आहे. आनंदाचे अनेक प्रकार सांगितलेले आहेत. ते सर्वही आनंद त्या अकाम महत् व्यक्तीला मिळतात. काहीही कामना मनात नाही. रामचंद्रप्रभू भगवान शंकरांना आपलं उपास्य दैवत मानतात. शंकरही रामांना उपास्य दैवत मानतात. शंकरांना अर्धनारीनटेश्वर म्हणतात. अर्ध्या शरीरामध्ये पार्वतीमाता आहे. इतकं शरीरांतर्गत सान्निध्य असूनसुध्दा संयमाने इंद्रिय निग्रह आहे. निर्विषय ज्यांचं मन झालेलं आहे अशा योगी पुरुषांमध्ये अग्रणी भगवान शंकर आहेत.

तिसरं सांगत आहेत कालिदास, सगळ्या जगाचं संरक्षण करण्याचं कार्य भगवान शंकर करतात. शेवटी प्रलयाच्या वेळी संहार कार्य होईल तेही एक मोठं जबाबदारीचं काम आहे. पंचमहाभूतं ही शंकराची रुपं आहेत असं शाकुंतल नाटकात वर्णन केलं आहे. पंचमहाभूतं, सूर्य, चंद्र, अग्नि या अष्टतनुंच्या सहाय्याने भगवान शंकर सर्वांचं संरक्षण करतात. पण संरक्षण करणारे असूनही **अहं** नाही. हा भारतीय संस्कृतीचा मोठा विशेष आहे. ज्यांच्या मनामध्ये पूर्ण संयम आहे, खरं वैराग्य उत्पन्न झालेलं आहे, त्यांच्यामध्ये असणारी शक्ती सर्वांना उपकारक असून सुद्धा त्यांना स्वत:ला त्याचा अभिमान नाही. हे तर फारच मोठं आहे. ज्ञानेश्वरमहाराजांनी भिंत चालवली पण ते सगळं विसरून गेले. जडभिंतीत क्रियाशक्ती निर्माण करण्याचा ज्यांचा संकल्प आहे, त्यांना त्या संकल्पाबद्दल काही जाणीवही नाही. ही फार मोठी शक्ती आहे. इंद्रियांच्या संयमाने आणि बुद्धीच्या स्थैर्याने ही शक्ती प्राप्त होते.

*******

भगवान गोपाळ कृष्णांनी उद्धवजींना उपदेश केलेला आहे. भागवत ग्रंथामध्ये ११ वा स्कंद जो आहे तो भगवंतांचा उपदेश आहे. त्यावर एकनाथमहाराजांनीही एकनाथी भागवत लिहिलेलं आहे, मराठी भाषेमध्ये, सर्वांनाही समजून येण्याकरता! त्यामध्ये सर्व जीवांच्याकरता आपण काय व्यवस्था केलेली आहे हे भगवान सांगताहेत. संसारसमुद्र मोठा आहे. त्यातून तरून जायचं आहे.

त्यासाठी पहिलं साधन म्हणजे,'मनुष्यदेह मी दिला आहे' असं ते म्हणतात. जीवाच्या स्वाधीन काही गोष्टी नाहीत. वाटतं आम्हाला, आमच्या बुद्धीने आम्ही करू शकतो सर्व. पण नाही. मनुष्यदेह आपल्याला मिळाला पाहिजे हे काही आपल्या इच्छेवर अवलंबून नाही. ईश्वराच्या सृष्टीत ईश्वराच्या कृपेने आपल्याला मनुष्यदेह मिळालेला आहे आणि मनुष्यदेह हाच संसारसागरातून तरून जाण्याचं पहिलं साधन आहे. देवादिकांनासुद्धा इकडे लक्ष द्यायला सवड नाही. स्वर्गादिक लोकांमध्ये इच्छा केल्यावर फलप्राप्ती होते. इतकी समृद्धी असतांना कोणाचं लक्ष देवाधर्माकडे, भक्तीकडे जाणार? म्हणून मानव हा अधिकारी आहे. तेव्हा मानवजन्म हे पहिलं साधन आहे.

मार्गदर्शकाचीही योजना केलेली आहे. 'गुरुकर्णधारम्' म्हणजे सद्गुरु, संतमहात्मे हे नावाडी आहेत. ते नाव घेऊन समुद्रातून पलीकडे पोचवतात. ईश्वररुप ते आहेत. ते उत्तम प्रकारचं मार्गदर्शन करतात. श्रद्धा, भक्ती मनामध्ये असेल तर त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागून आपलं पूर्ण कल्याण होतं. ही दुसरी व्यवस्था.

आणि तिसरी व्यवस्था भगवान सांगताहेत. नाव पलीकडे तरून जायला अनुकूल वारा पाहिजे तरच नाव व्यवस्थित जाते. मी 'अनुकूल' आहे, म्हणतात भगवान.'अनुकूलः शतावर्तः पद्मी पद्मनिभेक्षणः' विष्णूसहस्रनामामध्ये 'अनुकूल'असं एक भगवंतांचं नाम आहे. म्हणजे या नामाप्रमाणे भगवान सर्व मानवांना अनुकूल आहे, परतीरावर नेण्यासाठी. इतकी व्यवस्था केलेली आहे. असं असतांना ज्याला भवसमुद्रातच गटांगळ्या खात रहायचं आहे, त्याला मी काय करणार म्हणाले! मनुष्यजन्म केव्हा संपेल ह्याचा नेम नाही. या जन्मामध्ये ईश्वराची, सद्गुरुंची सेवा झाली पाहिजे तरच मानव कृतार्थ होऊन जातो. ह्या दृष्टीने संतमहात्म्याच्या चरित्राचं वाचन अवश्य करावं असं योगसूत्रकारही सांगतात. मनाचा निग्रह होण्यासाठी त्यांनी पुष्कळ साधनं सांगितली आहेत. प्राणायाम हे मोठं साधन आहे. प्राणायामाच्या बलाने मन, इंद्रियं सगळी एकाजागी स्वस्थ राहतात. एवढी प्राणायामाची शक्ती आहे. पण तो अभ्यास सर्वांना शक्य नाही. सांगता सांगता, 'वीतरागविषयं वा चित्तम्' हे योगसूत्रकार सांगतात. वीतराग महात्मा म्हणजे ज्याच्या मनामध्ये कोणतीही वासना शिल्लक राहिलेली नाही. केवढा अधिकार आहे! निर्वासन अंत:करण आहे. संसाराची वासना नाही आणि परमार्थाचीही वासना नाही. वासना पाहिजेच कशाला? सर्वज्ञ परमात्मा आहे. त्याच्या कृपेने यथासंभव सर्व होऊन जातं. 'देव ठेवील तैसे रहावे' तर वीतराग महात्मा जो आहे, निर्वासन अंत:करण ज्याचं झालेलं आहे अशांची चरित्रं पहावीत, ऐकावीत, चिंतन करावं म्हणजे चित्त स्थिर होतं. चित्त स्थिर करण्याचा हा एक स्वतंत्र उपाय त्यांनी सांगितलेला आहे.

*******

युवाशिक्षा म्हणून सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांनी एक छोटा ग्रंथ केलेला आहे. उपनिषदांमध्ये किती प्रकारच्या उपासना सांगितलेल्या आहेत त्याचं सगळं वर्णन करून शेवटी त्यांनी, 'मूर्तीमध्ये देव आहे की नाही' हा विषय काढलेला आहे. मूर्तीमध्ये देव नाही असं लोक म्हणतात. रामदासस्वामी हे मूर्तीपूजकच होते की म्हणाले. मूर्तीपूजा करूनच त्यांनी रामचंद्रांची कृपा संपादन केली आणि सर्व लोकांना मार्गदर्शन केलं. हे या कलियुगातच केलेलं आहे.

कृष्णापंचगंगा नद्यांच्या संगमावर श्रीदत्तात्रेयांच्या ज्या पादुका आहेत त्यांची नारायणस्वामींनी पूजा केली, चिंतन केलं, ध्यान केलं आणि नारायणस्वामी जीवनमुक्त झाले. देह असून संसार सुटला त्यांचा. देहापासून ते वेगळे झाले. ही योग्यता त्या पादुकांचं अर्चन करूनच नारायणस्वामींनी मिळवली. मूर्तीमध्ये देव नाही असं कसं म्हणायचं? निराकार ईश्वराला आकार येईलच कसा? असं लोक म्हणतात. पण निराकाराला आकार येऊ शकतो. अग्नीला आकार कुठे आहे? पण ज्या लाकडात अग्नी पेटलेला आहे त्याचा आकार त्या अग्नीला येतो. पाण्याला आकार कुठे आहे? पण गोल, चौकोनी जसं आळं केलं असेल तसा आकार त्या पाण्याला मिळतो. निराकाराला आकार येत नाही ही फक्त समजूत करून घेऊन काय उपयोग आहे?

सर्व जगत कर्माप्रमाणे निर्माण केलं भगवंतांनी. कर्माप्रमाणे फल देण्याचं कार्यही अखंड चालू आहे. अधिकारी नेमलेले आहेत सर्व, शंकराचार्य महाराजांच्या रुपाने दत्तात्रेय प्रभूंच्या रुपाने स्वत: सद्गुरु रुप अवतार धारण करून महाराज येतात आणि सद्गुरु रुप धारण करूनच सर्वांना मार्गदर्शन करतात. म्हणून दत्तात्रेय अवतार हा कायमचाच राहणारा आहे असं मोठ्या महाराजांनी एका ठिकाणी सांगितलेलं आहे. रामकृष्णादि अवतार त्यांचं कार्य झाल्यावर अदृश्य झाले. रावणाला मारलं, कंसाला मारलं, जरासंधाला मारलं, काम झालं आणि ते निघून गेले. पण सद्गुरुंचं कार्य संपणार नाही असं मोठ्या महाराजांनी सांगितलेलं आहे. अनेक अज्ञानी जीव आहेत, त्या सगळ्या अज्ञानी जीवांचा उद्धार करायचा म्हणजे त्याला कालमर्यादा राहून कशी चालेल? तेव्हा कायम स्वरुपाचा अवतार आहेत दत्तात्रेय.

अमूक एक मला मिळालं पाहिजे अशी इच्छा उत्पन्न झाली की न्याय अन्याय कसलाच विचार होत नाही. 'काम' म्हणतात इच्छेला. त्याला कोणी प्रतिबंध केल्याबरोबर लगेच क्रोध उत्पन्न होतो. आपल्या इच्छेला प्रतिबंध करणारा आपला शत्रू बनतो आणि ती इच्छा जर पूर्ण व्हायला लागली तर त्याच्यापेक्षा जास्ती मिळावं अशी इच्छा निर्माण होते. पैसा मिळण्याची इच्छा पूर्ण झाल्यानंतर त्याचं रुपांतर लोभामध्ये होतं. इच्छेला प्रतिबंध झाल्यानंतर कामाचं रुपांतर क्रोधात होतं. म्हणजेच कोणतातरी विकार मनामध्ये कायम राहतो. लाभ व्हायला लागल्यानंतर लोभ उत्पन्न होतो म्हणतात. पुरा होतच नाही लोभ. त्यामुळे संग्रह वगैरे करणं योग्य नाही. संग्रह केल्यानंतर त्याचं दान व्हायला पाहिजे. 'मम मम' म्हणण्यामध्ये सगळा जन्म जातो आमचा. हे 'मम मम' सुटण्याकरता दान करायला सांगितलेलं आहे. 'न मम, न मम, न मम' म्हणजेच दान आहे. ती इच्छा मात्र उत्पन्न झाली पाहिजे.

*******

पापं तापं व्याधीमाधिंच दैन्यम् । भीतिं क्लेशं त्वं हराशुत्व दैन्यम् ।
त्रातारं नो वीक्ष ईशास्तजूर्ते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥

सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी दत्तात्रेयांची प्रार्थना केली आहे. सर्व जीवांनी देवाजवळ काय मागावं हे ह्यात सुचविलेलं आहे. पापम्, तापम्. व्याधीम् हे सर्व आपण दूर करा अशी प्रार्थना आहे. पाप हे मूळ कारण आहे. दुःख जी आपल्याला भोगावी लागतात, त्याचं कारण आपल्याकडूनच घडलेली पापं! दैवयोग आपण म्हणतो. सुख-दुःख दैवाने मिळतात. दैव याचा अर्थ पूर्वी आपल्या हातून घडलेली कर्म. दैव आणि प्रयत्न वेगळे आहेत असं नाही. पूर्वी केलेला प्रयत्न म्हणजे दैव आणि सध्या चालू असलेला प्रयत्न म्हणजे कर्म असं म्हणतात. जे जे कर्म घडलेलं आहे - पुण्य किंवा पाप- त्याचं फळ हे निश्चित मिळतं. तेव्हा दुःखाला कारण म्हणजे पाप.

ताप म्हणजेही दुःखच. आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक असे तीन प्रकार त्या तापात, दुःखात आहेत. आध्यात्मिक दुःख म्हणजे शरीरामध्ये काहीतरी रोग उत्पन्न होणं, त्यामुळे निर्माण होणारी दुःख. किंवा मनाच्या विरूद्ध जरी घडलं तरी दुःखच आहे ते. ही दुःख जायची असतील तर शरीरामध्ये कधीही रोग उत्पन्न होता कामा नये. पण असं तर प्रपंचामध्ये होत नाही. इंद्रासहित सर्वांनाही दुःख, ताप आहे.

शरीरामध्ये काहीच विकार उत्पन्न झाला नाही म्हणजे आध्यात्मिक ताप नाही. पण शरीरामध्ये कधीही विकृती उत्पन्न न होणं हे कसं शक्य आहे? कफ, पित्त, वात यांचं शरीरात असलेले साम्य म्हणजे आरोग्य आणि वैषम्य उत्पन्न झालं म्हणजे अनारोग्य. शरीर नेहमी आरोग्यसंपन्न राहीलं म्हणजे रोगामुळे उत्पन्न होणारा ताप दूर होतो. पण हे शक्य नाही. योगशास्त्रकारांनीही ईश्वराची भक्ती करायला सांगितलेली आहे. योग म्हणजे प्रयत्न आहेत. प्रयत्नांनी सर्व काही मिळवता येतं. अनेक सिद्धी त्यांनी सांगितलेल्या आहेत. मानसिक शक्तींचा विकास म्हणजे या सर्व सिद्धी आहेत. अभ्यासाने मानसिक शक्तींचा विकास करता येतो. पण त्यानी सुद्धा ईश्वराची उपासना आवश्यक आहे असं मान्य केलं आहे. शरीरामध्ये विकृती उत्पन्न होणं, आळस निर्माण होणं, नैराश्य येणं, 'काय उपयोग आहे साधना करून? एखादा दिवस साधना नाही केली तर काय होणार आहे?' असा विचार येणं, इत्यादी जे प्रतिबंध निर्माण होतात त्यामुळे साधनाभ्यास नियमाने आणि दीर्घकाळ होत नाही आणि अभ्यास नियमाने आणि निरंतर न झाल्याने मानसिक, शारीरिक आरोग्य राखता येत नाही. त्यामुळे ताप होतो. आध्यात्मिक दुःख सर्वांनाच अपरिहार्य आहेत. ती दूर करावीत अशी प्रार्थना प्रथम केली आहे. पाप, ताप, व्याधी, आधी इत्यादी सात दोष ईश्वरानेच दूर करावेत कारण तो ह्या दोषांपासून अलिप्त आहे. ह्या दोषांनी जर्जर झालेल्या जीवांचे दोष तो दूर करतो म्हणून ही प्रार्थना प्रथम केली आहे.

आता ताप सुरू झालेला आहे. पण पूर्वीच संचित, कर्म भोगणं सुरू होण्यापूर्वी आपण दूर करा. पूर्वीच्या पापकर्मामुळे हा ताप सुरू झालेला आहे. आता ते दुःखरुपी कर्माचं फळ नाहीसं करायचं म्हणजे त्या कर्माची शक्तीच नाहीशी केल्यासारखं होणार तेव्हा त्या प्रारब्धकर्माचीही शक्ती नाहीशी करा, अशी प्रार्थना ह्यात दिसून येते.

(पुढील पानावर बघा)

व्याधी, आधी आणि दैन्य ही सगळी पापकर्माची फळं आहेत. व्याधी म्हणजे रोग. व्याधींमुळे ताप होतो. पापकर्म भोगायला सुरूवात झाल्यानंतर ज्या व्याधी होतात त्याही दूर करा.

आधी म्हणजे मानसिक व्यथा. मनाविरूद्ध घडल्याने निर्माण होणारे क्लेशदायक विचार मानसिक व्यथा निर्माण करतात. मनाविरूद्ध घडल्यानंतर तेच तेच विचार मनात येतात आणि त्यांचं मनात येणं आपण थांबवू शकत नाही आणि त्यामुळे होणारा मन:स्ताप आपण सहनही करू शकत नाही.

दैन्यम् म्हणजे दारिद्र्य. मनाची अत्यंत निराशाजनक अवस्था की ज्या अवस्थेत आपल्या हातून चांगलं काही घडत नाही. 'माझ्या हातून काय घडणार, नशीबच माझ्या विरूद्ध आहे' असं म्हणून मनुष्य निराश होतो. तेव्हां हे दैन्य जर मनात उत्पन्न झालं तर व्यवहार होत नाही आणि परमार्थही होत नाही. तेव्हा दैन्य मनातून दूर होऊन उत्साह निर्माण झाला पाहिजे.

भीती, क्लेश ही सुद्धा पापाची फळं आहेत. देवादिकांनासुद्धा भीती आहे. हातात सत्ता असताना ती टिकेल की नाही ही भीती आहे. काय त्या सत्तेचा उपयोग? सुख कसं होणार? तर ही अशी भीती नसणं हे दैवी प्रकृतीचं, दैवी कृपेचं लक्षण आहे. भगवद्गीतेच्या सोळाव्या अध्यायात दैवी संपत्ती वर्णन केली आहे. त्यात 'अभय' हे प्रथम वर्णन केलं आहे. आजारी असतांना, पैसा नसतांना इतर कोणतीही अनुकूलता नसतानाही निर्भयता असणं हे उत्तम सात्विक दैवी प्रकृतीचे लक्षण आहे. ते मागणं इथे मागितलं आहे.

क्लेश आणि ताप ह्यांचा एकच अर्थ आहे असं वाटतं पण क्लेश शब्दाचा अर्थ योगशास्त्रात थोडा निराळा केला आहे. क्लेश म्हणजे मनांत सतत उत्पन्न होणाऱ्या इच्छा, राग, द्वेष, अज्ञान इ. हे सर्व दोषच आहेत. देह म्हणजे मी आहे ही गैरसमजूत, भ्रांती आहे. त्यामुळे पुढची सर्व दु:ख निर्माण होतात. देहात्मवादाने ज्ञानी पंडीतही ग्रासलेले दिसतात. ते पांडीत्य दाखवितात. पण मी देह आहे ही बुद्धी काही जात नाही. मी काळा आहे, मी गोरा आहे, मी सुंदर आहे - मी म्हणजे शरीर आणि शरीराला उद्देशूनच तो हे सगळं समजतो. असा देहात्मवाद बळावला की इतर कुठेही लक्ष जात नाही. फार मोठा अभिमान निर्माण होतो. कुटुंबीयांनी जरा मनाविरूद्ध केलं की त्यांचा राग येतो. मग ईश्वर, संत इत्यादी बाजूलाच राहिले. हे स्वाभाविक क्लेश मानलेले आहेत. त्यामुळे सर्व कर्मही दोषी होतात. शुद्ध कर्म होत नाहीत. या सगळ्याला मी देह आहे ही भ्रांती, अज्ञान कारणीभूत आहे. मूळामध्येच ही जी अविद्या, भ्रांती आहे त्यालाच क्लेश मानलं आहे. देहात्मवाद सुटल्याशिवाय निर्भयता निर्माण होत नाही. आपल्या कर्माबद्दल विचारही होऊ शकत नाही. आपण कर्म करायचं आणि सुखी व्हायचं म्हणजे देहाला सुखी करायचं. पुर्वीच्या कर्माचा, पापपुण्याचा, नीतीअनीतीचा कशाचाही विचार नाही. ह्यामुळे वैयक्तिक दुरीते तर आहेतच पण सामुदायिक दुरीतेही तयार होतात. वैयक्तिक, सामुदायिक सर्वही दुरीतांचा क्षय व्हायला पाहिजे त्याकरता ईश्वराची प्रार्थना व्हायला पाहिजे. ही दुरीते ज्या राग, द्वेष, मत्सर शत्रूत्व इत्यादी दुर्गुणांमुळे घडतात ते दुर्गुण नष्ट झाले पाहिजेत म्हणून ही प्रार्थना केली आहे.

******

धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिं सत्संगाप्तिं देहि भुक्तिं च मुक्तिम् ।
भावासक्तिं चाखिलानंदमूर्ते घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥

ईश्वराजवळ काय मागावं हे या श्लोकात महाराजांनी सुचविलेलं आहे आणि ईश्वरच ते देऊ शकतो. 'धर्मे प्रीतिं' ही पहिली मागणी त्यांनी मागितली आहे. हे एक प्रथम उपादेय आहे. धर्माबद्दल अत्यंत प्रेम मनात उत्पन्न होऊन, प्रेमपूर्वक धर्माचं आचरण केलं म्हणजे त्याचं फळ शुद्ध बुद्धीरुपाने मिळतं. 'सन्मतिं'या शब्दाने दुसरं उपादेय मागितलं आहे. धर्मप्रेमही सन्मतीच आहे. तरीसुद्धा आरंभाचं आहे. जास्ती जास्ती बुद्धी चांगली होत जावी हे एक उपादेय आहे. त्याचप्रमाणे देवभक्ती हीसुद्धा मागितली आहे. अंतःकरणामध्ये भक्ती उत्पन्न व्हावी हे मागणं देवाकडेच मागावं लागतं. जीवाच्या प्रयत्नाने हे साध्य होत नाही. धर्मप्रीती, सन्मती आणि देवभक्ती उत्पन्न होणं याच्याकरीता सत्संगती पाहिजे. संतांची संगती आम्हाला मिळावी. संत हे व्यक्त अवस्थेमध्ये असेपर्यंत ज्यांना संगती झाली, त्यांना त्यांच्या सुकृतानुसार वरील सर्व उपादेय वस्तुंचा लाभ होतो. 'सन्मति' हे मागणं देवाजवळच मागितलं आहे. कारण आपण प्रयत्न करून अशी सन्मती होईलच असं नाही. 'सत्संगाप्तिं'हे चौथं मागणं मागितलं आहे. ज्यांच्या जवळ सद्‌बुद्धी आहे, धर्माचरण आहे, जे देवाची खरी भक्ती करतात, त्यांची संगती धरली की आपोआप सर्व दैवीकृपा मिळते. ईश्वराच्या कृपेने सत्पुरुषांची संगती घडून येते. मार्गदर्शन होतं आणि त्याप्रमाणे वागण्याची बुद्धी होते म्हणून आम्हाला नेहमी सत्संग घडावा हे मागणं मागितलं आहे.

आणि शेवटी, 'देहि भुक्तिं च मुक्तिं' हे मागणं मागितलं आहे. भुक्ती म्हणजे संसार. संसारही मागा म्हणाले, हरकत नाही पण देवाजवळ मागा. मुक्ती तर हवीच आहे. सर्व दुःखांची निवृत्ती हाच मोक्ष आहे. हा मोक्ष मागायचा पण त्यापूर्वी आपलं मन जे विषयभोगांकडे जात असतं त्यासाठी विषयभोगही मागायला हरकत नाही. पण ते देवाजवळ मागायचं. अढळपद मिळविण्यासाठी ध्रुवाने उग्र तपश्चर्या करून ते पद प्राप्त करून घेतलं आणि देवाच्याच कृपेने त्यातून तो सुटला.

मुक्ती तर घ्यायचीच आहे मागून, ती ईश्वराशिवाय दुसरं कोणीही देऊ शकत नाही. सर्वही दुःख कायमची जाणं याला मोक्ष म्हणतात. आमची व्याधीरुप दुःख जरी औषधाने बरी झाली तरी ती पुन्हा कधीही होणार नाहीत असं सांगता येत नाही. केव्हांही दुःख उत्पन्न होणार नाहीत, असं हवं असेल तर जन्म कायमचा बंद झाला पाहिजे. देहाचा संबंध सुटला पाहिजे. देहाचा संबंध सुटायचा म्हणजे कर्मं संपली पाहिजेत. आपल्या कर्मांचं फळ म्हणून देहाचा संबंध, म्हणजे जन्म येतो. ह्याकरता सर्व पापपुण्यकर्माचा ईश्वरकृपेने क्षय झाला पाहिजे म्हणजे मग जन्म-मृत्यू आणि दुःख कायमची संपतात. ही अवस्था अनेक जन्मांनंतर मिळते. अगदी शेवटी 'भावासक्तिं' हे मागणं मागितलं आहे. भाव म्हणजे प्रेम. ते अधिकाधिक वाढत जावं ही प्रार्थना केली आहे. ही भावासक्तीसुद्धा त्याच्याच कृपेने मिळते. या सातही गोष्टी ईश्वराने आपल्याला दान कराव्यात म्हणून ही प्रार्थना केली आहे.

*******

''देव-दैत्याचं युद्ध कधीही संपत नाही म्हणतात. माणसाच्या मनात येतं दुसऱ्यांना सुख का मिळावं? आपल्याला का मिळू नये? उलट दुसऱ्यांना सुख मिळू नये अशीही कोणाकोणाची इच्छा असते. मत्सर ज्याला आपण म्हणतो. दुसऱ्याचं चांगलं पाहिल्यावर मनात द्वेष उत्पन्न होतो, ही अगदी तामसी वृत्ती आहे. दुसऱ्याचं सुख पाहिल्यावर आपल्याला सुख व्हायला लागलं म्हणजे त्याला सात्विक वृत्ती म्हणतात. तो अभ्यास केला पाहिजे. मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षा वगैरे उपाय योगशास्त्रकारांनी मनाला स्थिर करण्याकरता, शुद्ध करण्याकरता सांगितले आहेत. सुखी माणूस बघितल्यावर आपल्या मनात मैत्रीची भावना निर्माण व्हायला पाहिजे. दु:खी माणसाला पाहिल्यावर मनामध्ये करुणा, दया उत्पन्न व्हायला पाहिजे. म्हणजे त्याला मदत करणं, उपयोगी पडणं ही कार्य होतात. त्यानेसुद्धा मनाला शांती मिळते. त्यानंतर शास्त्रकारांनी तिसरा मार्ग सांगितला आहे, तो म्हणजे मुदिता. पुण्यवान माणसाकडे बघून आनंद वाटला पाहिजे. आपल्याला जमत नाही, पण तो चांगलं करतो आहे त्याला सहाय्य करावं हाही एक अभ्यास आहे आणि पापी लोकांची उपेक्षा करावी असं सांगितलं आहे. पाप करणाऱ्याला शासन व्यक्तीने करायचं की समाजाने हाही एक प्रश्नच आहे. पण ज्या व्यक्तीला आपल्या मनाची भूमिका तयार करायची आहे त्याने त्या पापी माणसाची उपेक्षा करायची आहे. वर सांगितलेला अभ्यास केल्याने आपलं चित्त प्रसन्न होतं. परंतु या भावनांचा अभ्यास होण्याकरतासुद्धा ईश्वराची कृपा पाहिजे. ईश्वरी सहाय्याशिवाय कसं होणार!

आपल्याच मनामध्ये देव-दैत्य आहेत, असं उपनिषदांमध्ये सांगितलं आहे. सात्विक वृत्ती म्हणजे देव आणि तामसी वृत्ती म्हणजे दैत्य. ह्यांचं युद्ध नेहमी चालू असतं. एखाद्या वेळी सात्विक वृत्तीचा जय होऊन आपल्या हातून पुण्यकर्म घडतात. तर दुसऱ्या वेळेस तामसी वृत्ती प्रबळ होऊन मनुष्याचा अध:पात होतो.

ज्याला आपली पारमार्थिक उन्नती करून घ्यायची आहे, व्यवहार कमी कमी करत आणायचा आहे, त्याच्याकरता काही उपाय आहेत. मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षा यांच्या अभ्यासाने मनोवृत्ती पुष्कळ शांत होतात. ह्याने असं केलं, तो तसं बोलला, त्याचं वागणं असं आहे, या सगळ्या गोष्टींचा आपल्याला राग येतो, पण त्याचा काय उपयोग आहे? त्यावर उपेक्षा हाच इलाज आहे. तुम्हाला जर मन:शांती हवी असेल तर तुम्ही उपेक्षेचाच अभ्यास केला पाहिजे. तुम्ही एकटे काही प्रतिकार करू शकत नाही त्याकरता काळ वेळही पाहायला पाहिजे. आपली वृत्ती व्यवहार सोडायला तयार आहे का? हे आधी तपासलं पाहिजे. तो व्यवहार सोडण्याच्या दृष्टीने हे सर्व उपाय आहेत. योगशास्त्र हे प्रयोगशास्त्र आहे. हा अभ्यास म्हणजे आध्यात्मिक प्रयोग आहे. तो प्रयोग करून पाहायचा आहे. काम-क्रोध-लोभ वगैरे जे भयंकर विचार आहेत त्यानीच मन:शांती नाहीशी होते ना! त्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून जर मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षा या साधन वृत्तींचा अभ्यास केला तरच त्या भयंकर विकारांवर जय मिळू शकतो.

*******

सात्विक प्रकृती, दैवी प्रकृती, दैवी संपत्ती ज्याला म्हणतात ती संपत्ती जास्तीत जास्त आपण मिळवायला हवी. मनुष्यजन्म त्याकरता आहे. बाहेरच्या संपत्तीला विशेष महत्व नाही. दैवी संपत्ती गीतेच्या सोळाव्या अध्यायात सांगितली आहे. आपली बुद्धी सात्विक बनली पाहिजे. त्याकरीता मनाच्या संयमाची, निग्रहाची अत्यंत जरूरी आहे.

पण अर्जुनासारखा एवढा मोठा योध्दा, त्याने सांगितलं,'मनाचा निग्रह मी करू शकत नाही'

'चञ्चलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् । तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ।' अर्जुनाने हात टेकले आहेत त्या मनापुढे. केवढा ईश्वरभक्त होता अर्जुन. नामस्मरण अखंड चाललेलं आहे. अर्जुन निजला म्हणजे त्याच्या केसातून 'कृष्ण, कृष्ण' असं ऐकू यायचं म्हणे. अखंड नामस्मरण आहे. गुरुभक्तीही तशीच आहे. 'वायोरिव सुदुष्करम्' म्हणजे वाऱ्याला जसं बांधून ठेवणं अशक्य आहे त्याप्रमाणे मनाला बांधून ठेवणं, स्वस्थ बसवणं हे अशक्य आहे. मग भगवंतांनी त्याला उपाय सांगितला, मनाचा निग्रहसुद्धा होऊ शकतो म्हणाले. 'अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येणच गृह्यते ।' मनाच्या निग्रहाचा अभ्यास पाहिजे आणि वैराग्य म्हणजे विषयांकडे धावणारं जे मन आहे त्याला थांबवता आलं पाहिजे. विषयाची तृष्णा हा एक मोठा दोष आहे मनाचा, तो कमी केला पाहिजे. म्हणजे आपोआप मन स्थिर होतं. एकाग्रता उत्पन्न होते. ध्यान करण्याची भूमिका त्या मनाची तयार होते. मनाची एकाग्रता असल्याशिवाय ध्यान होऊ शकत नाही. एकाग्र भूमिकेवर मन गेलं म्हणजे मग ध्यानाचा अभ्यास सुरु होतो. निरोध करणं किंवा एकाग्रता करणं हे महत्वाचं आहे. निरोध म्हणजे कोणतीही वृत्ती नसणं, सगळ्या वृत्ती शांत होणं आणि एकाग्रता म्हणजे एकाच ठिकाणी मन स्थिर होऊन राहाणं. मनाला स्थिर होण्याची कधीही माहितीच नाही. अतिशय चंचल आहे मन म्हणतात. पण त्यालाही स्थिर करता येतं. त्यासाठी अभ्यास, प्रयत्न चालू पाहिजेत. गीतेच्या सहाव्या अध्यायात मन स्थिर कसं करावं या विषयी सगळा अभ्यास सांगितला आहे.

विषयाकडे आपलं मन सारखं चाललेलं असतं. विषयापासून आपल्याला सुख मिळेल ही एक विचारसरणी आपल्या मनामध्ये दृढ झालेली असते. अनेक जन्मांचे ते विचार असतात. त्यामुळे धन पाहिजे आणि सुखाची सामुग्री म्हणून जी ठरविलेली आहे, ती सामुग्री आपण जमविली पाहिजे याच विचारामध्ये मन गुंतून जातं म्हणून मनाचा निग्रह होऊ शकत नाही.

अर्जुनसुद्धा म्हणाला, 'मनाचा निग्रह करायला मी काही समर्थ नाही' आणि मनाचा निग्रह झाल्याशिवाय धर्माचरण होऊ शकत नाही. सुखाचं साधन धन आहे असं वाटतं. आणि ते मिळविण्याचा जर प्रयत्न सुरु झाला तर धर्माधर्माचा विचार कसा राहणार मनामध्ये. जास्तीत जास्त धनाचा संग्रह करायचा हाच विचार मनामध्ये आल्यामुळे मनाचा निग्रह होत नाही. धर्माकडे लक्ष लागत नाही. जितकं मिळवता येईल तितकं धन मिळवायचं या विचारामुळे नीतीअनीतीचा विचार मनामध्ये येतच नाही. त्यावेळेला मन अतिशय उद्दाम बनलेलं असतं. मनातले विकार, अहंकार कमी होत नाही. तो जास्ती जास्ती वाढतो. मनामध्ये औद्धत्य, अतिशय अहंकार उत्पन्न झाल्यावर ईश्वरभजन किंवा धर्माचरण हे होऊ शकत नाही.

*******

भारतवर्षामध्ये ईश्वर आणि सद्गुरु यांचं विशेष महत्व आहे. ईश्वरभक्ती आणि गुरुभक्तीमध्येही पुष्कळ प्रकार आहेत. देहाने, वाणीने, मनाने ही उपासना घडावी - ही त्रिकरण साधनं आहेत. देहाचा उपयोग उपासनेमध्ये झाला पाहिजे, वाणीचाही झाला पाहिजे. मनाचा तर अत्यंत आवश्यक आहे. मनाकरता तर ही सर्व साधनं आहेत. मन हे प्रथमपासूनच पाहिजे त्या उपासना मार्गामध्ये. त्यात मार्गदर्शकाची जरूरी आहे. व्यवहारातसुद्धा मार्गदर्शक लागतो, परमार्थात तर तो अत्यंत आवश्यक आहे.

अनेक प्रकारचे संशय मनामध्ये उत्पन्न होत असतात. ग्रंथ जरी असले तरी केवळ ग्रंथांवरून योग्य मार्गदर्शन घडत नाही. मनामध्ये आलेले संशय हे ग्रंथ कसे दूर करणार? प्रत्यक्ष शब्दाने, वाणीने सुधारणा करणारा असा कोणीतरी पाहिजे. सद्गुरुंचं, आचार्यांचं लक्षण सांगतांना कोणत्या आचार्यांना शरण जावं हे भागवतामध्ये सांगितलेलं आहे. 'शाब्दे परेच निष्णात' असे सद्गुरु असतात.

आचार्य, गुरुपरंपरा, ज्ञानी महात्म्यांची परंपरा जी भारतामध्ये आहे, ते ज्ञानी महात्मे शब्दांनी ज्ञान प्रदान करतात. प्रश्न विचारणाऱ्या शिष्याच्या मनात जिज्ञासा असली तरी गुरुंबद्दल श्रद्धा प्रथम पासून निर्माण झालेली नसते. इच्छा असते कोणीतरी मार्गदर्शन करणारा भेटला पाहिजे म्हणून. पण कोणते प्रश्न विचारायचे, कसे विचारायचे याची एक पद्धत असते, ती ते बाळगत नाहीत.

आमची बुद्धी धर्माकडे जाणारी असेल कदाचित अधर्माकडे जाणारीही असेल. मागच्या जन्मात जे कर्म केलेलं आहे, त्याचे संस्कार आमच्या बुद्धीवर झालेले आहेत ते संस्कार घेऊन आम्ही जन्म घेतलेला आहे. योग्य मार्गदर्शन करणारा भेटला असेल तर बुद्धीवर चांगले संस्कार होतात आणि तसे घेऊन तो माणूस जन्माला येतो.

त्या बुद्धीला प्रेरणा करणारा ईश्वर आहे. बुद्धी, अंत:करण, मन ज्याला म्हणतात ती पंचभौतिक आहेत. पंचमहाभूतांपासून निर्माण झालेलं बाहेरचं शरीर आहे तसं मनही पंचमहाभूतांपासून निर्माण झालेलं आहे. पण शास्त्राच्या दृष्टीने मनामध्ये पंचभूतांचा सत्वांश अधिक आहे. ते सत्वांश घेऊन जन्माला आलेलं मन दुसरीकडे का जातं, राजस, तामस का बनतं तर त्याला तसा संपर्क होतो म्हणून. संगतीचा मनावर फार परिणाम होतो. दुसऱ्याच्या मनाची, वाणीची संगती झाली की आपल्या मनाचा सत्वांश कमी कमी होतो. रजोगुण, तमोगुण अधिक होतो. समर्थांनी मनाच्या श्लोकांमध्ये, 'मना सज्जना भक्तीपंथेची जावे' असं सांगितलं आहे. मनाला सज्जना म्हणून संबोधन केलं आहे. मन हे खरंतर चांगलं आहे. ज्या मनाने ईश्वराला जाणायचं आहे त्याने आपली योग्यता टिकवली पाहिजे, वाढविली पाहिजे. ती टिकवणं कठीण आहे. पूर्वजन्मामध्ये अधर्माचरण करून, तसे संस्कार घेऊन जे जन्माला आले असतील त्यांच्या संगतीमध्ये चांगलं मन असलेला जीव सापडला तर त्याचं मन बदलतं. दुसऱ्याच्या शब्दांचा, आचरणाचा त्याच्या मनावर परिणाम होतो. दुसऱ्याकडे बंगला आहे, मोटार आहे हे सर्व ऐश्वर्य पाहिल्यावर ते आपल्याला मिळावं असं वाटतं. चांगले जरी संस्कार मनामध्ये असले तरी ते टिकत नाहीत ना! मोह उत्पन्न होतो. ह्या मोहामुळे मनाचे सगळे संस्कार बदलून जातात. संतांची संगती याकरता आहे. ते हिताचा उपदेश करतात.

*******

भगवद्गीतेमध्ये दैवी संपत्ती आणि आसुरी संपत्तीचं भगवंतांनी पुष्कळ वर्णन केलेलं आहे. दैवी संपत्तीचा विकास ज्ञानी पुरुषांनी करून घेतलेला आहे, त्यामुळे आसुरी संपत्ती कशाला येईल त्यांच्याजवळ? शांती आहे, राग नाही. नाथ महाराजांना राग आणण्याकरता बक्षीस लावावं लागत होतं, ही ऐकतो गोष्ट आपण. पूर्ण शांतीची स्थिती आहे. मन, बुद्धी अत्यंत स्थिर व्हायला पाहिजे. मनात कोणतेही विकार, तरंग येऊन उपयोग नाही. समुद्राचं पाणी शांत आहे, लाटा नाहीत काही नाही. तशी स्थिती ज्यांची ज्ञानप्रभावामुळे झाली आहे असे हे ज्ञानी महात्मे, जाणायचं ते जाणतात. जे बाहेर पसरलेलं आहे त्याची त्यांना जरूरच नाही. जे राहाणारच नाहीये ते जाणून घेतलं काय किंवा त्याच्याबद्दल आसक्ती धरली काय, उपयोग काय आहे?

पुष्कळ आयुष्य मिळालं, पुष्कळ संपत्ती मिळाली तरी सुख मिळेल असं नाही. एक राजा होता. प्रजाजनांचं त्याच्यावर प्रेम होतं. त्या सगळ्या लोकांनी ईश्वराची भक्ती केली, प्रार्थना केली. प्रसन्न झाले ईश्वर. त्यांनी लोकांना विचारलं, 'काय पाहिजे?' लोक म्हणाले, 'आमच्या राजाला दहा हजार वर्षे आयुष्य द्या.' राजाला काही विचारलं नाही. काही नाही. 'तुमचा राजा दहा हजार वर्षे जिवंत राहील' असं ईश्वराने सांगितलं. लोकांनी राजाला येऊन सांगितलं, 'राजेसाहेब, तुम्हाला आनंदाची बातमी आहे. ईश्वराने तुम्हाला दहा हजार वर्षे आयुष्य दिलं आहे.' राजा म्हणाला, 'काय केलंत तुम्ही! मला आधी विचारलं का नाहीत? मी इतकी वर्षे जगून काय करायचं?' म्हणजे राजाचं आयुष्य वाढविलं त्या प्रजाजनांनी प्रेमाने, पण हित साधलं नाही. राजाची दृष्टी वेगळी आहे.

हा विचार ते ज्ञानी महात्मे करतात. आयुष्य पुष्कळ आहे. परंतु मनाला शांती नाही, मनाला समाधान नाही. अनित्य आणि दु:खमय सगळं आहे. अशा लोकांमध्ये तू जन्माला आला आहेस, असं भगवान् सांगताहेत. तेव्हां पूर्ण आणि नित्य आनंद जर तुला पाहिजे असेल तर माझं भजन तू कर. तर नित्य काय आहे आणि अनित्य काय आहे याचा पूर्ण विचार ज्यांनी केला आहे त्यांचं मनही तयार झालेलं आहे. विवेकसंपन्न मन आहे. प्रत्येक वेळेला विवेक आहे. पूर्ण हित कोणतं इकडे त्यांचं लक्ष आहे. आपल्या मनाला कसं बरं वाटतं इकडे लक्ष नाही.

तर तो विचार पूर्ण मनामध्ये असल्यामुळे त्या बाह्य संसारामध्ये कितीही उत्कर्ष दिसला, वाटला तरी ते सर्वही अनित्य आहे, हे त्यांनी जाणलं आहे. दोन वर्गच त्यांनी केले आहेत. नित्य कोणचं आहे आणि अनित्य कोणचं आहे हे समजून घेण्याकरता, त्याच्यामध्ये अशुद्धी किती प्रकारची आहे, ती कशी दूर करता येईल, त्याचे उपाय कोणचे हे जाणणारे कोणीतरी भेटले पाहिजे.

रोग्याला काही स्वत:ला कोणता रोग झालाय ते कळत नाही. तो किती वाढला आहे, केव्हां जाईल याचं ज्ञान त्याला नाही ना! जो शरीरशास्त्रज्ञ असेल त्याच्याकडे त्याला जावे लागेल. तो सांगेल त्याप्रमाणे औषध वगैरे उपाय करावे लागतील. संतांची संगती जी सांगितली आहे ती याकरता आहे.

*******

संतांची, सद्गुरुंची जर भेट झाली तर योग्य मार्गदर्शन ते करीत असतात. असे जे महात्मे आहेत त्यांचं वर्णन महाराजांनी केलं आहे. गुरुस्तुती म्हणून सात आठ श्लोक आहेत. कोणी एक भक्त, तुकाराम नावाचा, गाणगापूरला देवाची सेवा करीत होता. महाराजांना देवांनी आज्ञा केली, 'ह्याला तुम्ही काहीतरी मार्गदर्शन करा.' त्यावेळेला हे स्तोत्र त्यांनी केलं आहे. त्यापैकी एक श्लोक आहे, महत्वाचा आहे; -

अखंड आत्मा अविनाशी दत्त ।
तया पदी लाविती जे स्वचित्त ।
चित्तभ्रमा सोडिती ते कृतार्थ ।
तो पूर्ण आनंद गुरु समर्थ ॥

या गुरुस्तुतीतल्या प्रत्येक श्लोकाच्या शेवटी 'तो पूर्ण आनंद गुरु समर्थ' असं आहे. पूर्ण आनंदरूपी सद्गुरु आहेत. 'ब्रह्मानंदम् परम सुखदम्...' हे आनंदरूप सद्गुरुंचं स्वरूप आहे.

तर असे जे गुरु आहेत, पूर्ण आनंदरूप बनून गेलेले, ते समर्थ आहेत. शिष्याची सुधारणा करण्याचं सामर्थ्य त्यांच्याजवळ आहे. त्याचं वर्णन केलेलं आहे - 'अखंड आत्मा अविनाशी दत्त....'

गुरुमहाराजांच्या जवळ काय आहे? आत्मस्वरूप जे आहे, ईश्वररूप, ते त्यांच्याजवळ आहे. ते ईश्वरस्वरूप म्हणजे एक आहे, अखंड आहे. ईश्वरभक्तीमध्ये जे अनेक प्रकार असतात, त्यातून जाता जाता, ईश्वर एक आहे ही बुद्धी झाली पाहिजे, तरच तो ज्ञानाचा अधिकारी होतो. ईश्वर आणि जीव एकरूपच आहेत हे शेवटी कळायचं आहे, मी ब्रह्मरूपच आहे, मी संसारी नाही, हे शेवटी कळायचं आहे.

पण अगोदर जीव कोण आहे हे स्पष्ट कळलं पाहिजे. ईश्वर कसा आहे हे सुद्धा कळलं पाहिजे.नंतर मग जीव आणि ईश्वर एक आहेत हे ज्ञान होतं. त्यातही पुन्हा सद्गुरु हे ईश्वराचं स्वरूप आहे हे समजत नाही. ईश्वर श्रेष्ठ आहे अशी कोणाची बुद्धी असते, तर दुसऱ्या कोणाला वाटतं, सद्गुरु हे निराळे आहेत, सद्गुरु हेच श्रेष्ठ आहेत, इथे श्रेष्ठकनिष्ठ व्यवहार काही उपयोगी नाही. विश्व निर्माण करणं, त्याचं संरक्षण करणं आणि पुन्हा त्याचा उपसंहार करणं, ही ईश्वराची कार्ये आहेत.

जीवांच्या बुद्धीतले दोष काढून टाकणं, त्यांची बुद्धी, मन हे स्थिर करणं, त्या बुद्धीमध्ये आत्मप्रकाश- ईश्वरस्वरूपाचा प्रकाश करणं हे कार्य सद्गुरुंचं आहे. ईश्वराचं ऑफिस निराळं आहे आणि सद्गुरुंचं ऑफिस निराळं आहे. निराळं याचा अर्थ ते वेगवेगळे आहेत काय? तर नाही, कार्य करणारी रूपं वेगळी वेगळी आहेत.

म्हणून सद्गुरु स्वरूपाने हे कार्य परमात्मा करतो आहे. दत्तात्रेय, श्रीपादवल्लभ, नृसिंहसरस्वती, वासुदेवानंद सरस्वती - स्वामीमहाराज, शंकराचार्य महाराज ही सगळी ईश्वराची रूपं आहेत. सद्गुरुरूपांनी आलेली आहेत. अज्ञानातून जीवाला बाहेर काढायचं आहे. म्हणून सद्गुरुमूर्ती अदृश्यरूप नाही, ईश्वराचंच ते एक रूप आहे. ईश्वरानेच सद्गुरुंचं रूप घेतलेलं आहे आणि त्यारूपाने ईश्वराचं कार्य चाललेलं आहे.

*******

जे ज्ञानी महात्मे आहेत ते ईश्वररूप बनलेले आहेत, तेच सद्गुरुरूप आहेत. त्यांचं पहिलं लक्षण सांगितलं आहे,

अखंड आत्मा अविनाशी दत्त । तया पदी लाविती जे स्वचित्त ।

आपलं अंत:करण त्या परमेश्वराच्या चरणी त्यांनी लावलेलं आहे. दुसरं काही नाही मनात त्यांच्या. 'विषय तो त्यांचा झाला नारायण' म्हणतात. मनामध्ये दुसरा विषय नाही. त्याच आनंदामध्ये ते निमग्न आहेत. मनामध्ये ईश्वराशिवाय दुसरं काही नाही.

संसारात राहूनही त्यांना त्याचं काही भान नाही. नाथ महाराज संसारीच होते. पूजाअर्चा चालू आहे, उत्सव वगैरे चालू आहेत, त्याचप्रमाणे प्रवचनं चालू आहेत, अखंड चाललेलं आहे सगळं. आणि अखंड ईश्वराचं अनुसंधानही आहे. ही स्थिरता बुद्धीमध्ये उत्पन्न झाली पाहिजे ना! स्थितप्रज्ञाची जी लक्षणं सांगितली आहेत दुसऱ्या अध्यायामध्ये भगवंतांनी, ती इथे दिसतात. मनामध्ये कोणच्याही वासना राहून उपयोग नाही. असं झालं म्हणजे त्याची बुद्धी स्थिर झाली. त्यालाच स्थितप्रज्ञ म्हणतात.

परमात्म्याच्या स्वरूपाच्या ठिकाणी अखंड अंत:करण लागलेलं आहे. ते ईश्वरस्वरूप झालेलं आहे. 'अखंड आत्मा अविनाशी दत्त' अखंड म्हणजे ज्याच्यामध्ये भेद काही नाही. अनंत देव आहेत भारतामध्ये. ईश्वराचं पूर्ण दर्शन म्हणजे परमेश्वर एकच आहे हे जाणणं. मीसुद्धा त्याच्यापेक्षा वेगळा नाही, हे ईश्वराचं पूर्ण दर्शन आहे. नामदेवांनासुद्धा पाठवलं पांडुरंगांनी, 'जा तुला पक्क व्हायचं आहे ना! कच्च मडकं म्हटलं म्हणून आपला अपमान झाला असं वाटतंय ना. ईश्वराचं पूर्ण दर्शन होण्याकरता पूर्ण ज्ञानी जो महात्मा आहे त्याच्याकडे तुला जायला पाहिजे.' नामदेव गेले त्यांना सद्गुरु भेटले. त्यांच्या एका वाक्यानेच नामदेवांना पूर्ण बोध झालेला आहे.

तर आत्मस्वरूप परमात्मा हा अखंड आहे म्हणजे एक आहे. सर्वत्र ईश्वर एक आहे ही बुद्धी पाहिजे. गणेश पुराणामध्ये गणेशांनी गीतेचा उपदेश वरेण्य राजाला केला तेव्हा हे सांगितलं. शिव असो, विष्णू असो, शक्ती असो, सूर्यनारायण असो, बाहेरुन दिसणारी ही रूपं आहेत. त्या सर्वही स्वरूपामध्ये अभेद आहे. एकच तत्व आहे ही बुद्धी ज्याला उत्पन्न झाली तो मोठा योगी आहे. अखंड आहे परमात्मा, सर्वत्र एकच आहे हे त्याला कळलेलं आहे.

प्रल्हादजींच्या मनामध्ये आपल्या बापाबद्दल द्वेष काही निर्माण झाला नाही. प्राण घेणारा बाप आहे. 'हरीचं भजन तू सोडलं पाहिजेस, माझा शत्रू आहे हरी. माझ्या भावाला त्याने मारलेलं आहे. त्याचं तू भजन करतोस?' या वक्तव्यावर प्रल्हादजी म्हणाले, 'मी भजन करतच नाही. बुद्धीला प्रेरणा करणारा तो परमेश्वर आहे. त्याच्या प्रेरणेनेच माझी बुद्धी तिकडे जाते.' इतकी शुद्ध भक्ती आहे अंत:करणामध्ये. म्हणजे कर्तृत्व स्वत:कडे घेतच नाहीत. 'मी भजन करतच नाही ' आणि ही गोष्ट खरी आहे. आपण उपासना करत आहोत असं ज्याला वाटतं त्याची उपासना पूर्ण व्हायला अजून अवधी आहे असं समजावं. त्यामुळे कोणीही कितीही त्रास दिला, कष्ट झाले तरी त्याच्याबद्दल ज्ञानीमहात्म्यांची उपेक्षा बुद्धी असते.

*******

ईश्वर स्वरुप अखंड आहे, ही जर भावना मनामध्ये दृढ झाली तर राग द्वेषादिक विचार कशाला निर्माण होतील? मन हे अत्यंत स्थिर, शांत राहिलं पाहिजे आणि परमात्मा हा अविनाशी आहे. जीवाला जोपर्यंत देहाभिमान सुटलेला नाही तोपर्यंत तो जीवात्मा विनाशी आहे. पुन्हा मृत्यू आहे, पुन्हा जन्म आहे. तो समजतो आहे म्हणून आहे. 'मला मृत्यू येणार आहे.' हे तो समजतोय म्हणून त्याला मृत्यू आहे.

पण शुद्ध मी कोण आहे, हे जर त्याला कळून आलं तर तोही तसाच अविनाशी आहे. देह अनित्य आहे. देहामध्ये राहाणारा जीवात्मा नित्य आहे. आरंभालाच हा उपदेश अर्जुनाला भगवंतांनी केलेला आहे. भगवान म्हणाले, अनेक जन्म जीवाचे जातात पण जीव नष्ट होत नाही. घेतलेलं शरीर सोडणं म्हणजे मृत्यू आहे. नवीन शरीर धारण करणं म्हणजे जन्म आहे. मृत्यू कायम आहे. ही जाणीव अगोदर त्याला करून दिलेली आहे आणि मग ईश्वरस्वरूप कसं आहे, विश्वव्यापी कसं आहे, ते विश्वरूप दाखवलं त्याला.

म्हणून ईश्वर अविनाशी आहे ही उपासकाच्या मनामध्ये भावना पाहिजे. आपल्याला मृत्यू येणार, आपला नाश होणार असं अज्ञानानं वाटतं कारण देहालाच तो, 'मी' समजतो. देहाला मृत्यू ठरलेलाच आहे. देहाबरोबर मलाही मृत्यू आहे कारण देह म्हणजेच मी आहे, असं जरी तो समजत असला, तरी आपला उद्धार करणारा ईश्वर मात्र अविनाशी आहे म्हणून तो सर्वांचा गुरु होऊ शकतो आणि हे ज्ञान झाल्यावर उपासनाही दृढ होते आहे. जर याप्रमाणे 'अखंड आत्मा अविनाशी दत्त । तया पदी लाविती जे स्वचित्त ।' हे एक ज्ञानी महात्म्यांचं, सज्जनांचं, सद्‌गुरुंचं लक्षण त्यांनी सांगितलेलं आहे.

त्यांच्या मनामध्ये अखंड परमात्मरूप आहे. सगुण, निर्गुण कोणचंही दत्तरूप का होईना ते त्यांच्या मनामध्ये आहे. सगुण तो आहे आणि निर्गुणही तोच आहे आणि दुसरी बाजू त्यांनी दाखवली आहे - 'चित्तभ्रमा सोडिती ते कृतार्थ ।' हा जो संपूर्ण भ्रम आहे. आपल्याला तो भ्रम वाटतं नाही. आपल्याला संसार सगळा खराच वाटतो. तसे संस्कार अनेक जन्मांपासून आमच्याकडे आलेले आहेत, आमच्या बुद्धीवर झालेले आहेत. तर संसार सत्य आहे, सगळीही सुखं दु:खं वगैरे खरी आहेत. असेनात. पण ही सगळी दु:खं घालवणारा सगळी सुखं देणारा ईश्वर मात्र अविनाशी आहे. ही बुद्धी जर कायम असेल तरी कल्याण आहे.

तर हा भ्रम ज्यांच्या मनातून पूर्णपणे गेलेला आहे ते ज्ञानी आहेत. ईश्वराच्या ठिकाणी त्यांचं चित्त अखंड लागलेलं आहे. मन स्थिर झालेलं आहे, झोपसुद्धा नाही. समाधीचा अभ्यास करणारे जे महात्मे आहेत त्यांना झोप कुठली लागणार? आहार विहाराकडे त्यांचं लक्ष नाही. काय आवश्यक असेल तेव्हढं करायचं आणि अखंड अनुसंधान करायचं. सगळ्याचा त्याग त्यांनी केला आहे मनातून. हा त्याग बाहेरून नाही. बाह्य त्यागाला त्याग म्हणत नाहीत. म्हणून त्यांच्याजवळ गेल्यानंतर ईश्वराचे गुण ऐकायला मिळतात आणि त्यामुळे आपल्या मनावरही परिणाम होतो.

*******

संसारही आहे मनामध्ये आणि ईश्वराचं अनुसंधानही आहे, असं दोन्ही होऊ शकत नाही. ईश्वराचं अनुसंधान जरी असलं तरी ते सकाम असणारं आहे. सांसारिक सुखाकडे अधिक लक्ष लागलेलं आहे आणि त्या प्रमाणे सगळी सुखं आपल्याला मिळावीत म्हणून ईश्वराकडे लक्ष लागलंय. तोही दोष आहे म्हणून त्यांनी दोन विभाग केले. संपूर्ण संसार, धन लोभ म्हणून जो आहे तो त्यांच्या मनातून पूर्णपणे गेलेला आहे. काही नाही. त्याच्याकडे लक्षंच नाही. राहिलं काय आणि नाही राहिलं काय. 'ठेविले अनंते तैसेची रहावे' हा एक त्यांचा मोठा गुण आहे.

सांसारिक दृष्टीने हा अभ्यास आहे आणि परमेश्वर चिंतनामध्ये अनन्य झालेत ना ते ! अन्य सगळं मनातलं काढून टाकून ईश्वराचं चिंतन करत आहेत. दुसरा कोणाचाही विचार मनात न आणता, ईश्वराच्या निर्गुण स्वरुपाचं चिंतन अखंड चालू आहे. त्याचे सामर्थ्य किती असेल ! ईश्वर निरंतर मनामध्ये आल्यानंतर ईश्वराला अवतार घ्यावा लागतो ना!

प्रल्हादजींनी काही मागितलं नव्हतं. सगळं सहन करीत होते ते. नाथमहाराजही सगळं सहन करीत होते. ज्ञानी महात्म्यांची तितिक्षा मोठी असते आणि त्या तितिक्षेचा परिणाम असतो. परमेश्वराला कशाचाच अभिमान नाही. अत्यंत अलिप्त ईश्वरस्वरुप आहे. शंकराचार्य महाराजांनी ईश्वराला पावसाची उपमा दिली आहे. पर्जन्याप्रमाणे ईश्वर आहे, त्याला काही दोष द्यायचं कारण नाही. उत्तम जमीनीमध्ये पाऊस पडला तर उत्तम पीक येईल. खडकावर पडला, समुद्रात पडला तर फुकट जाईल. तो दोष काय त्या पावसाचा आहे काय! जमीन कशी आहे, कोणत्या जमिनीत तो पाऊस पडलाय त्या जमिनीचा गुण आहे. पाऊस हा काही त्याला उपकरण नाही.

अनुकूल आणि प्रतिकूल या दृष्टीने परमात्मा अलिप्त आहे. ज्याने ज्याने अशी कर्मं केली आहेत. त्याला त्याला तशी फळ देऊन मोकळा, पुन्हा काही नाही. कोणाचाही पक्ष नाही काही नाही. अशी स्थिती असताना सुद्धा प्रल्हादला जिवंत ठेवलं पाहिजे अशी बुद्धी का व्हावी ईश्वराला? अलिप्त बुद्धी असताना फक्त सृष्टीचं कार्य चाललं आहे, जीवांच्या कर्माप्रमाणेच चाललेलं आहे. त्याचं सुद्धा स्वत:कडे कर्तृत्व घेत नाहीत म्हणे, सृष्टी विषम झाली आहे. आणि त्याचं फलही देण्याचं कार्य चालू आहे.

*******

परित्राणाय साधुनां विनाशायच दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ॥

भगवंतांची प्रतिज्ञा आहे. धर्मराजासारख्या धर्मशील महात्म्याचे रक्षण करण्याकरता भगवंतांचा अवतार झाला. त्यांना धर्माचरण न करू देणारे, विरोध करणारे जे आहेत त्यांचा विनाश करायचा, त्यांना जिवंत ठेवायचं नाही. क्षमा नाही आणि त्या रूपाने धर्माची स्थापना करायची. हे भगवंतांचं अवतार कार्य त्यांनी स्वत:च सांगितलं आहे.

धर्म हा काही दिसणारा नाही. धर्म अधर्म शास्त्राने सांगितलं आहे. शास्त्र म्हणजे ईश्वराची वाणी आहे. या शास्त्रद्वाराने आपल्याला धर्माधर्माचं ज्ञान होतं आणि तसंच ज्ञान धर्मशील महात्म्यांच्या आचरणावरूनही होतं. शिष्टाचार हेही एक प्रमाण स्मृतीकारांनी दाखविलेले आहे.

धर्मराज हे धर्मशील होते म्हणून गोपालकृष्णांचं त्यांच्यावर पहिल्यापासून प्रेम होतं. धर्मराजालाच राजा करायचा असा त्यांचा निश्चय झालेला होता. धर्मराजांचीही निष्ठा तशीच होती. शेवटपर्यंत धर्माचरण करायचे. संयमी राहून, तितिक्षासंपन्न राहून, सर्व सहन करून धर्म विरोधी आचरण कधीही न करता वागायचे. द्रौपदीने त्यांना वारंवार सांगावं, 'तुमच्या धर्मांचा उपयोग काय झाला? धर्माचं फळ या काळात मिळत नाही असं मला वाटायला लागलंय. फळ देणारा ईश्वर, आहे की नाही असं मला वाटतंय.' असं तिने बोलून दाखवावं. परंतु धर्मराजांची धर्माचरणाबद्दल इतकी निष्ठा होती की त्यांनी सांगावं, ''द्रौपदी, धर्माचरण करून काही फल माझ्या पदरात पडावं अशा इच्छेने मी धर्माचरण करीतच नाही. काही फळ मिळविण्यासाठी धर्माचरण करणं हा धर्माचा व्यापार केल्यासारखा आहे. तेव्हा ही ईश्वराची आज्ञा समजून धर्माचरण करायचं आहे'' त्यामुळे श्रीकृष्णांचं त्यांच्यावर अत्यंत प्रेम होतं. सर्व देवतांचंही प्रेम त्यांच्यावर होतं. म्हणून यमधर्मांनी त्यांची यक्षरूपाने परीक्षा पहाण्यासाठी प्रश्न विचारले आणि धर्मराजांनी योग्य उत्तरे देऊन चारही भावांना जिवंत केलं. हे धर्माचं सामर्थ्य आहे.

गोपाळकृष्णही त्या करताच अवतार घेऊन आलेले होते. धर्मराज्य व्हायला पाहिजे असं त्यांचं म्हणणं होतं आणि भारतवर्षामध्ये असे धर्माचरण करणारे संत महात्मे सर्व काळात होऊन गेले आहेत.

'भजिजो आदिपुरूषी अखंडीत ।'

असं मागणं मागताहेत ज्ञानराज! सर्व सुखं मिळू देत, कोणीही दु:खी राहू नये, पण त्या आदिपुरुषाला कधी विसरू नये. कृतज्ञ राहिले पाहिजे. हे देवाजवळच त्यांनी मागितले आहे. संत महात्म्यांचे हे मोठे कार्य आहे.

*******

अनेक जन्मांच्या अभ्यासाने, ईश्वरकृपेने शरीरादिकांपेक्षा मी वेगळा आहे इथपर्यंत बुद्धी येऊन पोहोचते. त्याचप्रमाणे आत्मस्वरुप म्हणजे, 'मी असंग आहे, सच्चिदानंदरुप आहे, साक्षी आहे मी. निर्विकार आहे.' हे समजणं आणि ते समजल्यानंतर मन स्थिर झालं पाहिजे.

ध्यानापेक्षा आणखी जास्ती स्थिर मन होणं, म्हणजे समाधी आहे. प्रत्याहारानंतर ध्यानाला सुरुवात आहे. प्रत्याहार झाल्यानंतर सगळ्या इंद्रियांपासून मन बाजूला राहू शकतं. म्हणजे ज्या स्वरुपाचं आपण ध्यान करायला लागू त्या ध्यानाने त्या ध्येयाचा साक्षात्कार होतो, हा एक सिद्धांत आहे. सगुण स्वरुप असो अथवा निर्गुणात्मक स्वरुप असो. सगुण स्वरुपाचं ध्यान सुद्धा ध्येयाचा साक्षात्कार करुन देणारं आहे.

शंकराचार्य महाराजांचे जे मुख्य शिष्य, पद्मपादाचार्य, हे नरसिंहाचे उपासक होते म्हणतात. पण ती नरसिंहाची उपासना इतकी मोठी होती त्यांची, की ध्यान करता करता नरसिंहरूप ते होऊन जात असत. बीडच्या जवळ नामलगांव म्हणून एक गाव आहे. 'आशापूर्त गणेश' म्हणून त्याला म्हणतात. तिथे भृषुंडी ऋषी रहात होते. भृषुंडी ऋषी, त्या वाल्मीकी ऋषींच्या उदाहरणाप्रमाणे, नामा कोळी म्हणून कोणीतरी वाटमाऱ्याचा धंदा करणारे पूर्वी होते. जंगल होतं तिथं. गणेशांचे शिष्य मुद्‌गल ऋषी तिकडून निघालेले, त्यांना त्यांनी धरलं, 'काय आहे तुमच्याजवळ? टाका. तुम्हाला मी मारणार आहे.' त्यांची कृपा झाली, संकल्प झाला. त्यांना उपदेश करुन मुद्‌गल ऋषी निघून गेले आणि तो नामा कोळी ध्यान करता करता म्हणजे नामस्मरण करता करता त्याला सोंड निर्माण झाली. सरुपता मुक्ती त्याला म्हणतात.

तर सगुणाच्या ध्यानानेसुद्धा मनुष्यावर अशा प्रकारचा परिणाम होऊ शकतो. निर्मळ, निर्विकार आत्मस्वरुप मी आहे, असंग आहे, ते ध्यान करता करता त्या ध्यानानेच स्थिरता मनामध्ये निर्माण झाल्यानंतर, त्याला समाधी अवस्था प्राप्त होते. ज्या समाधी अवस्थेमध्ये देहाचा काही संबंध नाही, आत्माकार बुद्धी झालेली आहे, देहसंबंध नाही आणि अशा स्थितीमध्ये त्या समाधीचं पुढचं पर्यवसान म्हणजे साक्षात्कार हे आहे.

*******

गुरु साक्षात् परब्रह्मरुप आहेत, परमेश्वररुप आहेत अशी भावना पाहिजे. ते कांही निवडून आलेले नाहीत. निवडून आलेले सुद्धा टिकत नाहीत. स्वत:च्या तपाच्या योगाने ईश्वरकृपा, सद्‌गुरुकृपा संपादन करून श्रेष्ठ भूमिकेवर गेलेले जे महात्मे आहेत त्यांच्या आज्ञापालनाने आपलं हित होणार आहे. प्रियही होणार आहे. कदाचित प्रिय बाजूला झालं आणि हित जर होणार असेल तर त्याच्यावर लक्ष ठेवलं पाहिजे. एखाद्या वेळेला प्रिय होणार नाही. हे भक्त देवाजवळ मागतात..

न मिळो खावया । न वाढो संतान ।
परि हा नारायण । कृपा करो ॥

नारायणाच्या कृपेला प्राधान्य आहे. खाणं मिळालं नाही तरी हरकत नाही.

विटंबो शरीर । होत का विपत्ती ।
परी राहो चित्ती । नारायण ॥

त्याला महत्व आहे. सद्‌गुरुंचं अखंड स्मरण घडण्याला ते प्राधान्य देतात. बाकीचं नको म्हणतात तर अशा दृष्टीने कदाचित प्रिय बाजूला होईल. परंतु प्रियामध्ये आपली बुद्धी जर आसक्त झालेली असेल तर सद्‌गुरुंबद्दलची श्रद्धा कमी होण्याचा संभव आहे.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो.. हे आम्ही रोज म्हणतो पण त्याप्रमाणे भावना असली पाहिजे. सद्‌गुरु साक्षात् परब्रह्मस्वरुप आहेत. गुरुचरित्रामध्ये एक कथा आलेली आहे. जिचा पती गेलेला आहे, मुलगा मतिमंद निघाल्याने प्राणत्याग करायला निघालेली अशी कुरवपुरातील स्त्री श्रीपादवल्लभांना शरण आली. त्यांनी तिला सांगितलं की आत्महत्या हा दोष आहे. तिला त्यांनी शनीप्रदोषाचे व्रत करण्याची आज्ञा केली. तीही इतकी श्रेष्ठ भक्त होती की शनीप्रदोषाच्या दिवशी संध्याकाळी साक्षात् श्रीवल्लभांनाच शंकर मानून ती त्यांची पूजा, आरती करीत असे.

गुरुर्देवो महेश्वर:

'ईश्वराची भक्ती मला करायला सांगितली आहे सद्‌गुरुंनी, पण ईश्वर आणि सद्‌गुरु निराळे नाहीत.' या भूमिकेवर ती गेलेली असल्यामुळे तिला लगेच फळ मिळालं. त्या जन्मात प्रारब्धवशात मंद बुद्धी असलेला तिचा पुत्र ज्ञानसंपन्न झाला आणि पुढच्या जन्मात ''आता तुमच्यासारखा मुलगा पाहिजे'' म्हणाल्यावर तिची इच्छा पूर्ण करावी लागली सद्‌गुरुंना.

सर्व नियामक परमेश्वर आहे. पण अनेक जन्म संसिद्ध अशा भूमिकेतून जे श्रेष्ठ भूमिकेपर्यंत गेलेले जीव आहेत त्यांचा तो नियम्य बनतो हे. सर्वांचे नियामक असणारे त्रिमूर्ती अनसुयेच्या तपामुळे तिचे नियम्य झाले आहेत. संत महात्म्यांच्या आणि शास्त्राच्या आदेशाप्रमाणे वागणारा जीवात्मासुद्धा ईश्वराला नियम्य करु शकतो याचं हे उदाहरण आहे.

*******

आचार्य महाराज संचार करताहेत. शास्त्राचा खरा अर्थ काय आहे हे सर्वांसमोर ठेवायचं हा त्यांचा हेतू होता. अज्ञान हा मोठा दोष आहे. लोकांचं अज्ञान दूर करायचं हा पहिला प्रयत्न आहे. श्रद्धा नसणं हा दुसरा दोष आहे. श्रद्धा असली तरी संशयामुळे ती डळमळीत होते. तो संशय दूर केला पाहिजे. म्हणजे वाणीमध्ये, बुद्धीमध्ये अलौकीक शक्ती असली पाहिजे. त्या शक्तीशिवाय बुद्धीतले सर्व दोष दूर करुन योग्य मार्गावर स्थिर करण्याचे कार्य करता येत नाही.

आचार्य संचार करीत एका गांवात आले. तिथे एक भैरवाचा तांत्रिक भक्त होता. आचार्यांबरोबर झालेल्या वादविवादात त्याचा पराजय झाला. तंत्रमार्ग योग्य नाही हे आचार्यांनी त्याला पटवून दिले. सर्व मंडळींच्या समोर त्याचा मार्ग चुकीचा आहे हे सिद्ध झाल्यावर त्याला कांही बोलता आलं नाही. तेवढ्या पुरता त्याने कबूल केला पराभव. पण त्या उग्रभैरवाच्या मनांत मात्र आचार्यांबद्दल द्वेषबुद्धी निर्माण झाली. 'आज भर सभेमध्ये माझ्या अनुयायांसमोर ज्या आचार्यांनी माझं खंडन केलं त्यांचा नाश केला पाहिजे.' अशा प्रकारची सूडबुद्धी त्याच्या मनांत उत्पन्न झाली. दोन चार दिवसांनी आचार्य महाराज एकटे बसले असतांना तो त्यांना भेटून म्हणाला, ''गुरु महाराज, मी एक भैरवाचा यज्ञ केला आहे. त्यात पूर्णाहुती देण्यासाठी मला एक तर सर्वज्ञ पुरुषाचे तरी मस्तक पाहिजे किंवा सार्वभौम राजाचे तरी मस्तक पाहिजे.ते जर दिलं तर मला याच देहाने भैरवलोकात जाता येईल. आपण सर्वज्ञ आहात. आपलं मस्तक मिळालं तर माझं कार्य होईल.''

आचार्यांनी त्या उग्र भैरवाला सांगितलं, ''उद्या मी गुहेमध्ये जाऊन बसतो. कोणालाही समजणार नाही अशारीतीने तूं माझं मस्तक तोडून घेऊन जा.'' त्या प्रमाणे दुसऱ्या दिवशी सांगितलेल्या ठिकाणी कोणालाही न सांगता आचार्य समाधी लावून बसले. उग्रभैरवाने विचार केला आपल्या तंत्रमार्गावर आलेलं संकट आचार्यांचा नाश केला म्हणजे दूर होईल. आचार्यांचा शिरच्छेद म्हणजे ज्ञान नाश नाही हे त्या उग्रभैरवाला कळलं नाही. ज्ञान हे बुद्धीमध्ये आहे आणि बुद्धी ही नष्ट होणारी गोष्ट नाही. आत्मज्ञान होईपर्यंत बुद्धी बरोबर राहाते. शरीरं किती येतात आणि जातात पण बुद्धी कायम आहे जीवाबरोबर. ही कायम राहाणारी बुद्धी किंवा अंत:करणतत्व ज्याला म्हणतात ते चांगलं बनवण्याचा प्रयत्न जर मनुष्यजन्मामध्ये केला गेला तर ती चांगली बुद्धी पुढच्या जन्मात आपल्याबरोबर येते.

उग्रभैरव निघाला तेव्हां पद्मपादाचार्य नृसिंहाचे ध्यान करीत होते. त्यांची उपासना इतकी सिद्ध झाली होती की ध्यानामध्ये त्यांच्या उपास्य देवतेशी -नृसिंहांशी-ते इतके एकरुप होत की नृसिंहरुप होऊन जात. बुद्धी इतकी स्थिर व्हायला पाहिजे की ज्या वस्तूचे ध्यान करु तिच्याशी तद्रुप होता आले पाहिजे. पद्मपादाचार्यांना त्या ध्यानावस्थेत आचार्यांचा वध करण्याच्या तयारीत असलेला उग्रसेन दिसू लागला आणि पद्मपादाचार्यांचं शरीर नाहीसं होऊन ते नरसिंहस्वरुप झालं. धांवत धांवत ते त्या गुहेत गेले त्या उग्रभैरवाला आचार्यांचा शिरच्छेद करण्यापूर्वी गाठलं, खाली पाडलं आणि हिरण्यकश्यपूप्रमाणे त्याचं पोट फाडलं. तोंडाने मोठमोठ्याने गर्जना चालू होती. तोपर्यंत आचार्यांचे इतर शिष्यही आले. त्यांना पद्मपादाचार्य दिसेनात नृसिंह दिसत होते. आचार्यांची समाधी उतरली. आचार्यांनी नृसिंहाची स्तुती केली.

*******

योगी पुरुषाची संकल्प शक्ती फार मोठी असते. सर्व सिद्धी ज्या वर्णन केलेल्या आहेत त्या संकल्पशक्तीरूपच आहेत. मानसिक शक्तीचा विकास म्हणजेच सिद्धी आहेत सगळ्या. तर त्या संकल्प शक्तीचा प्रभाव हा मान्य आहे. प्रयत्नांनी तशी संकल्पशक्ती करून घेता येते.

अर्जुनाला विश्वरूप पाहण्याची इच्छा झाली, विश्वरुप दाखवा म्हणाला, वस्तुत: विश्वरुप पाहण्याची अर्जुनाची योग्यता नाही. पण आरंभाला नाही कसं म्हणायचं? काहीही साधन सामग्री नसताना विश्वरूप एकदम निर्माण झालेलं आहे. ही संकल्प शक्ती आहे.

दु:शासनाची, दुर्योधनाची किंवा हिरण्यकश्यपूची शक्ती ही देहात्मभाव धारण करून असलेल्या बुद्धीची शक्ती आहे. शास्त्र संस्कार ज्या बुद्धीवर झालेले आहेत - म्हणजे देहापेक्षा आत्मा वेगळा आहे. तो अजरामर आहे, तो असंग आहे, कशाचाही त्याला संबंध नाही-अशी ती बुद्धी नाही. अभ्यासाने आणि वैराग्याने ती स्थिरता येऊ शकते. ती स्थिरता वीतराग महात्म्यांच्या संकल्पानेसुद्धा होऊ शकते.

शक्तीपात करणं म्हणजे शक्ती नवीन देणं असा नाहीये. गुरुंच्या संकल्पाचा प्रभाव चित्ताची स्थिरता करु शकतो. हे ज्ञानी महात्म्यांचं सामर्थ्य त्यांनी दाखवलेलं आहे आणि असं कसं करता येईल? ईश्वरस्वरुप झालेल्या महात्म्यांची संकल्पशक्ती ही असं कार्य करू शकते, हे शब्दप्रमाणाने सिद्ध आहे. आणखी त्याप्रमाणे प्रत्यक्ष अनुभवही आलेले आहेत. हे पुराणदिकांमध्ये व्यासादिकांनी वर्णन केलेलं आहे.

भीष्माचार्यांची संकल्पशक्ती होती की नाही! इच्छामरणी झाले ते. आपल्या पित्याची सेवा केली. पित्याकरता त्याग केलेला आहे. आजन्म ब्रह्मचारी रहायचं आणि राज्य करायचं. राज्यत्याग नुसता नाही, ब्रह्मचारी म्हणजे संसारत्यागही त्यांनी केला आणि त्याप्रमाणे शेवटपर्यंत राहीले. भीष्माचार्यांना पित्याने अंत:करणापासून आशीर्वाद दिला की तुला इच्छा जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत यमधर्म तुला स्पर्श करु शकणार नाही. त्यामुळे इच्छामरणी झाले ते.

तेव्हां आपल्या बुद्धीची शक्ती वाढवता येणं शक्य आहे. योगशास्त्रात हे वर्णन केलेलं आहे आणि त्यांच्यामध्ये ईश्वरतत्त्व त्यांनी मुद्दाम मानलेलं आहे. केवळ आत्मविचार होऊ शकणार नाही. ईश्वराची शक्ती मान्य केली पाहिजे. उपासना केली पाहिजे. त्या उपासनेच्या प्रभावाने मानवाच्या मानसिक शक्तीचा विकास सिद्धीरुपाने करण्याची इच्छा असेल तर तसा होईल. परंतु सिद्धींच्या पाठीमागे लागू नये असं भगवंतांनी सांगितलेलं आहे. योगशास्त्रकार प्रयत्नवादी आहेत. प्रयत्नांनी सगळं साध्य करता येतं असं त्यांचं म्हणणं आहे.ते केवळ प्रारब्धावर अवलंबून राहीलेले नाहीत. संतमहात्म्यांनी जरी प्रारब्धाचा विचार मांडलेला असला तरी ईश्वराची शक्ती मोठी आहे एवढंच त्यांना सांगायचं आहे.

*******

ज्ञानेश्वर महाराज गेले असं मानायची जरुरी नाही. समाधी लावून बसले म्हणजे सगळं संपलं असं काही नाही. अजून आळंदीला लोक जातात, अनुष्ठानं करतात. त्यांना दृष्टांत होतात. सगळं चाललेलं आहे. मध्यंतरी त्यांची समाधी उघडून पाहायचा काही लोकांचा विचार चालला होता.विज्ञानवाद आहे सध्या. वैज्ञानिकांनी अपारदर्शक पदार्थाच्या पलीकडच्या वस्तूचाही फोटो घ्यायचा कॅमेरा शोधून काढला आहे म्हणे. पुष्कळ विचार झाला सगळ्यांचा. जाणकार लोक म्हणाले, 'बुद्धीभेद होईल. तुमच्या कॅमेऱ्याला आंत ज्ञानेश्वरांचं रुप दिसलं नाही तर तुम्ही सांगणार म्हणजे ज्ञानेश्वर तिथे नाहीत. त्यामुळे किती लोकांचा बुद्धीभेद होईल?' म्हणून शेवटी तो विचार सोडून दिला त्यांनी. म्हणजे विज्ञानाच्या साधनांपेक्षा ज्ञानेश्वरांचा संकल्प श्रेष्ठ आहे हे मानायला आम्ही तयार नाही. त्या साधनाने पाहिलं म्हणजे ज्ञानेश्वर आहेत का नाहीत हे सिद्ध होतं, ही आमची बुद्धी आहे.

विदर्भामध्ये जे गुलाबराव महाराज होऊन गेले, त्यांची गोष्ट नागपुरात एकाने सांगितली, महाराज अंध होते. अगदी बालपणीच त्यांची दृष्टी गेली. ते आपली पूजा बिजा करायचे, बसायचे ध्यान करायचे, नामस्मरण करायचे. एक फोटोग्राफर नेहमी येणारा, तो म्हणाला, ''महाराज तुमचा फोटो काढायचाय.'' महाराज म्हणाले, ''फोटो वगैरे काही काढायचा नाही.'' अशी त्यांनी ताकीद दिली. त्या फोटोग्राफरने ते ऐकून घेतलं. संध्याकाळी काही मंडळींच्या बरोबर महाराज बाहेर फिरायला निघाले. तेव्हां त्या सगळ्यांचे फोटो घेतले. आणखी दुसऱ्या दिवशी सकाळी तो महाराजांकडे आला. आल्याबरोबर महाराजांनी त्याला विचारलं, ''का बाबा फोटो निघाला का?'' घाबरला तो, म्हणाला, ''तुमचा काही फोटो त्यात आला नाही. बाकीच्या तिघांचा त्यात आला.''

तर अशा दृष्टीने ईश्वराचा संकल्प जो आहे, तो इथे ध्यानात येतो. महात्म्यांचा संकल्प हा श्रेष्ठ मानलेला आहे शास्त्रकारांनी. त्या संकल्पाप्रमाणे कार्य चालू आहे. महात्मे आजही आहेत. ईश्वराच्या कृपेने 'धर्मस्थापनेचे नर' समर्थांनी सांगितल्याप्रमाणे आजही आहेत, पुढेही होणारे आहेत आणि होऊन गेलेले आहेत. ईश्वराच्या आदेशाप्रमाणे धर्मस्थापना ते करीत असतात. प्रसंगी आपल्या संकल्प शक्तीचा उपयोगही त्यांना करावा लागतो आणि नैसर्गिक शक्ती ही त्यांची संकल्पनाशक्ती असली तरी त्यांना अहंकार निर्माण होत नाही हे मोठं वैशिष्ट्य आहे. शक्ती जवळ असूनही शक्ती विसरून जाणारे महात्मे आहेत ते !

*******

भागवतामध्ये पाचव्या स्कंधात जडभरत नावाच्या ज्ञानी महात्म्याची कथा शुकाचार्यांनी सांगितली आहे. त्या जडभरताने संसार हे अरण्य आहे असं रुपक केलं आहे. कारण अरण्याच्या मार्गाने संसारातले सगळे जीव निघालेले आहेत. तिथे सुख नाही. सहा चोर या जीवाला मारतात आणि त्याचं पुण्य वगैरे सर्वस्व घेऊन जातात. ते चोर म्हणजे काम, क्रोध, मद, मत्सर इत्यादी. तर, 'या चोरांनी मला आता मारायचं ठरविलेलं आहे. तेव्हा लवकर आपण या आणि मला आपल्याकडे घेऊन चला.' अशी हाक मारली आहे. दिगंबरा....दिगंबरा या संबोधनामध्येही हांक मारलेली आहे.

मनाने हांक मारायची म्हणजे दुसरीकडे कुठेही मन जाऊन उपयोगी नाही. आपलं संरक्षण करणारी ईश्वरशक्ती आहे त्या ईश्वराला हाक मारताना मनाच्या एकाग्रतेची अत्यंत आवश्यकता आहे. वाणीनं ज्याला बोलवायचं आहे तिकडे मन जाण्यासाठी 'दिगंबरा' शब्दाचे अर्थ महाराजांनी सांगितले आहेत. तोच जीवात्मा म्हणजे अंतरात्मा शुद्ध आहे. विश्वरुपी झालेला तोच ईश्वर आहे. तोच पुन्हा एकरुप होऊन परब्रह्मरुपीही तोच आहे आणि त्यानेच श्रीपादवल्लभ वगैरेअवतार धारण करून भक्तांचं संरक्षण केलेलं आहे. अशी कार्य करणारा जो आहे दिगंबररुपी परमात्मा त्याला आर्त होऊन, ही हाक मारलेली आहे. कामक्रोधादि शत्रुंनी मला ग्रासलेलं आहे, ते मारताहेत, या बुद्धीनं हांक मारलेली आहे आणि त्यावेळेला त्यांची शक्ती जर मनामध्ये आली तर जास्ती प्रेम निर्माण होतं आणि त्या प्रेमाने हाक मारल्यावर ईश्वराची कृपा होते, कार्य होतं.

परमात्म्याचं मूळ स्वरुप अद्वितीय आहे. संसार नाही, जग नाही, काही नाही, इथपर्यंत दृष्टी गेली म्हणजे जगही तो जीव विसरून गेला. आमच्या बुद्धीमध्ये संसार आहे. तो संसार बुद्धीतला गेला पाहिजे. नियामक ईश्वर आहे, आम्ही नियम्य आहोत हीसुद्धा भावना गेली पाहिजे.

द्रौपदीला त्यांनी अगदी सुरक्षित ठेवलं. भर सभेमध्ये तिचे पांचही पती दास बनून खाली मान घालून बसले असताना तिचं कोण संरक्षण करणार होतं? भीष्म, द्रोण तर अगदी कानावर हात ठेवून मोकळे झाले. दुर्योधनाचं आम्ही अन्न खातो, तेव्हा त्याच्या विरुद्ध आम्ही काय बोलणार? म्हणाले. अशा स्थितीमध्ये ज्या ईश्वरशक्तीवर विश्वास ठेवून द्रौपदीने सगळा भार टाकला..''तुझ्या शिवाय माझा कोणीही त्राता नाही'' असं म्हटलं त्यावेळी त्या परमात्म्याने वस्त्ररूप धारण केलं. अनेक वस्त्रं दु:शासन फेडतोय पण नाही, द्रौपदी वस्त्ररहित होऊ शकत नाहीये. ईश्वरीशक्तीपुढे जीवाने केलेल्या प्रयत्नाचं काहीही चालत नाही. तर अशा रीतीने अवतार धारण केलेल्या साकार ईश्वराची जरी भक्ती केली तरी आपलं कार्य होतं आहे.

*******

श्रीकृष्ण चरित्रामध्ये व्यासांनी ऋषी पत्नींची कथा दिली आहे. एकदा सगळ्या गोपालांसह भगवान वनामध्ये गेले होते. ऋषींचे आश्रम वनात असायचे. गोपालांना भूक लागल्यावर भगवंतांनी आपल्या मित्रांना सांगितलं, ''ऋषींच्या आश्रमात यज्ञयाग चालू आहे तिथे जाऊन त्यांना सांगा, आम्हांला भूक लागली आहे कांही तरी खायला द्या.'' ऋषींनी सांगितलं, यज्ञ चालू असताना मध्येच असं अन्न देता येत नाही, वगैरे. गोपालांनी परत येऊन भगवंतांना ऋषी काय म्हणाले ते सांगितलं. भगवान् म्हणाले, आता त्या ऋषी पत्नींच्याकडे जाऊन त्यांना तेच सांगा. त्यांना भगवंतांच्या दर्शनाची ओढ होती, त्यामुळे भगवान आलेले आहेत म्हटल्यावर त्या यज्ञाचा स्वयंपाक वगैरे सोडून तशाच दर्शनाला निघाल्या. त्यांनी दिलेलं अन्न गोपालांनी भक्षण केलं.

त्या ऋषींचे नंतर डोळे उघडले. प्रत्यक्ष परमेश्वर आपल्या जवळ येऊनही अज्ञानाने आपण त्याला ओळखू शकलो नाही याचा त्यांना पश्चाताप झाला. वास्तविक वेदज्ञान, कर्मज्ञान त्यांना उत्तम होतं. यज्ञरुपी परमेश्वराचीच उपासना करीत होते. पण सगुण साकार परमेश्वराला आपल्या ज्ञानाच्या अहंकाराने ते ओळखू शकले नाहीत. ज्ञान जितकं जितकं वाढत जाईल तितका तितका अहंकार वाढत जातो म्हणतात. पण भक्तीने शुद्ध ज्ञानाची प्राप्ती होते. सर्व कर्तृत्व शक्ती ईश्वराची आहे अशी संतांची ठाम भूमिका असते त्यामुळे त्यांचं अंत:करण अहंकार-रहित असतं.

आपल्या पत्नींच्याजवळ ज्ञान नसलं तरी त्यांच्या मनांत केवढी कृष्ण भक्ती आहे याची त्यांना जाणीव झाली. व्यास महर्षी सांगतात, संसाराची ममता आड आलेली आहे. आपण कृष्णाकडे गेलो हे जर कंसाला समजलं तर उद्या आपला आश्रम जाळून टाकील, अशी भीती त्यांना वाटली आहे. म्हणजे ईश्वर आहे असं ज्ञानमार्गाने समजून घ्यायचं आणि दुसरीकडे कंसाची भीती बाळगायची! केवढी विसंगती आहे. त्या ऋषींच्या मनावर परिणाम झाला. ऋषींना पश्चाताप झाला पण त्यांना कृष्ण दर्शन घडलं नाही. इथे कंसाच्या भीतीच्या रुपाने प्रतिबंध निर्माण झाला. असे प्रतिबंध येत असतात. पण ईश्वराच्या कृपेने ते सगळे दूरही होतात आणि ज्ञान व कर्म शुद्ध होऊन जातं. पण किती पुण्यकर्म केलं याचा आपल्याला विसर पडला पाहिजे. जे कांही झालं ते जगदंबेच्या कृपेने, कृष्णामाईच्या कृपेने झालं असं मनांत आलं तरी हरकत नाही. सगळा अहंकार नाहीसा करुन जीवाकडून शुद्ध कर्म करुन घ्यायचं सामर्थ्य देवाकडे आहे पण त्याकरता आरंभाला विश्वासाची, श्रद्धेची जरुरी मात्र आहे. ती श्रद्धा पुढे ईश्वराच्या कृपेने वाढत जाते.

कर्तुम् अकर्तुम् सामर्थ्य त्याचं आहे मानणं म्हणजे ईश्वराचं आस्तिक्य आहे, कोणत्याही परिस्थितीत मनामध्ये भीती उत्पन्न होऊ न देणं हे दैवी संपत्तीचं पहिलं लक्षण आहे.

*******

दुसरा दु:खी आहे हे पाहिल्यावर निसर्गत:च ज्याच्या मनात दया उत्पन्न होते, त्याचं दु:ख दूर करण्याची प्रवृत्ती होते, हा एक सज्जनांचा मोठा धर्म आहे. त्याकरिता काही दु;ख भोगावं लागलं तरी हरकत नाही. तिकडे त्याचं लक्ष जात नाही.

दान! यथा शक्तीं दान आहे. आपल्याजवळ जे असेल त्याचा विनियोग जे कोणी अत्यंत कष्टी आहेत, दु:ख भोगणारे आहेत त्यांच्याकरता करायचा. दया आणि दान हे दोन्ही बरोबर आहेत. दया उत्पन्न झाल्याशिवाय दान दिलं जात नाही. दुसरा दु:खामध्ये आहे, त्याला सोडवलं पाहिजे, त्याला काय पाहिजे? वस्त्र पाहिजे, धन पाहिजे, धान्य पाहिजे, काय पाहिजे हे ज्याला कळतंय त्याप्रमाणे आपल्याजवळची वस्तू देऊन टाकतो. हे खरं दान आहे. दया उत्पन्न होऊन केलेलं जे दान आहे त्यात काही अहंकार वगैरे नाही. दांभिकपणा असू शकत नाही. दाखविण्याकरता केलेल्या दानांत दया असते की नाही कोणाला ठाऊक! परंतु दया वृत्ती ज्या ठिकाणी असते तिथे दान हे निश्चित घडतंय, तो देतो आहे, उपयोगी पडतो आहे. सामान्य धर्मांचं आचरण आपण केलं पाहिजे अशी बुद्धी उत्पन्न होणं यालासुद्धा ईश्वराची भक्ती असली पाहिजे. भगवत शक्तीच्या योगाने मनामध्ये, बुद्धीमध्ये असणारे रजोगुण, तमोगुण नाहीसे होतात आणि शुद्ध सत्वगुण उत्पन्न झाल्यानंतर ते सगळं धर्माचरण निश्चयाने शेवटपर्यंत होऊ शकतं.

दान करतानासुद्धा आपल्या हातून दान अगदी अल्प होतंय, आपण अल्पच देतो आहोत ही जर बुद्धी अंत:करणामध्ये असेल तर त्याच्याबद्दल अहंकार कधीही उत्पन्न होणं शक्य नाही. नाही तर, 'मी इतकं केलं, माझ्या इतकं तरी कोण देणार आहे हो ' ही बुद्धी उत्पन्न झाली की दानाचा दर्जा कमीच झाला. जरी त्याने पुष्कळ दिलेलं असलं तरी ते काही सात्विक दान होणार नाही. किती दिलं यावरून तो धर्म ठरत नाही. कर्माचं ज्ञान हे दात्याच्या बुद्धीवरुन ठरतं. हे योग्य कर्म आहे, शुद्ध पुण्य आहे, हे केव्हा ठरतं? त्याची बुद्धी जर दान करताना खरोखर निरंहकार असेल, 'माझ्यापेक्षाही किती तरी दान करणारे आहेत' ही बुद्धी असेल तर आपण केलेल्या दानाबद्दल कधीही अभिमान उत्पन्न होणार नाही आणि ते शुद्ध दान होईल, सात्विक दान होईल. शुद्ध कर्म होईल ते. म्हणजे पुण्यामध्येसुद्धा शुद्ध -अशुद्ध हा सगळा विभाग विचारांनी ठरवता येतो. दात्याच्या बुद्धीवर सगळं अवलंबून आहे. बाह्य दान अल्प दिलं तरीसुद्धा मनामध्ये जर अत्यंत दया असेल, तर ते श्रेष्ठ ठरत आहे आणि जास्ती दान देऊन जर अहंकार उत्पन्न झाला तर ईश्वर बाजूला होतो. ईश्वराच्या प्रेरणेप्रमाणे 'मी दान करतो आहे' ही बुद्धी जर असेल तर अहंकार उत्पन्न होणार नाही.

*******

'विवेकचुडामणी' या ग्रंथात मनुष्यत्व, मुमुक्षत्व दुर्लभ आहे त्याप्रमाणे तिसरी दुर्लभ गोष्ट म्हणजे 'महापुरुषसंश्रय' म्हणत आहेत आचार्य महाराज! महापुरुषांना 'महापुरुष' असं का म्हणायचं? कारण आरंभापासून त्यांचा या मार्गावर विश्वास आहेच आहे. आपली शक्ती कमी आहे, हे ही समजलं पाहिजे. सर्वांत मोठी शक्ती ईश्वराची आहे; जगदंबेची आहे; हेही तितकंच पक्कं समजलं पाहिजे. आपल्या शक्तीवर फाजील विश्वास असून उपयोग नाही. आमची बुद्धी सगळं समजणारी आहे, असं वाटतं आम्हाला. पण आम्ही असं समजून उपयोग काय? मानवाची शक्ती किती अपूर्ण आहे, याची कल्पना पाहिजे. कबूल केलं पाहिजे, पूर्णता नाही आपल्याकडे. आणि अशी पूर्णता ज्यांच्याजवळ आहे, असे महात्मे आजही जगात आहेत. असे ईश्वरस्वरुप महात्मे आहेत, असाही विश्वास पाहिजे. म्हणजे मग त्या उपायांकडे प्रवृत्ती होणार.

बुद्धी अशी विकसित झाली पाहिजे की पूर्ण आनंद आपल्याला घेता आला पाहिजे. सर्व दुःखं दूर करता आली पाहिजेत. हे सगळं बुद्धीने करून घेता येतं ना! अशी बुद्धी मिळविणं, हाच प्रयत्न आहे. त्या प्रयत्नाला सुरुवात पूर्ण विश्वास असल्याशिवाय होत नाही. महात्म्यांनी अनेक जन्म पुष्कळ प्रयत्न करून ईश्वराच्या, जगदंबेच्या, सद्गुरुंच्या कृपेने असा विश्वास मिळविलेला असतो.

ही शक्ती प्राप्त करून घेणाऱ्या महात्म्यांनी पूर्ण आनंद मिळविलेला आहे. सच्चिदानंदघन भगवती आहे, तिची प्राप्ती त्यांना झाली आहे. 'अहम्' विसरून गेले आहेत. नुसता संसार विसरून चालणार नाही. 'अहम्' विसरणं मुख्य आहे. अहम् कायम राहिला आणि संसार विसरला असं होत नाही. तो अहम् मनात असतोच. शेवटी आनंद प्राप्त करून घेणारे महात्मे अहम् ही टाकून देतात, काही संबंध नाही. असंग आहेत. आत्मचैतन्य हे आनंदरुप, असंग आहे. कोणाचाही संबंध नाही. हा विवेक पूर्णपणे प्राप्त करून घेऊ शकतात आणि दुसऱ्यालाही विवेकसंपन्न बनवितात आणि आपल्या बरोबर या मार्गावर घेऊन जातात.

महापुरुष शरीरापासून दूर होऊ शकतात. शरीराचा काही संबंध नाही. सगळी कर्म संपली. त्यामुळे पुन्हा शरीर धारण करण्याचं कारण नाही;पुनर्जन्म नाही. पुन्हा जन्म नाही, मृत्यूही नाही, काही नाही. ही तयारी करून ठेवली आहे. आपली जशी योग्यता आहे, तशी योग्यता दुसऱ्यात ते निर्माण करु शकतात म्हणून त्यांना महापुरुष म्हणायचं. अशा महात्म्यांचा संश्रय, संगती, कृपा असणं हे अतिशय दुर्लभ आहे. मनुष्यजन्म मिळवण्याकरता देवाचा अनुग्रह पाहिजे. मनुष्यजन्म मिळाल्यावर मोक्षाची इच्छा होण्याकरताही देवाचा अनुग्रह पाहिजे आणि महात्म्यांची भेट होण्याकरताही देवाचा अनुग्रह पाहिजे. म्हणजे देवाचा अनुग्रह असेल, जगदंबेची कृपा असेल, तरच या तिन्ही गोष्टी मिळतात. मनुष्य जन्म मिळतो, मोक्षाची इच्छा उत्पन्न होते आणि मार्गदर्शक महात्मे भेटतात.

*******

भगवंतांनी सांगितलं-शास्त्रप्रमाण आहे. शास्त्रानुसारिणी बुद्धी शुद्ध समजली गेली आहे. बुद्धीला समाधान ज्यामध्ये असेल तोही बुद्धीचा विषय होऊ शकतो. पण ती बुद्धी फार मोठी असली पाहिजे. दुष्यंतराजा एकदा शिकार करून परत येताना कण्व ऋषींच्या आश्रमात थांबला. कण्व ऋषी बाहेर गेले होते. शकुंतलेने त्याचं आदरातिथ्य केलं. तिच्यावर दृष्टी पडतांच त्याच्या मनांत मोह उत्पन्न झाला. प्रथम त्याच्या मनांत आलं, मी क्षत्रिय आहे आणि ती ऋषी कन्या म्हणजे ब्राह्मणाची कन्या आहे. तिच्यावर माझं मन जाणं बरोबर नाही. तो शास्त्र मानणारा असल्यामुळे त्याने आपलं मन आवरलं. पण पुन्हा त्याला वाटलं ज्याअर्थी माझं मन तिच्यावर गेलं त्या अर्थी ती क्षत्रियकन्याच असली पाहिजे. माझं मन शास्त्रानुसारी आहे. शास्त्राने सांगितलेलं शब्दप्रमाण आणि महात्म्यांच्या शब्दांवर विश्वास आहे. त्याप्रमाणे विचार करणारी माझी बुद्धी आहे. माझं अंत:करण ज्या अर्थी या कन्येवर गेलेलं आहे त्या अर्थी ही क्षत्रिय कन्याच असली पाहिजे. पण 'माझं मन असं आर्य मन आहे' हे सांगण्याच धाडस एरव्ही कोण करील? नेहमी आम्हाला आमचं मन 'आर्यच' आहे असं वाटत असतं. अनेक प्रकारचे दोष आमच्या बुद्धीमध्ये भरलेले आहेत हे मानायचीही आमच्या बुद्धीची तयारी नाही. मग त्या ईश्वरशक्तीची कृपा असणं, त्या कृपेने मन आर्य बनवणं, शुद्ध बनवणं ही लांबची गोष्ट आहे. आम्ही चुकतो हेच आम्हाला मान्य नसतं, पटत नसतं. आम्ही केलेलं सर्व बरोबर आहे अशीच आग्रही वृत्ती जोपर्यंत मनाची व बुद्धीची आहे तोपर्यंत बुद्धीची सुधारणा होणार कशी? दोष आहेत हे समजल्यावर त्यावर उपाय करायचा ना! स्वत:च्या दोषांचं ज्ञान स्वत:ला कधीतरी होऊ शकेल का? रोग्याला सर्व दोषांचं ज्ञान होत नाही. कांही चिन्ह त्याला समजतात. आपल्या शरीरात कांही बिघाड झालाय, दोष निर्माण झालाय हे समजतं म्हणून तो डॉक्टरकडे, वैद्याकडे जातो. ते त्याला तपासून रोगाचं निदान करुन औषध योजना करतात. पण जर डॉक्टरांच्या शब्दांवर विश्वास न ठेवता तो रोगीच चिकित्सा करु लागला, 'तुम्ही कशावरून सांगता हा रोग झाल्याचे, त्या रोगावर हेच औषध कशावरून, ही चिकित्सा करण्याची पद्धत आहे का' वगैरे म्हणू लागला तर?

पूर्ण शांती म्हणजे मनाची निश्चल अवस्था प्राप्त करुन घेणं हे सुद्धा मनावरच अवलंबून आहे. त्या करता अभ्यास आणि वैराग्य हे दोन उपाय योगसूत्रकारांनी सांगितले आहेत. भगवंतांनी हेच दोन उपाय अर्जुनाला सांगितले. ते म्हणाले, मनाला स्थिर करण्याचा एक अभ्यास आहे. त्याकरता अंतर्यामी असलेल्या ईश्वराला सतत प्रार्थना करीत रहाणं एवढंच मुख्य कर्तव्य आहे. ईश्वरशक्ती सहाय्य करणारी आहे, एवढं जरी आपल्या मनाला पटलं तरी पुष्कळ झालं.

*******

श्रीरामांना भरत म्हणाला, 'तुमची आज्ञा आहे, तेव्हा राज्य मी करीन पण तुमच्या पादुका सिंहासनावर ठेवून करीन. सिंहासनावर मी कधी बसणार नाही. छत्र, चामर त्या पादुकांवर राहतील.' पादुकांची पूजा करून भरताने रामांची चौदा वर्षे उपासनाच केली.

पादुका मागून डोक्यावर घेऊन तो राजधानीमध्ये आला; आणि सिंहासनावर त्या स्थापन केल्या. ध्यास लागलेला आहे. एकेक दिवस मोजतो आहे, 'केव्हा येतात राम!', ही तळमळ मनामध्ये आहे. म्हणजे किती बुद्धीची शुद्धता आहे! सत्वगुण कसा आहे हे यावरून कळून येतं. 'राज्य सांभाळायचं काम माझ्याकडे आलेलं आहे तेवढं करतो.' म्हणाला, 'मी कोणताही राजभोग घेणार नाही.' गोमूत्रामध्ये पीठ कालवून त्याच्या दशम्या करून तो खात होता. एवढा अयोध्येचा राजा असून चटईवर निजत होता. शरीराला सौख्य नाहीये. ज्या शरीराच्या निमित्ताने रामचंद्रांना दुःखकष्ट भोगावे लागले, त्या शरीराला सुख मिळणार नाही. हाही मनाचा निग्रह आहे. या मनाच्या निग्रहाला वैराग्य म्हणतात. संपूर्ण सत्ता हातात असताना त्याची आसक्ती नाही. राज्य आपलं नाही. राज्य घेण्याच्या वेळेलाच राज्य केव्हा सोडायचं हेही त्या महाभागाने ठरविलं आहे. केवढं कौतुक आहे! रामायणाचं याकरता वाचन केलं पाहिजे, तर काहीतरी आपल्या बुद्धीवर परिणाम होईल.

सात्विक बुद्धी कशी असते? भरताचं राज्य गेलं नाही. रामांचंही राज्य गेलं नाही. राज्य तिथेच राहिलं. पण रामापेक्षा भरताची कीर्ती अधिक वाढलेली आहे. वाल्मिकी महर्षींनी हा आदर्श मुद्दाम सर्वांपुढे ठेवला आहे. स्वराज्य मिळाल्यानंतर व्यक्ती-स्वातंत्र्याच्या नावाखाली कोणी काय करावं याला तर अंतच राहिलेला नाही. रामावर काय, सीतेवर काय, कोणावरही आक्षेप घेतले जातात. पण विचार करून पाहा ना! केवढा त्याग आहे! रामांना कबूल करावं लागलं, ''बाबा!, माझ्यापेक्षा तू मोठा आहेस. मला अद्यापि राज्यभिषेक झालेला नव्हता. व्हायचा ठरला होता. इतक्यात वनात जायचं ठरलं. तुझ्या आईनं तुझ्याकरता राज्य मिळवून ठेवलेलं आहे. तुझ्या मालकीचं राज्य असतांना तू मागे राहिलास.'' अशी बुद्धी मिळाली पाहिजे. मनुष्यजन्म त्याकरता आहे. ज्यावेळेला अशाप्रकारची बुद्धी प्राप्त होते, तो देवाचा अनुग्रह आहे हे समजलं पाहिजे. दैवीसंपत्ती ज्याला म्हणतात ती देवाच्या कृपेने प्राप्त होते.

महाभारतकारांनी दुर्योधनाचंही चरित्र लिहिलेलं आहे. त्यानेही असंच पांडवांना तेरा वर्ष वनवासात पाठवलं. परत आल्यावर आपल्याला दुर्योधनाने अर्ध राज्य द्यावं असं त्यांनी सांगितलं. पण, 'सुईच्या टोकावर राहिल एवढीसुद्धा जमीन तुम्हाला युद्धाशिवाय देणार नाही' असं दुर्योधन म्हणाला. म्हणजे किती गुंतून गेलाय दुर्योधन! त्याग नाहीच त्या बुद्धीमध्ये. त्यागाचा अभ्यासच त्याचा नाही. दुर्योधनाचं चरित्र वाचून त्याग कसा नसतो आणि भरताचं चरित्र वाचून त्याग कसा असतो ते दोन्ही आपल्याला समजतं.

*******

अनेक वासना घेऊन आम्ही जन्माला आलेले आहोत आणि त्याच्यामध्ये भरच पडते आहे. मृत्यू येईपर्यंत वासना संपल्या आहेत, मन मोकळं झालं आहे, असं काही नाही. संतमहात्मे, भगवत्भक्त जे आहेत, ते भक्तीच्या प्रभावाने अंत:करण एकाग्र करून मोकळे होतात. प्रल्हादजी श्रेष्ठ भूमिकेचे ज्ञानी भक्त आहेत. 'माझ्या मनामध्ये कोणतीही वासना, कोणतीही इच्छा राहू नये' असं मागणं त्यांनी मागितलं मनातल्या सर्व वासना ज्याला दूर करता आलेल्या आहेत, शुद्ध ज्याचं मन झालेलं आहे, तृष्णा नाही, काही आशा नाही, त्याची जीवदशा संपली, तो साक्षात भगवान् झाला.

भगवान् म्हणतात, 'ज्ञानी भक्त आणि मी यांच्यात अंतर नाही.' तो हा ज्ञानी भगवत्भक्त आहे. निर्वासन अंत:करण त्याचं झालेलं आहे. म्हणजे त्याची जीवदशा संपली. त्याला पुन्हा जन्म, मृत्यू काही नाही. वासनाच नाही तर कर्मं कुठली येणार? वासनेमुळे कर्म होते. त्या कर्माचं फल भोगण्यासाठी नवीन शरीर धारण करणं भागच आहे. तेव्हा हा सर्वही कर्मक्षय होणं, कामक्षय होणं, मनोनाश होणं महत्वाचं आहे. मनोनाश याचा अर्थ मन शांत झालं आहे. बुद्धी अत्यंत स्थिर झाली आहे. कोणच्याही गुणांमध्ये गुंतलेली नाही. 'सात्विक कार्य केलं पाहिजे', असं जरी आपल्याला वाटलं, तरी आपल्याला वाटणार की त्यात लोकांचं कल्याण होणार आहे. 'आपण प्रयत्न करून शाळा चालवूया! काही तरी दवाखाना काढू या. लोकांना उपयोग होईल. परोपकार होईल.' ही इच्छा चांगली आहे; सात्विक आहे; पण ती वासना आहे. त्यामुळे पुन्हा जन्म घ्यावा लागतो. मृत्यूच्या वेळेस जर मनात आलं, ''आपल्या संस्थेचं एवढं काम झालं असतं तर बरं झालं असतं'', म्हणजे पुन्हा जन्माला यायला पाहिजे.

तर प्रल्हादजींचा विवेक इतका पक्का आहे. त्यांची ज्ञानभूमिका, भक्तीभूमिका इतकी पक्की आहे, की वासनाक्षय झाल्यानंतर तो जीव संपला. अहम् गेला त्याचा. अहम् गेला की जीवदशा संपली. मृत्यूच्या वेळेस जीव गेला असं आपण म्हणतो, पण जीव जात नाही. जीव कायम आहे. शरीर गेलं तरी पुन्हा दुसरं शरीर आहे की! भगवत्भक्तीची पराकाष्ठा झाल्याशिवाय जीवस्वरूप नाहीसं होत नाही. तर प्रल्हादजी म्हणतात, - मागायचं झालं तर इतका विचार करून मागावं, जे मागितलं असता पुन्हा मागायची पाळी येणार नाही. जन्ममरण संपलं. माझ्या वासना संपल्या म्हणजे जीवदशाच संपली म्हणजे तुमच्या आणि माझ्यामध्ये अंतर काही ठेवू नका. ही केवढी मोठी भूमिका आहे!

*******

मानसिक शक्ती असणारं मन, हे फार मोठं इंद्रिय ईश्वराने निर्माण करून ठेवलं आहे. आपल्याकडे मनाबद्दल फार मोठा विचार केला गेला आहे. पाश्चात्य देशामध्ये मनाचे होणारे संशोधन अद्यापि अपूर्ण आहे. मन वगैरे इंद्रियसुद्धा त्यांना मान्य नाही. स्थूल शरीरापुरताच त्यांचा अभ्यास मर्यादित आहे. आपल्या शरीरात चक्रं आहेत. त्या चक्रांच्या देवता आहेत. शास्त्रकारांनी त्या चक्रांची स्थाने व देवता सांगून ठेवल्या आहेत आणि ते पाहता येतं. जर त्या एखाद्या चक्रावर लक्ष एकाग्र केले, त्याचे चिंतन केले, तर ते चक्र मनात प्रगट होते. त्याचा साक्षात्कार होतो.

पाहता आले नाही म्हणून एखादा पदार्थ अस्तित्वात नाही असे म्हणणे अगदी स्थूल बुद्धी आहे. मी सुखी आहे किंवा दुःखी आहे हे कसे समजते? मनाप्रमाणे घडल्यानंतर सुख आहे. मुद्रा आनंदित झालेली आहे. त्याला सुख आहे. पण मी सुखी आहे हे ज्ञान कशाने झाले? सुख काय डोळ्यांनी दिसणारा पदार्थ आहे काय? सुखदुःख म्हणून जे आपण म्हणतो, ते डोळ्यांनी दिसणे शक्य नाही. कसं आहे सांगा बघू सुख? आणलं असतं आम्ही, बाजारात कुठेतरी मिळालं असतं म्हणजे चांगली सोय झाली असती. पण तो अदृश्य पदार्थ आहे. विश्वामध्ये अशा काही वस्तूही ईश्वराने अदृश्य ठेवलेल्या आहेत. त्यांचे ज्ञान करून घेण्याकरता माणसाने काहीतरी प्रयत्न केला पाहिजे.

सुखदु;ख कसे कळते? अर्थात 'मी सुखी आहे.' किंवा 'मी दुःखी आहे.' हे समजण्याचे साधन 'मन' आहे. त्याकरता मन हे स्वतंत्र इंद्रिय आहे. त्या मनाची शक्ती फार मोठी आहे. सर्व वासना त्या मनामध्ये निर्माण होतात, सर्व संस्कार त्या मनावर होतात, काही नको असलेले संस्कार काढता येतात. काही चांगल्या संस्कारांची भर घालता येते. हे कार्य चाललेले आहे. मनाकडूनच चाललेले आहे, म्हणून मनालाच बोध केला समर्थांनी.

मना सज्जना भक्तिपंथेची जावे ।

*******

'उद्धरेदात्मनात्मानं' हा महत्वाचा सिद्धांत आहे. आपला आपण उद्धार करून घ्यायचा म्हणजे आपल्या मनाचे निरीक्षण रोज केले पाहिजे. पशूप्रमाणे मी वागलो आज? की सत्पुरुषांप्रमाणे माझं वर्तन झालं आहे? हे विचार करून शांत झोप येते, नाहीतर येत नाही. माझ्या विरुद्ध जो वागला आहे, त्याला सरळ कसे करता येईल असे विचार जर मनात आले, तर झोप येणारच नाही. त्याचा उपयोग नाही. म्हणून खरा आपला उद्धार आपणच करून घ्यायचा.

सर्वही संत महात्मे जगदंबेच्या कृपेने ईश्वररुप झाले. ईश्वराला कर्म नाही आणि दु:ख नाही. मानवाला, देवांना, गंधर्वांना, ऋषींना, सगळ्यांना दु:ख आहे. कारण कर्म आहे. धर्माधर्म आपण ज्याला म्हणतो - पाप आणि पुण्य - हे घडलं आहे. घडतं आहे ना! नुसतं घडलंच असं नाही. त्यात भर पडते आहे. क्रियमाण कर्म जे आहे रोजचे, तेही पापपुण्यात्मक आहे. साठा तर आहेच भरपूर, संचित आहे. पण त्या संचितामध्ये ह्या क्रियमाण कर्मफलाची रोज भर पडते आहे. त्यामुळे कर्म असेपर्यंत त्याचं फल भोगायचं. हा सृष्टीचा नियम परमेश्वराने ठरवून टाकलेला आहे. ईश्वर म्हणजे व्यवस्थापक आहे. व्यवस्था करू शकतो. 'करावे तसे भरावे' म्हणतात. हा नियम घालून ठेवलेला आहे. त्याप्रमाणे जीवाने जर पाप केलं असेल, तर पापाचं फळ मिळेल. पुण्य केलं असेल तर पुण्याचं फळ मिळेल. त्याचं त्याने असं जर मनाने ठरवलं असेल की पुण्यकर्म जास्तीत जास्त करण्याचा प्रयत्न करायचा तर ते सुख मिळेल. मनात अनेक प्रकारच्या वासना असतात. अशुभ वासना मनात असतील, तर पापाचरणाकडे प्रवृत्ती होते, नाही असं नाही. पण मन आवरावं. राग येणार नाही असं नाही. राग यायचाच. आपल्या इच्छेविरुद्ध वागणाऱ्याबद्दल राग येणं स्वाभाविक आहे. पण राग आवरण्याकरता प्रयत्न करायचाय. राग आवरत नाही असं होऊ नये. आवरता आला पाहिजे. नाथ म्हणतात, 'राग येऊच नये.'पण ती त्यांची योग्यता आहे. संतांनी शांतीचा इतका अभ्यास केलेला आहे, की त्यांना राग येतच नाही.

ही भूमिका मिळवून सांगताहेत नाथमहाराज. सर्व मंडळी आदरभाव दाखवणारी असताना त्या ठिकाणी अपमानाचा प्रसंग आला तरी ज्याच्या मनामध्ये क्रोध नाही, त्याच्याजवळ संपूर्ण शांती आहे.

सत्त्वगुण जास्तीत जास्त वाढवण्याचा अगोदर प्रयत्न करायचा. मग सगळेच गुण टाकून द्यायचे. गुणातीत व्हायचंय. तसा सत्त्वगुण वाढवावयाचा आपल्याकडून जास्तीत जास्त प्रयत्न झाला आणि देवाच्या कृपेने सत्त्वगुण वाढला तर, रजोगुण, तमोगुण आपोआप कमी होतात आणि शांती मिळते.

******

'कर्तृत्वाचा मदू आणि कर्मफलाचा आस्वादू' घेऊ नये असं म्हणतात ज्ञानेश्वरमहाराज.

मी कर्ता आहे. मी मोठा तपस्वी आहे. मी पूजा अर्चा करतो. मी दानधर्म करतो. मी तीर्थयात्रा करतो. कर्तृत्वाभिमान हे एक बंधनाचे कारण आहे आणि त्याच्यापासून मला अमूक एक फळ मिळालं पाहिजे. श्रेष्ठ मी आहे. माझा मानसन्मान झाला पाहिजे किंवा पुण्याचं काही फल असेल ते मिळालं पाहिजे. फलाची इच्छा आहे म्हणजे मन फलामध्ये गुंतून गेलेलं आहे आणि कर्म करताना कर्माचा कर्ता मी आहे म्हणजे कर्तृत्वामध्येही मन गुंतून गेलेले आहे. हाच बंध आहे. कर्म काय कोणाला बांधून टाकतं? आपल्याच बुद्धीनं तो मद, अहंकार, फलेच्छा सोडून कर्म ईश्वरार्पण बुद्धीनं झालं पाहिजे. कर्ता ईश्वर आहे, प्रेरक जर आहे तर तोच मुख्य कर्ता आहे. ही बुद्धी जर कर्म करण्याच्या वेळेला राहिली तर फलाची इच्छा होणं शक्य नाही. मी कर्ता आहे हा एक मोठा अहंकार असतो. त्यामुळे मला फळ मिळालं पाहिजे. लगेच फलाभिलाषा उत्पन्न होते. कर्तृत्व, अहंकार जर गेला, कर्तृत्व माझं नाही, अनेक लोक असं कर्म करत नाहीत कां? हा जर मूळ विचार सुरु केला तर बुद्धीला प्रेरणा करणारी कोणची तरी एक शक्ती आहे हे समजून येते. ही ईश्वराची कृपा आहे, नियामक तो आहे, अंतर्यामी आहे, त्याच्या प्रेरणेनं आणखी हे कर्म घडत आहे. कर्म कोणचंही असो, यज्ञ असो, दान असो, भक्ती असो, ही प्रथमच जर भावना कर्म करताना मनामध्ये असेल तर ते ईश्वरार्पण कर्म झालं. शुद्ध कर्म झालं. त्यामुळे पुन्हा जन्म नाहीये. त्याला संचितही म्हणता येत नाही. त्याला प्रारब्धही म्हणता येत नाही. काही नाही. कर्मरुपच त्याचं नाहीसं झालं. अंतःकरण शुद्धी हे एकच त्याचं फल आहे. वासनाक्षय त्याच्या योगाने होतो आहे. दुरितक्षय ज्याला म्हणतात तो त्यामुळे होतो.

परंतु कर्माचं कर्तृत्व माझं आहे ही बुद्धी ठेवूनच सर्वांकडून कर्म घडत असतात. एखादाच तसा ईश्वरार्पण बुद्धी ठेवणारा, ईश्वराबद्दल आस्तिक्य बुद्धी ज्याला आहे, ईश्वराच्या शक्तीबद्दल ज्याला खात्री आहे, असा एखादाच ते म्हणेल आणि आपला अहंकार दूर करुन कर्म करेल.

*******

पुराण वाङमयाचा अभ्यास अतिशय कठीण आहे. पुराणांमध्ये अनेक संदेह निर्माण होताहेत. हे एका ठिकाणी असं सांगितलं, पुन्हा दुसरीकडे तो अवतार झाला असं सांगितलं. याचा समन्वय कसा साधायचा? सांगणारी मंडळी पाहिजेत. अभ्यास केलेली मंडळी पाहिजेत. नुसतं वाचून आपल्या बुद्धीने अर्थ लावून होणार नाही. पुराणाचार्य म्हणून असायचे. पुराण वाङमयाचाच अभ्यास त्यांचा अखंड चाललेला असायचा. परस्पर विरोध जिथे येत असेल, तो विरोध दूर करणं, कोणाच्याही मनात संशय राहू न देणं, हे त्यांचं कार्य होतं. पुराणाचार्य होणं फार कठीण आहे. त्याला देवाची कृपा लागते. शंकराच्या कृपेमुळे मार्कंडेय ऋषी पुराणाचार्य झाले. कोणीही चिकित्सक मनुष्य त्यांच्याजवळ आला, तर त्याचा संदेह दूर करण्याची शक्ती त्यांच्याजवळ आहे. समन्वय करून देताहेत. परस्पर असंगती नाहीये. लोकांचं कल्याण व्हावं, लोकांना योग्य मार्ग दिसावा, त्याप्रमाणे लोकांनी आचरण करावं आणि आपलं कल्याण करून घ्यावं. हा त्यांचा उद्देश नाहीये. यशाची प्राप्ती व्हावी ही देखील इच्छा नाहीये. काही नाही. ज्ञानी महात्म्याने अशा उद्देशाने निर्माण केलेली पुराणे यांच्यात विरोध आहे, विसंगती आहे, असं एकदम आपण बोलून जातो. स्वत:च्या बुद्धीचा हा एक अभिमान आहे; घमेंड ज्याला म्हणतात त्या अभिमानामुळे कोणालाही बोलायचं. व्यासांची बुद्धिमत्ता किती आहे, योग्यता केवढी आहे, वगैरे काही विचार आम्ही करीत नाही. पुराणामध्ये परस्पर विरोध आहे, असंगती आहे, समन्वय होत नाही असे म्हणतो आपण. पण समन्वय करण्याची बुद्धी आपण मिळविली पाहिजे. त्याशिवाय समन्वय कसा करता येणार?

आपल्याला संशय आलेला आहे. संशय येणं हा काही दोष नाही. चिकित्सा करणं दोष नाही. पण बुद्धी 'काही नाहीच आहे', अशी पहिल्यापासून करून घ्यायची आणि काहीतरी संशय घेऊन, काहीतरी चिकित्सा करून शेवटी सांगणाऱ्याचाही वेळ घालवायचा आणि आपल्याला तर काही इच्छाच नसते. तर असे महात्मेही जगामध्ये आहेत. मुद्दाम पुराणादिकांचा, वेदांचा, शास्त्राचा सगळा अभ्यास करून त्याला पुढे न्यायचाय. ज्ञान अनंत आहे. पूर्ण ज्ञानाची भूमिका प्राप्त होईपर्यंत अनेक संशय उत्पन्न होतात. पण ते दूर करणाऱ्या महात्म्यांची जर संगती झाली तर पुन्हा विश्वास निर्माण होतो आणि पुन्हा आचरण होतं.

*******

संसारात खूप दु:ख आणि कष्ट आहेत. डोळ्यांसमोर हे असताना परमेश्वराचं विस्मरण होऊ नये एवढंच मागणं आहे. व्यासमहर्षी हे स्वत:ला कृतकृत्य समजताहेत. ''जगदंबेची कृपा माझ्यावर झाली आणि मी धन्य झालो.'' असं ते म्हणाले. सर्व वेदशास्त्रांचे ज्ञान व्यासमहर्षींना आहे. सामवेद, ऋग्वेद, यजुर्वेद आणि अथर्ववेद असे वेदांचे चार भाग ज्यांनी केले, त्यांची ज्ञानशक्ती किती मोठी असली पाहिजे! पुराणांची रचना केली. महाभारताची रचना केली. पण त्यांच्या मनात भगवतभक्ती, भगवतप्रेम जे उत्पन्न झालं त्याचं त्यांना समाधान आहे. आपल्याजवळ किती ज्ञान आहे, लोकांना मार्गदर्शन करण्याची किती शक्ती आहे, हा विचार नाही त्यांच्या मनात. आपल्या ज्ञानापेक्षा आपल्याला भगवतीचे प्रेम मिळाले आहे, त्याची धन्यता त्यांना वाटते. म्हणून जनमेजय राजाला तेच सांगताहेत.

भागवतामध्ये शुकाचार्यांनी कथा सांगितली आहे. वृत्रासूर म्हणजे असुर होता. पण पूर्वजन्मात मोठा भगवत्‌भक्त होता. परंतु पार्वतीच्या काही शापामुळे असुराच्या जन्माला आला. तो दैत्यांचा सेनापती झाला. इंद्रादिक देवतांबरोबर युद्ध करण्याचा त्याच्यावर प्रसंग आला. इंद्राची आणि त्याची गाठ पडल्यावर त्याने सांगितले, ''तुम्ही हे राज्य, धन, मान यातच रमा. आम्हाला याची जरूरी नाही. जय मिळवा, राज्य मिळावे अशी आम्हाला काहीही इच्छा नाही. आम्ही काही इच्छा धारण करून प्रयत्न करू लागलो, तर तो आमचा प्रयत्न फुकट जातो. देव आमचे ते प्रयत्न यशस्वी होऊ देत नाहीत आणि ही आम्ही आमच्यावर देवाची कृपाच समजतो. आम्हाला ते अकिंचन बनवतात. एक परमेश्वराच्या आधाराशिवाय दुसरे काही नाही पण तो आधार मनाला इतका आनंददायक आहे, की आम्ही अकिंचन आहोत हे बरं आहे. देवेंद्र! तुम्ही राज्याच्या आसक्तीमध्ये सापडलेले आहात, तुम्हाला अशी वासना होणार नाही. भगवंतांनी लवकर मला बोलवावं; त्यांच्याजवळ वैकुंठलोकात मला राहायला मिळावं एवढीच इच्छा आहे. जय मिळाला नाही तरी चालेल. प्राण गेले तरी हरकत नाही.'' ही भावना मनामध्ये आहे.

परमेश्वराचे स्मरण अखंड राहिले पाहिजे असे तुकाराम महाराज म्हणतात. कोणतीही सांसारिक वासना मनामध्ये राहू नये. सर्वही वासना घालविण्याची शक्ती या भगवतभक्तीमध्ये आहे, हे त्या भक्तांच्या चरित्रांवरून आपल्याला समजून येते.

*******

भगवद् गीतेमध्ये नवव्या अध्यायात भगवंतांनी आणखी मुद्दाम उल्लेख केलेला आहे.

मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतस: ।
राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिता: ।

इतके मोठेमोठे महारथी गेले तरी त्याची आशा सुटली नाही. परंतु शेवटी सगळी निराशा झालेली आहे. तेव्हां अशा प्रकारची स्थिती या लोकांची होते असं भगवान् सांगताहेत. प्रकृतीचं नियंत्रण होऊ शकत नाही असंही त्यांनी सांगितलेलं आहे.

शिष्टाईच्या वेळेला काय झालं? दुर्योधनाने युद्ध करू नये याकरता किती लोकांनी त्याला सांगितलं असेल. भीष्म, द्रोण यांनी तर सांगितलंच. धृतराष्ट्राने सांगितलं, त्याच्या आईने सांगितलं. शेवटी श्रीकृष्णांनीही सांगितलं. तेव्हां सगळ्यांनी युद्ध न करण्याचा प्रयत्न केला असताना सुद्धा त्याची प्रकृती काही बदलली नाही.

तर या प्रमाणे जरी प्रकृतीचं नियंत्रण होऊ शकत नाही, असा एक सिद्धांत भगवान् मांडताहेत. परंतु त्या प्रकृतीचं सुद्धा नियंत्रण करण्याचं सामर्थ्य ईश्वराजवळ आहे.

महाभारतामध्ये सुद्धा परीक्षित राजासारखा अत्यंत सुकृतसंपन्न महात्मा आहे; जन्माला येताना ज्याच्या वरती अश्वत्थाम्याने ब्रह्मास्त्राचा प्रयोग केलेला आहे. मनामध्ये उत्पन्न झालेले रागद्वेषादिक विकार-या विकारांमुळे मिळविलेलं ज्ञानसुद्धा कसं प्रतिबद्ध होत, त्याचं हे उदाहरण आहे.

साक्षात् द्रोणाचार्यांचा पुत्र अश्वत्थामा. उत्तम वेदशास्त्रांचं ज्ञान त्याला मिळालं असतानासुद्धा त्याची बुद्धी इतकी द्वेषमय बनून गेली की पांडवांचा वंशसुद्धा ठेवायचा नाही. वास्तविक द्रौपदीने त्याला जीवदान दिलेलं आहे. पांडवांची सगळी मुलं द्वेषाने त्याने शेवटच्या दिवशी मारली. दुसऱ्या दिवशी ते समजल्यावर द्रौपदीला किती शोक झाला असेल! परंतु शेवटी सर्व पांडवांनी आणि श्रीकृष्णांनी तिलाच विचारलं- ह्याला शिक्षा काय करायची? त्या वेळेला द्रौपदीनं सांगितलं, याला तुम्ही मारू नका. सोडून द्या.

त्याची कारणे सांगतानाही तिने सांगितलंय-की सर्वही अस्त्रविद्या धनुर्वेद ज्यांच्यापासून आपण मिळवलंत ते साक्षात् द्रोणाचार्य याच्या रुपानं तुमच्या पुढे उभे आहेत. याचा नाश करणं म्हणजे द्रोणाचार्यांचा नाश केल्यासारखं होईल.

परंतु जीवदान मिळाल्यानंतर सुद्धा त्याची बुद्धी काही बदलली नाही. कारण काय तर जी प्रकृती घेऊन जन्माला आलाय जीव त्या प्रकृतीप्रमाणेच कार्य होणार. कोणी कितीही उपकार करो त्याचा काहीही परिणाम बुद्धीवर होणार नाही.

*******

व्यास महर्षी सांगताहेत, ''जगदंबेचं ध्यान करावं आणि नामस्मरण करावं. नामस्मरणाने ध्यानाची अवस्था प्राप्त होते. आपण प्रयत्न केला असता ध्यान सिद्ध होतं असं नाही. अनेक विघ्न उत्पन्न होतात. म्हणून भक्तीमार्ग जो आहे तो ज्ञानालाही उपयोगी आहे आणि कर्मयोगालाही उपयोगी आहे.'' कर्माचरण केल्यानंतर भगवंताचं नामस्मरण शेवटी करायला सांगतात.

त्या भगवंताचं स्मरण करून, त्याला वंदन करुन न्यून पूर्ती करावी लागते. कर्म केलेलं आहे. परंतु त्याच्यामध्ये काय न्यूनता आलेली आहे हे पुढं सांगताहेत ते. कर्मामध्ये जी न्यूनता होती, ती सगळी न्यूनता शेवटी भगवंताचं स्मरण करुन पूर्ण करावी लागली. म्हणजे कर्मयोगालाही भक्तीयोग पोषक आहे. ज्ञानयोगाला तर आहेच आहे. योगाभ्यासाने जीवनमुक्ती मिळवावी किंवा श्रवण, मनन, निदिध्यासन याच्यामध्ये मन स्थिर व्हावं. त्या मनाची स्थिरता कधीही बिघडायची नाही. मिळालेली एकाग्रता कायम राहण्यासाठीही भक्तीची आवश्यकता आहे.

भगवान् 'योगक्षेमम् वहाम्यहम्' जे म्हणतात ते काय व्यवहारातच योगक्षेम असं नाही. अप्राप्य वस्तूची प्राप्ती, जे अप्राप्य साधन आहे ते प्राप्त करून देणं ह्याचं नाव योग आहे आणि प्राप्त जे झालेलं आहे ते सुरक्षित ठेवणं, ते बिघडू न देणं हा योगक्षेम साधनमार्गामध्येही आहे. संसारातला योगक्षेम म्हणजे आपल्या निरनिराळ्या इच्छा पूर्ण होणं, आपलं संरक्षण होणं हा योगक्षेमाचा अर्थ प्रसिद्ध आहे. परंतु जो भक्त आहे, त्या भक्ताचं जे साधन असेल त्या साधनमार्गामध्येसुद्धा ज्याची त्याला जरुरी आहे ते मिळवून देणं, जी मनाची स्थिरता मिळालेली आहे ती कायम राखणं हाही योगक्षेम आहे आणि हेही योगक्षेम जगदंबेकडूनच होताहेत. म्हणून त्या भक्तीमार्गाच्या योगाने हे सर्वही होऊ शकतं म्हणतात. नामस्मरण आणि स्वरुपाचं ध्यान हे दोन्हीही सांगितलं आहे व्यासांनी.

नाम आणि नामी यात वास्तविक अभेद आहे. शास्त्रकारांनी शब्द आणि अर्थ यांच्यामध्ये तादाम्य मानलेलं आहे. अन्य संबंध मानलेला नाहीये. पण ती भूमिका उत्पन्न होण्याकरता म्हणून अखंड नामस्मरण हे आरंभाला झालं पाहिजे. नामाच्या ठिकाणी श्रद्धा ठेवून जर अखंड नामस्मरण झालं तर नाम नामी ह्यांचा अभेद कसा आहे तो कळून येतो आणि त्या रुपाचं ध्यान घडतं.

*******

धर्म, अर्थ काम आणि मोक्ष चारही पुरुषार्थ एकमेव ईश्वराच्या सेवेने प्राप्त होतात. 'एकमेव' म्हणताहेत, पण तितका निश्चय पाहिजे. अर्थ, काम कसे मिळतील? देवधर्म करण्यात आपण गुंतलो तर नोकरीवर वेळेवर जाता येईल का? काम केलं नाही तर प्रतीमास वेतन कसं मिळेल? आपलं जीवन कसं जाईल? प्रपंचातील सर्व लोकांचं संगोपन कसं करता येईल? हे विचार मनामध्ये आल्यानंतर ईश्वराची सेवा बाजूला पडते. अर्थ, कामही ईश्वराच्या कृपेने मिळणे शक्य आहे, हा निर्धार मनामध्ये पाहिजे. अनिश्चित स्थिती बुद्धीची केव्हाही असून उपयोगी नाहीये. अर्थार्थी असला तरी त्याला अर्थ प्राप्त होतो. अपमान करणारी सावत्र आई, ध्रुव वनातून आला म्हटल्यावर बाहेर येऊन त्याला कडकडून मिठी मारून म्हणते, ''आलास बाळ! आम्ही फार दु:खी झालो होतो.'' हा देवाचा अनुग्रह आहे. अर्थप्राप्तीला काय वेळ आहे! अर्थप्राप्तीसाठी नोकरीच केली पाहिजे असं नाही. अर्थप्राप्तीची साधने सांगतात शास्त्रकार; पैसा मिळेल त्याच्याकरता प्रत्यक्ष सेवाच केली पाहिजे असं नाही.

इंद्रियनिग्रह हे पहिलं कारण आहे. इंद्रिये ताब्यामध्ये आहेत. हे पाहूनच लोकांना आदर वाटतोय. जिव्हा ताब्यामध्ये आहे. रसनेंद्रिय हे मुख्य आहे. रसनेंद्रिय ताब्यात आलं म्हणजे सगळी इंद्रिये ताब्यात आली. तोपर्यंत नाही. ह्याचेच नाव विनय आहे. जितेंद्रियत्वामुळे आपल्याला अनेक गुण प्राप्त होतात.

लोकांना उपयोगी पडणारे गुण ज्या महात्म्याच्या जवळ आहेत, त्याच्याकडे लोक येणारच की, त्यांचेच कल्याण आहे, कसे वागावे? - मार्गदर्शन घेण्याकरता येणार आणि लोकांचा अनुराग उत्पन्न झाला किंवा लोकांचे प्रेम एकदा मिळाल्यानंतर संपत्तीला काही तोटा नाही. नोकरीमुळे संपत्ती मिळेल ही एक कल्पना आहे. हा जर मार्ग व्यवस्थितपणे आचरण केला, जितेंद्रियत्वाने राहिले आणि त्यामुळे गुणप्रकर्ष जर मिळाला तर लोकांचा अनुराग झाल्यावर काही कमी नाही. याच्या संसाराची काळजी लोकांनाच उत्पन्न होते. घरात काय आहे? काय नाही? हे परस्पर लोकंच पाहतात आणि ते आपोआप घरी येते.

*******

मनाने झालेली कर्म अहंकारपूर्वक करू नयेत. होऊ देत. घडू देत. 'मनात येईल तसं वागलो, कोणाला बोललो' हरकत नाही. वाणीनेही तसंच चाललंय. देहानेही तसंच चाललंय. पण 'ते मी केलंय, कर्तृत्व माझं आहे' एवढं तरी समजू नका. तर पुन्हा ती कर्म जन्माला कारण होणार नाहीत. ती इथे संपायला हवीत.

दुसऱ्याला उद्वेग येईल असं आपण बोलतो हे योग्य नाही. शब्द आपण उच्चारले, ते शब्द त्याच्या मनाला लागले. ही शब्दात्मक वाणी आहे. कोणाची स्तुती केली. तोही शब्द आहे. निंदा केली, रागावून बोललो, तोही शब्दच आहे. शब्द उत्पन्न झाला आणि गेला. संपलं. तो काय राहणार आहे काय?

शरीराने कर्म झालं तेही संपून गेलं. कारण कर्म राहणार नाहीये. पण हे राहणारे आम्ही करून ठेवतो. ते कर्म मी केलेलं आहे असं म्हणतो. म्हणजे त्याची वासना, त्याचे संस्कार मनामध्ये कायम राहिले आहेत. म्हणजे पुन्हा तसे कर्म करण्याची तयारी आम्ही करून ठेवली. तेव्हा कोणीही आम्हाला बोलला की आम्ही बोलल्याशिवाय राहणार नाही. मी सहन करणार नाही. हाच अभ्यास आमच्या मनाचा कायम राहिल्यानंतर पुन्हा कर्माची तयारी आहे. कर्म संपून जाताहेत. पण कर्म हे जन्ममरण कायमचं देणारं केव्हा ठरतं? तर साहंकार झालं म्हणजे ठरतं. 'मी केलेलं आहे, माझ्यामुळे ही सगळी व्यवस्था झालेली आहे.' तेव्हा साहंकार कर्म होऊ नये. संपणारी आहेत कर्म संपून जातात. पापही राहात नाही आणि पुण्यही रहात नाही, अशी वस्तुस्थिती आहे. पण त्या कर्माबद्दल संस्कार, वासना आपण मनामध्ये वाढवीत असतो. त्यामुळे पुन्हा कर्म निर्माण होत असते. मग हे थांबायचं कसं? ज्ञानेश्वर महाराज सांगतात.

करणे वा न करणे । हे अवघे तोचि जाणे ॥
विश्व चलतसे जेणे । परमात्मेनि ॥

केवढी मोठी भूमिका आहे त्या भूमिकेवरून सांगताहेत ज्ञानराज. कोणचं कर्म करावं आणि कोणतं करू नये याचं ज्ञान आपल्याला नाहीये. हे ज्ञान फक्त त्याला आहे. सर्वज्ञ आहे तो आणि सर्वांना त्याची भीती आहे. जगदंबा, परमात्मा पूर्ण ज्ञानसंपन्न आहे. चिद्रूप आहे. सच्चिदानंदधन आहे. कर्म कितीतरी होताहेत. सगळं जग निर्माण करणं, संरक्षण करणं, संहार करणं, ही ईश्वराची कर्म चाललेली आहेत. पण त्याचा काही संबंध नाही. थोडसं आमच्याकडून काही पापपुण्य घडलं तर त्याच्याकरता आम्हाला जन्म घ्यावा लागतो. पण ईश्वराच्या हातून अनंत कर्म झाली तरी ती दिव्य कर्म आहेत. ईश्वराचं कर्म कसं होतं, महात्म्यांचं कर्म कसं होतं, हे जर पाहिलं आणि तसा विचार केला, तर आपल्याही मनाची, वाणीची तशी तयारी होऊ शकते.

मूळ विचार हा आहे की कर्तृत्व आपलं आहे की नाही? माझ्या बुद्धीने सगळं झालेलं आहे, माझ्या वाणीनं सगळं झालेलं आहे. माझ्या शरीराने मी सगळं करतो. आजारी पडलेला आहे किंवा बुद्धी कमी झालेली आहे, वाणीवर परिणाम झालेला आहे, बोलता येईनासं झालेलं आहे, त्यावेळेला का करता येत नाही याला? अपवाद असे काही सापडल्याबरोबर तो नियम संपला. 'मी सगळं केलेलं आहे', अशी फक्त समजूत आहे. संत महात्म्यांनी ओळखलं आहे, की खरा सिद्धांत वेगळा आहे. कोणच्या जीवाकडून कोणची कर्म व्हावीत हे जाणणारा तो परमात्मा आहे.

*******

वेदव्यास महर्षी स्वतःबद्दल समाधान व्यक्त करताहेत. भगवतीची सेवा, पूजा मला घडली. त्यामुळे मी कृतकृत्य झालो. मनुष्यजन्म प्राप्त झाल्यानंतर काहीही कर्तव्य राहिलं नाही अशी अवस्था प्राप्त होणं फार कठीण आहे. कितीही वय झालं तरीसुद्धा कर्तव्य शिल्लक राहातं. हे राहिलं, ते राहिलं. ही व्यवस्था करायची, ती व्यवस्था करायची आहे आणि एक दिवस शरीर सोडून जावं लागतं. कृतकृत्यता मिळणं ही फार मोठी कठीण गोष्ट आहे.

आचार्य महाराज स्पष्ट सांगतात, व्यवहारामध्ये ज्यांचे चित्त आसक्त आहे, संसारवासना मनामध्ये पूर्ण भरलेल्या आहेत, त्या जीवात्म्यांची अवस्था बालपणापासून कशी असते, हे सांगितलेलं आहे. लहान वय आहे. व्यवहाराचं काही ज्ञान नाही. मानापमान, रागलोभ उत्पन्न होतात. पण लगेच जातातही, हा ही मोठा गुण आहे. बालकांप्रमाणे वृत्ती झाली पाहिजे असं म्हणतात. ज्ञानी माणसांनी बाल्याचा अभ्यास करावा. बाल्य ह्याचा अर्थ रागद्वेषरहीत होणं. लहान मुलांचं भांडण आपापसात होतं, पण पुन्हा मनामध्ये काही राग नाही, द्वेष नाही, काही नाही. पुन्हा परस्परांची मैत्री कायम आहे. हा गुण आहे. म्हणून ज्ञान प्राप्त झाल्यावरसुद्धा बाल्य यावं. गुणग्राहक बुद्धीने इतरांचे गुण घेऊन त्याप्रमाणे वागायचा प्रयत्न करायचाय. पण आचार्य महाराज जन्माला आल्यापासून माणसाची सर्वसामान्य स्थिती कशी असते हे सांगत असताना म्हणतात, निरनिराळ्या प्रकारच्या खेळांमध्ये त्याचं मन गुंतलेलं आहे, अभ्यासाकडेही लक्ष नाही. बाल्यामध्येच अभ्यास केला पाहिजे. विद्यार्जन केलं पाहिजे. पण क्रीडासक्त स्थिती बाल्य असेपर्यंत राहाते.

तारुण्य प्राप्त झाल्यावर स्त्रीपुत्रांची, धनाची आसक्ती निर्माण होते. पण तारुण्यही जाणारच आहे. बाल्यही राहत नाही, तारुण्यही राहत नाही. राहत काहीच नाही. अवस्था आहे ती. कोणाचीही अवस्था कायम नाहीये. जीवन ही सुद्धा एक अवस्था आहे, तीही संपणारी आहे.

वृद्धावस्था झाली म्हणजे सेवानिवृत्त होतो ना! पण काही मंडळींना काळ कसा घालवावा याचा मोठा गोंधळ होतो म्हणतात. दिवसभर ऑफिसमध्ये काम करावं लागत होतं, त्यामध्ये वेळ जात होता. आता वेळ कसा जाईल? प्रथमपासून वाचनाची, चिंतनाची उपासनेची आवड असेल तर काळ जायला काय हरकत आहे? उलट जास्ती वेळ मिळाला म्हणून त्याला समाधान वाटेल. माणूस हा सवयीचा गुलाम आहे तेव्हां चांगल्या सवयी लावून घेतल्या पाहिजेत.

*******

संत मागत नाहीत असं नाही. निर्वाहापुरतं मिळालं म्हणजे पुष्कळ झालं म्हणतात. पोटापुरतं मागायला हरकत नाही किंवा मिळवायला हरकत नाही. पण ते पोटापुरतं होत नाही. सगळं जीवनभर पुरलं पाहिजे असं वाटतं. म्हणजे वासना या थांबत नाहीत कधी. संतमहात्म्यांनी आपल्या वासना मर्यादित ठेवल्या आहेत. त्या मर्यादित राहिल्या कशा? त्यांच्या मनाने गडबड का केली नाही? ईश्वराच्या कृपेने किंवा काही प्रयत्नाने. आमच्या वासना जशा पूर्ण होत जातात, तशा तशा त्या वाढतही जातात आणि वासना वाढू लागल्यावर मनाला काही संयम राहात नाही. आपल्या मनात उत्पन्न झालेली इच्छा पूर्ण करण्याकरता धर्म अर्धमाचा विचारही मनातून निघून जातो. हे वासनेचं साम्राज्य आहे.

प्रल्हादजी निर्वासन अंत:करणाचे आहेत. मनात काहीही वासना नाही. शरीर जाणार आहे. वासना अंत:करणामध्ये असेपर्यंत भीती आहे. संतमहात्मे निर्भय झालेले असतात. स्पष्ट आणि निश्चित मनाने ते सांगू शकतात. मार्गदर्शन करू शकतात. ऐकणाऱ्याचं जर काही पुण्य असेल आणि ते त्याने ऐकलं, तर त्याचं कल्याण होते. बाप आपल्याला मारणार आहे. प्रल्हादाला समजलेलं आहे. प्रयत्न बापाचे चालू आहेत. पण त्याला भीती वाटली नाही. कारण प्रल्हादाच्या अंत:करणामध्ये काहीही इच्छा नाहीये. शरीर राहावे अशीही इच्छा नाहीये. ज्याने जग निर्माण केलं आहे त्याच्या इच्छेप्रमाणे सगळं चाललं आहे. माझ्या प्रयत्नांनी मी जिवंत राहावं अशी काही इच्छा नाही. इतकं सगळं त्याने ईश्वरावर सोपवून दिलेलं आहे. ईश्वराच्या इच्छेप्रमाणे कार्य चालू आहे, असा पूर्ण विश्वास आहे. जेवढे जेवढे नाश करणारे पदार्थ होते, त्या सगळ्यांचा उपयोग केला. पण प्रल्हादाच्या केसालाही धक्का लागला नाही. त्याला अग्नीमध्ये टाकलं पण काही उपयोग झाला नाही. पाण्यामध्ये टाकलं. विष दिलं. सगळे प्रयोग करून पाहिले. अभिचारिक मंत्राचे प्रयोग केले. पण काही उपयोग झाला नाही. जगातील कोणतीही शक्ती प्रल्हादाला मारू शकली नाही. प्रल्हादाच्या मनात एवढी अहिंसा आहे, की त्यामुळे हिरण्यकश्यपूची शक्ती निष्प्रभ झाली आणि त्याचा नाश झाला.

भगवंताला राक्षसजातीचा राग आला. ब्रह्मदेव प्रल्हादाला म्हणाले, ''तुझ्या पित्यावर देव फार रागावलेत. पण तू त्यांचा राग शांत कर.'' म्हणजे कोणालाही देवाचा राग शांत करता आला नाही. तो पाच वर्षाचा मुलगा शांत करू शकेल असा विश्वास वाटलेला आहे ब्रह्मदेवांना. इतकी प्रल्हादाजवळ मोठी शक्ती आहे. कारण अंत:करणात अहिंसेची प्रतिष्ठा झाली आहे. मारणाऱ्याबद्दलसुद्धा त्याच्या मनामध्ये द्रोह नाहीये. शुद्ध अंत:करण आहे. प्रल्हादाने त्यावेळी केलेली भगवंतांची स्तुती मोठी प्रसिद्ध आहे. शांत झाले नरसिंह आणि ते प्रल्हादजींना म्हणाले, ''प्रल्हादा! तू काहीतरी वर मागून घे.'' प्रल्हादजी म्हणाले, ''मी आपला अकाम भक्त आहे. काय मागायचं हे मला समजत नाही. ''कोणत्याही प्रकारची कामना माझ्या मनामध्ये उत्पन्न होऊ नये. एवढंचं मागणं मी मागतो.''

*******

पांडवांना दुःख देण्याचा प्रयत्न कौरवांनी त्यांना वनात पाठवून सुद्धा केलेला आहे. त्या घोषयात्रेच्या निमित्ताने आपल्या सगळ्या सैन्याला, बायकांना वगैरे घेऊन आपलं ऐश्वर्य दाखविण्याकरता दुर्योधन वगैरे गेले आणि तिथं त्या चित्रसेन गंधर्वाने त्यांचा पराजय करुन दुर्योधनाला कैद केलं. मग त्याचेच लोक धर्मराजाला शरण आले आणि म्हणाले, ''दुर्योधनाला गंधर्वांनी कैद केलेलं आहे. युद्ध झालेलं आहे. पराजय झालेला आहे. त्याला तेवढं सोडवा. त्याची सुटका करा.''

भीम त्यांना म्हणाला, 'बरं झालं, आम्ही जे काम करणार होतो त्यांना कैद करण्याचं, त्यांचा पराजय करण्याचं, ते आपोआप गंर्धवांनी केलं, बरं झालं की.'' हे ऐकून धर्मराजांनी त्याला उपदेश केला. नीतीशास्त्राच्या दृष्टीने ही चूक आहे. आध्यात्मिक दृष्टीने ही फार मोठी चूक आहे. स्वतः तुम्हाला कैद केलं असतं तर कसं वाटलं असतं? दुर्योधनाला कैद करुन तो घेऊन चाललाय. दुर्योधन आपल्यापैकीच आहे, ही बुद्धी पाहिजे. भावांचं वैर असेल आपलं, ते आपलं आपण पाहून घेऊ. आपल्यामध्ये वैरभाव असताना आपण पाच आणि ते शंभर. पण जर कोणी आलं तिऱ्हाईत आणि तो आपल्या पैकी कुणाला त्रास देऊ लागला तर नीतीशास्त्राच्या दृष्टीने दोघांनी मिळून त्याचा पराजय केला पाहिजे.''

तेव्हां एकी पाहिजे. फूट असली तरी सुद्धा ती बंद केव्हा करायची हे त्यांनी शिकविलेलं आहे.

तुम्हा दोघांत तिसरा आल्यानंतर भांडू नका. तो एकेकाचा पराजय करील. तुम्हालाही राज्य मिळणार नाही. भावालाही मिळणार नाही तिसराच घेऊन जाईल. हा नीतीशास्त्राचा उपदेश आहे.

त्याच्याही पुढे आध्यात्मिक धर्म जो आहे त्या भूमिकेवर धर्मराज असल्यामुळे सर्वही भूतांच्याबद्दल त्यांची समदृष्टी राहिली म्हणून ''भूता परस्परे पडो मैत्र जीवाचे'' हा उपदेश भीम, अर्जुनाला त्यांनी केला आणि अर्जुनाने जाऊन त्या चित्रसेन गंधर्वाचा पराजय करुन दुर्योधनाला सोडवून आणलं आहे. म्हणजे वनामध्ये पांडव गेले असतानासुद्धा आपलं ऐश्वर्य दाखवून त्यांना दुःखी करावं ही इच्छा करणारा दुर्योधन, साम्राज्य मिळाल्यानंतरसुद्धा त्याच्या मनाचं समाधान झालं नाही. हा प्रयत्न आहे. पांडवांनी साम्राज्य गेलेलं असतानासुद्धा आपल्या मनावर ताबा ठेवलेला आहे.

हा एक दोघांच्या वृत्तीत फरक आहे. काय प्रयत्न केला तर त्यात हित आहे हे कळत नाही आपल्याला. दुर्योधनासारखे जे आहेत कौरव त्यांना बाह्य सुख जे आहे, सत्ता, धनधान्य, सगळी समृद्धी आपल्या ताब्यात पाहिजे असं वाटतं, त्यातच आपलं सुख आहे असं समजणारे कौरव होते. पांडव तसा विचार करत नव्हते.

मुख्य सुख जे आहे ते म्हणजे अहंकार नाहीसा झाला पाहिजे, मनाचा निग्रह साध्य झाला पाहिजे. विषय वासना कमी कमी झाल्या पाहिजेत आणि सर्वांच्याबद्दल मनामध्ये दयावृत्ती निर्माण झाली पाहिजे. हा अभ्यास करून सुख मिळवावं आणि ते मिळतं.

*******

दुर्गमासुरदैत्याने मंत्राप्रमाणे होमहवन केलं आणि रथात बसून युद्ध करण्याकरता तो बाहेर पडला. सर्व शक्तींना त्याने जिंकलं. हा एक मोठा चमत्कार आहे. देवीच्या संकल्पाने निर्माण झालेल्या कितीतरी शक्ती होत्या. त्यांच्याबरोबर युद्ध करून त्या दुर्गमासुराने त्यांचा नाश केलेला आहे. आणि मग महादेवी शताक्षी युद्धाला आली. तिने आपल्या चार बाणांनी प्रथम दुर्गासुराचे चार घोडे मारले. एका बाणाने त्याचा सारथी मारला, दोन बाणांनी त्याचे हात तोडले. एका बाणाने त्याच्या रथाचा ध्वज तोडला. डोळे फोडून त्याच्या हृदयात पाच बाण मारले. गतप्राण झाला तो देवीशी युद्ध करतांना. पण सन्मार्गाला विरोध करतांना त्याची बुद्धी ईश्वरनिष्ठ झाली. देवीचा पराजय कसा करायचा, नाश कसा करायचा हा त्याला अखंड ध्यास लागल्यामुळे त्याचा देह पडल्यानंतर एक तेज बाहेर पडलं आणि ते देवीच्या शरीरात गेलं. शेवटी अंत:काली जी बुद्धी होईल त्याप्रमाणे गती प्राप्त होते हा मोठा शास्त्रसिद्धान्त आहे. मृत्यू समीप आला असता आपल्या पापकर्मांबद्दल पश्चात्ताप झाला आणि ईश्वराचं स्मरण झालं तर ईश्वराची कृपा होते. कारण ईश्वरस्वरुपापर्यंत मन जाऊन पोहोचतं ना? शिशुपालाचा उद्धार झाल्याचं हेच कारण नारदमहर्षी सांगतात. ते म्हणतात, 'ज्याचं मन कोणत्याही कारणाने का होईना, ईश्वरापर्यंत जाऊन पोचलेलं आहे त्याचा निश्चित उद्धार होतो.' माध्यम कोणतंही असेल - द्वेष असेल, प्रेम असेल, भीती असेल! गोपींचा काम म्हणालात तरी हरकत नाही. गोपालकृष्ण सुंदर आहेत. अंत:करण तिथे तल्लीन झालेलं आहे. या निष्ठेचं फळ म्हणजे देहात्मविस्मृती. अंत:करण भक्तीनिष्ठ आहे. त्याचं फळ म्हणजे जीवभाव विसरून जाणं. स्वत:चं घरदार विसरुन जाणं एखाद्याचं मन कोणत्याही माध्यमाद्वारा ईश्वरापर्यंत जाऊन पोहोचलं तर ते शास्त्रविरुद्ध होत नाही. काम माध्यमातून गोपींचं मन गोपालकृष्णांच्या ठिकाणी स्थिर झालं, त्यामुळे अनेक जन्मांचा देहभाव त्या गोपी विसरुन गेल्या. त्यांच्या मनात गोपालकृष्णाशिवाय काही नाही. ही केवढी त्यांची योग्यता आहे! कबीरजींना लोक म्हणत, 'आपण केवढे रामभक्त आहात' पण कबीरजी लोकांना सांगत,

'कबीर कबीर क्या कहे
जावो जमुनाके तीर ।
एक एक गोपीके प्रेममे
बह गये कोटी कबीर ।'

ही खरी निरहंकारी भक्ती आहे. सर्व विसरून गेल्या त्या गोपी. शास्त्र विसरल्या आहेत, लोकापवाद विसरल्या आहेत, व्यवहार विसरून गेलेल्या आहेत. लोक काय म्हणतील याचा विचार नाहीये. म्हणूनच सर्व संत महात्म्यांना गोपीभाव धारण करून देवाची भक्ती करावीशी वाटते.

नाथांच्या कितीतरी गौळणी आहेत. ज्ञानेश्वर महाराजांच्याही गौळणी आहेत. खरी निष्ठा आपण गोपीभावात गेल्याशिवाय येणार नाही असं त्यांना वाटतं. आपल्या अंत:करणात जरी भक्ती, प्रेम असलं तरी गोपीभावात गेलं तर त्यांना अधिक उजाळा मिळेल, ही त्यांची धारणा आहे.

*******

वेदव्यासांनी सांगितलं आहे की, भक्तीमार्ग ज्याला मिळालेला आहे त्याची चित्तशुद्धी होईल आणि चित्तशुद्धीने पापवासना नाहीशा झाल्यावर पापकर्म घडणारच नाहीत. भगवंताची भक्ती करण्याकडेच त्याचं लक्ष राहील. मग कलीस्वभावाने होणारे दोष ते कांही बाधा करु शकणार नाहीत. हा एक उपाय वेदव्यासांनी जनमेजय राजाला मुद्दाम सांगितला आहे आणि नंतर त्यांनी सांगितलं, ज्याच्या मनामध्ये अशी सद्वासना निर्माण झालेली आहे की, 'चांगला मनुष्य जन्म आलेला आहे, असेना का कलीयुग असलं म्हणून काय बिघडलं? सद्वासना उत्पन्न होणं ही सुद्धा ईश्वराची कृपा आहे. आपण नामस्मरण करावं, ध्यान करावं, दान करावं, यज्ञ करावा' अशी अनेक चांगली चांगली जी कर्म आहेत त्या कर्मांच्या इच्छा उत्पन्न होतात. ती इच्छा उत्पन्न झाल्यानंतर चांगल्या तीर्थस्थानामध्ये जाऊन रहावं म्हणतात. तीर्थक्षेत्र वगैरे पवित्र स्थानं जी आहेत, त्या स्थानामध्ये राहून भगवंताच्या ध्यानाचा अभ्यास करणं, नामस्मरण करणं हे तिथं जाऊन करावं. ध्यानाचा अभ्यास सांगताना स्थान हे अत्यंत महत्वाचं सांगितलेलं आहे. भगवंतांनी आसन हे पवित्र देशामध्ये असावं असं सांगितलेलं आहे. एकांत पाहिजे. बाह्य दृष्टीने कोणत्याही प्रकारे मनाची व्यग्रता ढळून उपयोग नाही. अशा रीतीने मनाला स्थिर होण्याकरता म्हणून शुची-देशाची आवश्यकता भगवानही सांगताहेत. म्हणून चांगल्या तीर्थ क्षेत्रामध्ये जाऊन राहावे आणि भगवंताची उपासना भक्ती त्या ठिकाणी करावी असं मुद्दाम सांगितलेलं आहे. त्या स्थानाचंही काही महत्व आहे. मोठ्या मोठ्या ऋषीमंडळींनी त्या ठिकाणी तपश्चर्या केलेली असते. बद्रिकाश्रमात नर-नारायणांची तपश्चर्या अजून अखंड चालू आहे. आणखीही मोठे मोठे आश्रम आहेत. गंगा, यमुना, सरस्वती नद्या आहेत. सिंधु नदी आज जरी भारतात नसली तरी शास्त्रकारांनी ते पवित्र स्थान आहे असं सांगितलं आहे. अशा नद्यांच्या तीरावर जाऊन रहाणं, पुष्कर सरोवर आहे, मानस सरोवर आहे, अशा निरनिराळ्या पवित्र स्थानामध्ये राहाणं आणि तिथे काही तरी पुण्यकर्माचा अभ्यास करणं हे त्यांना सांगायचं आहे. म्हणजे कलीचे दोष सहसा त्याला काही बाधा करीत नाहीत म्हणतात. कलीचा स्वभाव आहे, हे खरं आहे परंतु प्रारब्धही तसं आहे. कली तरी काय करणार? याचं प्रारब्ध बलवत्तर असेल, ईश्वराची कृपा याच्यावर असेल आणि तसा पक्का निश्चय जर झालेला असेल तर कलीचा धर्मविरोध करायचा स्वभाव जरी असला तरी तो धर्मविरोध त्याच्याकडून होऊ शकत नाही.

*******

कलीयुगात मोठी म्हणून जी मंडळी जन्माला आलेली आहेत ती पूर्वीच्या युगातील राक्षस मंडळी. पूर्व युगामध्ये चांगली कर्म ज्यांच्याकडून झालेली असतील ते जीवात्मे जरी अशा रीतीने जन्माला आले तरी अर्थ कामासक्त जीवांचीच संगती जास्ती आहे. म्हणजे आपली जी मनोवृत्ती आहे अर्थ कामाकडे लागलेली ती कमी होण्याचा संभवच नाहीये. परंतु याही युगामध्ये सत्पुरुषही आहेत. ईश्वराचा प्रसाद संपादन करणारे, ईश्वराच्या इच्छेनेच जन्माला आलेले, असे काही संतही असतात. त्रिगुणात्मक विश्व आहे. सात्विक, राजस आणि तामस. सगळेच काही राजस, तामस असतात असे नाही. सात्विक मंडळीही असतात. कलीयुगामध्ये ईश्वराची कृपा संपादन करुन जन्माला आलेले असतात. त्यामुळे भगवंताचं भजन करण्याकडे त्याचं निरंतर लक्ष लागतं आणि त्यांची संगती या जीवांना जर घडली तर त्या संगतीचासुद्धा प्रभाव आहे. संसर्ग हा मोठा आहे. पापी मनुष्याचा संसर्ग झाला तर तशी बुद्धी होणार. पुण्यशील आणखी सत्पुरुषांचा समागम झाला तर तशी बुद्धी होणार. त्यांच्या संगतीला महत्व आहे कारण ईश्वराची कृपा त्यांच्यावर आहे.त्यांचा आणखी निश्चयही तसा आहे. काही लोक धर्माने वागतात, पण ते लोकांनी हा मनुष्य धार्मिक आहे चांगला वागतो असं म्हणावं म्हणून वागतात. दंभ आहे दंभ. दांभिकपणा आहे. खरं धर्माचरण नाहीये. त्यामुळे त्याचा उपयोग काय? तो मित्थ्याचार आहे, खरा आचार नाही. कर्मेंद्रिय तेवढी ताब्यामध्ये ठेवल्यासारखी दाखवलेली आहेत. कर्मेंद्रियांनी चांगल्या विषयांचे ग्रहण केल्याचे बाहेरुन दाखवायचे, परंतु मनामध्ये मात्र अनंत वासना उत्पन्न होताहेत. त्या कशा पूर्ण होतील इकडं लक्ष आहे. त्यामुळे पुन्हा जन्म निश्चित आहे. वासना मनांतून गेल्याशिवाय देहसंबंध बंद होणं शक्य नाहीये. कारण वासनांमुळे कर्मं होतात, त्या कर्मांचं फल म्हणजे नवीन देहाचा संबंध त्याला निश्चित येणार त्या कर्मांचं फल भोगण्याकरता. ही अशी कलीची स्थिती आहे. ईश्वराच्या कृपेने या कलीयुगातसुद्धा धर्माचरण घडलं नाही, अधर्माचरण घडलं तरीसुद्धा अशा कोणत्या तरी महात्म्याच्या संबंधाने त्या जीवाचा उद्धार होऊ शकतो.

*******

तीन प्रकारची कर्मं असतात. संचित कर्म हा विभाग मोठा आहे. प्रत्येक जन्मामध्ये घडणारी कर्म. ती साठलेली आहेत. पुष्कळ कर्मं आहेत. अनंत जन्मांची आहेत. देव असो, मनुष्य असो, गंधर्व असो अगदी ब्रह्मदेव जरी असला तरी त्या जन्मात झालेली कर्मं साठलेली आहेत. काही पुण्यकर्मआहेत, काही पापकर्मं आहेत. सात्त्विक, राजस, तामस, सर्व प्रकारची कर्मं आहेत. बंधन हे त्याच्या योगाने होणार. बंधन यांचा अर्थ शरीर संबंध त्या कर्मांने येणार. प्रत्येक जन्मामध्ये जी कर्मं आपल्या हातून होतात त्याचं ज्ञानही आपल्याला नाही. ती विसरुन जातो आपण. कोणची कर्म कशा बुद्धीने घडलेली आहेत इकडे आपलं लक्ष नाहीये. जगामध्ये पशुप्रमाणे वागणारे म्हणजे अगदी विषयांध लोकही पुष्कळ आहेत. संसाराशिवाय त्यांच्या मनात दुसरं काही नाही. सत्पुरुष मंडळीही पुष्कळ आहेत ज्यांच्या मनामध्ये हरीचं चिंतन अखंड चाललेलं आहे, ज्यांचा काल हरीशिवाय जात नाहीये. म्हणून त्यांच्या हृदयाला सोडून हरी जात नाही बाहेर. बांधून ठेवलेलं आहे. प्रत्येक दिवशी रात्री निजताना सकाळी उठल्यापासून संध्याकाळपर्यंत आपण कसे वागलो, आज आपल्या हातून कायावाचामनाने कोणची कर्मं झालेली आहेत याचं एक आत्मनिरीक्षण करावं म्हणून सांगतात शास्त्रकार. विचारांनीसुद्धा पुष्कळ सुधारणा होण्याचा संभव आहे. पण आमचा विचार दुसराच चाललेला आहे. 'तो कसा वागतो, त्याची चूक झालेली आहे, त्याने अपराध केलेला आहे' वगैरे दुसऱ्याचेच दोष काढण्याकडे आमचं मन लागतं. आपल्या हातून घडलेल्या दोषांचा विचारसुद्धा मनामध्ये येत नाही. परिमार्जन तर बाजूलाच राहू दे. हे दोष कशाने घालविता येतील, हा पुढचा मार्ग आहे. सर्व कर्मांचा क्षय कशाने होईल, हे वाटायलासुद्धा आणखी किती काल जातो. विस्मरण होतं. तर अशी ही कर्म घडून गेलेली आहेत. प्रत्येक जन्मात अशी पुष्कळ कर्म साठलेली आहेत.

क्रियमाण कर्माचा उपयोग असा आहे, जर काही चांगली कर्मं घडली, विचारपूर्वक जर पुण्यकर्मं ईश्वरार्पण बुद्धीने घडली, तर त्यायोगे मागची घडलेली कर्मं जी आहेत, त्यांचा सुद्धा विनाश होऊ शकतो.

*******

क्रिया, ज्याला पुण्य किंवा पाप आपण म्हणतो, त्या कर्माला काय ज्ञान आहे का? कर्म हे जड आहे. हे पुण्यकर्म की पापकर्म हे कर्म करणाऱ्याला समजतं. समजणारा चेतन म्हणजे जीवात्मा आहे. त्याच्या हातून होणाऱ्या सगळ्या क्रिया, सगळी पुण्यपापात्मक कर्मं ही सगळी अचेतन आहेत. त्यांना स्वत:ला काही ज्ञान नाही. आपल्या हातून जे चांगलं आचरण घडलं किंवा वाईट आचरण घडलं, त्या धर्म अधर्मरुप क्रिया, त्यांना स्वत:ला काही ज्ञान नाहीयं ना! ऑफिसमध्ये उत्तम काम करणारा जो आहे त्याला आणखी वर बढती मिळते. म्हणजे ती कर्मं त्याने चांगली केलेली आहेत हे जाणणारा, विचार करणारा कोणी तरी वरचा अधिकारी असतो. त्या अधिकाऱ्याच्या दृष्टीने याची कर्मं चांगली आहेत. उत्तम काम याने केलेले आहे, करतो आहे अर्थात याला वरची जागा द्यायला हरकत नाही. हा निर्णय त्या अधिकाऱ्याचा आहे. चांगलं-वाईट हा विचार ज्याला करता येतो तो त्या प्रमाणे ठरवितो आणि त्याच्या इच्छेप्रमाणे त्याला वरची जागा मिळते. किंवा शिक्षा न्यायाधीश देतो म्हणजे काय? तोही विचार करणारा आहे ह्याच्या हातून जे पाप घडलेलं आहे, दोष घडलेला आहे, अन्याय घडलेला आहे त्याचं बरोबर ज्ञान त्या न्यायाधीशाला होतं आणि तो बरोबर ह्याला शिक्षा करतो.

कर्मवाद हा एकदा मान्य झाला की ईश्वरवाद हा मान्य करावाच लागतो. कर्म अचेतन आहे, ते फल देऊ शकत नाही. कोणत्या वेळेला कोणच्या कर्माचं फल मिळावं हे जीवात्मासुद्धा जाणू शकत नाहीये. कर्म करुन जातो तो. परंतु आपण कोणतं कर्म केलं हेसुद्धा तो विसरुन जातो. तेव्हा माझ्या कर्माचं फल मला मिळालं पाहिजे असा जरी त्याला अहंकार असला, फलेच्छा असली तरीसुद्धा ती शक्ती त्याच्याजवळ नाहीये. मी केलेल्या कर्माचं मला आता फल मिळालं पाहिजे. नाही. आता औषध घेतलं पाच मिनिटांनी त्याचं फळ मिळालं पाहिजे. नाही. त्यालाही परिपाक व्हावा लागतो. शिजायला तांदुळ ठेवल्यानंतर लगेच भात झाला पाहिजे असं कसं म्हणता येईल? आता जमिनीत बी पेरल्यानंतर लगेच धान्य आलं पाहिजे, अशी गडबड कुठं करता येते का? दुष्ट कर्म फलाच्या सिद्धीसाठीसुद्धा काल परिपाक मानावा लागतो. काही कालानेच त्याचं फल आपल्याला मिळतं-आणि तेसुद्धा जो ज्ञाता आहे, जाणणारा आहे, विचार करणारा आहे, तोच त्याचं फल देऊ शकतो. म्हणजे ईश्वर हाच फलदाता आहे. परंतु कर्मसापेक्ष फलदाता आहे.

*******

मोक्षाला वासना प्रतिबंध करतात. ईश्वर सेवेला वासना प्रतिबंध करतात. वासनांमुळे ईश्वर साक्षात्कार होऊ शकत नाही. विषय वासनेमुळे इंद्रियांच्या द्वाराने मन बाहेर विषयांकडे जातं आणि त्या विषयांचा भोग घेऊन पुन्हा ते विषय मनामध्ये येऊन राहतात. हे बंद केव्हां व्हायचं? मनाने विषयांना सोडायचं का विषयांनी मनाला सोडायचं? हे दोन्ही तर शक्य नाही. हा प्रश्न विचारला त्या वेळेला ब्रह्मदेवांनासुद्धा काय उत्तर द्यावं ते सुचलं नाही. खरंच आहे. मन विषयापासून बाजूला झालं म्हणणं शक्य नाही. अनंत वासनारुपी विषय मनामध्ये इतके भरलेले असतात की त्यांचा एका मागून एक सारखा नंबर लागलेला आहे. एक मिळालं की पुन्हा दुसरं. असं सारखं चालू आहे. मन बाहेर जाणारच. बाहेर गेल्यावर ते विषय वासनारुपांनी पुन्हा मनांत येणार. कोणी कोणाला सोडायचं? काय उत्तर देणार? त्यावेळी ब्रह्मदेवांनी भगवंतांचं स्मरण केलं म्हणतात आणि भगवान् हंसरुपाने तिथे आले. सनकादिकांना उपदेश केला. ह्या दोघांचा विभाग झाला पाहिजे. मन आणि विषय बाजूला झाले पाहिजेत. याला एक उपाय आहे. सगुण अथवा निर्गुण ईश्वराचं ध्यान करणं, निदिध्यासन करणं. त्या ईश्वराच्या कृपेने जर अशा ईश्वर स्वरुपाच्या ठिकाणी, ध्यानाच्या प्रभावाने मन स्थिर झालं तर मन आणि विषय यांचा विभाग होऊन जातो मग ते मन आंतच राहातं. बाहेर विषयांकडे जातच नाही. गुळाला चिकटलेल्या मुंगळ्यासारखी स्थिती होते. हे ध्यानाचं महत्त्व आहे. पण ध्यान होणंसुद्धा फार कठीण आहे. मन स्थिर झालं पाहिजे. मनाचं स्थैर्य झाल्याशिवाय सगुणाचंही ध्यान होत नाही. ईश्वराच्या उपासनेचं मुख्य फळ ते सांगितलं आहे.

सगुणाचं ध्यान असो की निर्गुणाचं. हा एक उपाय सनकादिकांना भगवंतांनी हंसरुपाने मुद्दाम सांगितला. सद्गुरु नारायणस्वामींचाही ध्यानाचा अभ्यास होता. अखंड ध्यान चाललेलं असायचं. बाहेर कुठेही लक्ष नसायचं. पण चमत्कार असा की बंद दाराजवळ बाहेरुन लोकांनी मस्तक टेकवून नमस्कार केला की त्यांना 'नारायण, नारायण' ऐकू यायचं. नारायणस्वामी आंत ध्यानात असताना आशीर्वाद मिळायचा. तर ध्यान हा एक उपाय विषय आणि मन यांचा वियोग करण्याकरता हंसरुपी भगवंतांनी सांगितला आहे.

*******

कर्म जे आहे ते सृष्टी करताना ईश्वराने, भगवतीने सहाय्य म्हणून घेतलेलं आहे. जगदंबेने सृष्टी उत्पन्न केली, तर ती सृष्टी निर्माण होताना काल एक कारण आहे आणि जीवांची कर्म! काळाने परिपक्व, फलोन्मुख झालेली जी कर्मं, ही कर्महीी कारण कोटीमध्ये घेतलेली आहेत त्यांनी.

विषम सृष्टी निर्माण करणारा ईश्वर आहे म्हटल्यानंतर त्याच्यावर सगळा दोष येईल ना! काही जीव सुखी आहेत, श्रीमंत आहेत, गरीब आहेत ज्ञानी अज्ञानी अशी विषम सृष्टी आहे. त्याच्या इच्छेप्रमाणे जर त्याने सृष्टी निर्माण केली असं म्हणावं तर त्याच्या ठिकाणी वैषम्य हा दोष येईल. पक्षपाताचा किंवा लहरीपणाचा दोष येईल. म्हणून वेदव्यासमहर्षींनी हा विचार मुद्दाम मांडलेला आहे की सृष्टीकर्त्याच्या ठिकाणी विषमता हा दोष नाही. सापेक्ष आहे सृष्टी. कर्मसापेक्ष आहे. जीवाच्याकडून जी कर्म झालेली आहेत ती कर्म आहेत आणि जीवात्मेही आहेत. कर्म थांबलेली आहेत फक्त. प्रलयाच्या वेळेला जी काही फल देणारी कर्म शक्ती आहे ती थांबली फक्त. प्रकृतीचे तीन गुण समस्थितीमध्ये आल्यानंतर प्रलय होतो. साम्यावस्था म्हणजे प्रलय, ही प्रकृती आहे आणि विकृती म्हणजे सृष्टी आहे. तर गुणांच्यामध्ये वैषम्य उत्पन्न झालं, कमी जास्तीपणा झाला म्हणजे सृष्टी होते. ह्या सृष्टीच्या निर्मितीसाठी जीवांची कर्म घेतली आहेत. कर्मांप्रमाणे विषमता निर्माण झालेली आहे. हे शास्त्राचं, संतांचं उत्तर आहे.

सध्या आपल्याला सृष्टीमध्ये वैषम्य दिसतंय. सृष्टी याचाच अर्थ विषमता. समता हे सृष्टीचं लक्षणच नाहीये. प्रत्येक ठिकाणी विषमता आहे. तर सर्व ठिकाणी दिसून येणारी विषमता जी आहे त्या विषमतेचं कारण म्हणजे जीवांची कर्मे आहेत, हे उपनिषदांमध्ये, इतर ग्रंथांमध्ये शास्त्रकारांनी सांगितलं आहे. ती सृष्टीला उन्मुख झालेली कर्म पाहून तशा प्रकारची सृष्टी ईश्वरशक्तीकडून झालेली आहे. कर्म कारण आहे. जीवात्म्याकरताच सृष्टी आहे ना! आणि जीवात्म्याची स्वाभाविक बुद्धी अशी आहे की मी कर्ता आहे. कर्तृत्व अभिमान धारण करुनच त्याची कर्मं चाललेली आहेत. त्यामुळे त्याला फल देण्याकरता म्हणून ती कर्मं तशीच राहिलेली आहेत.

*******

मनामध्ये असणाऱ्या इच्छा संपणं ह्यालाच मुक्ती म्हणतात. चांगल्याही वासना नाहीत आणि वाईटही नाहीत. निर्वासन अंतःकरण झालेलं आहे. त्याशिवाय शांती प्राप्त होत नाही.

ध्रुवाने तपश्चर्या केली. परंतु आपल्याला सर्वोच्च पद मिळावं, सर्वांपेक्षा उच्च स्थान मिळावं, ही वासना मनामध्ये आहे. वासना मनामध्ये धरुनही पुष्कळ आणखी प्रखर तपश्चर्या होऊ शकते. ध्रुवाचा अपमान झाला. श्रीहरीचा प्रसाद संपादन करावा आणि त्याच्या जवळच मागावं म्हणून त्याने तप केलं आणि त्याप्रमाणे त्याला हरी दर्शन झालं. त्याच्याकरता ध्रुवपद म्हणून एक स्वतंत्र पद हरीने त्याला दिलेलं आहे. जोपर्यंत मनामध्ये ''मला मोठं स्थान मिळालं पाहिजे'' ही प्रबळ इच्छा होती, तोपर्यंत मनात दुसरा विचार नाहीये. पित्याचं राज्य नको मला. उष्ट नको. माझ्याकरता स्वतंत्र स्थान पाहिजे. इच्छा असावी तर अशी असावी. नाही तर नको, काहीच नको आणि त्याप्रमाणे त्याची ही इच्छा अल्प काळामध्ये पूर्ण झाल्यानंतर त्याला समाधान वाटलं पाहिजे. न मागणं सगळ्यांत चांगलं. काहीही मागायचं नाही. काही मागितलं म्हणजे देवाला कळत नाही असं म्हटल्यासारखं झालं. सकाम भक्ती कमी का मानायची? आपली इच्छा पूर्ण होण्याकरता देवाची तपश्चर्या करायची, देवाला ज्ञान नाही का? सर्वज्ञ आहे ना देव ! ती श्रद्धा कमी झाल्यासारखी होते ना! 'धैर्य दे' म्हणून तरी कशाला मागायचं! काय द्यायचं ते सगळं ज्ञान त्याला आहे. हा एक मोठा विश्वास पाहिजे.

तो विश्वासच कमी झाला आणि आपण हे भलतंच मागून घेतलं असं ध्रुवाला वाटायला लागलं.आता केलेलं आहे ते प्रारब्ध कर्मच झालं ना! जे काही क्रियमाण कर्म आहे ते क्रियमाण कर्मच प्रारब्ध झालेलं आहे आता. म्हणजे पुण्यात्मक पापच झालं की नाही हे ध्रुवाकडून? पुण्य केलं, तपश्चर्या केली, हरीचं दर्शन झालं, वर मिळाला, पण हा प्रतिबंध झालेला आहे, म्हणजे पाप आहे. म्हणून ध्रुवाला पश्चाताप झालेला आहे. संसार बंधन तोडून टाकणारा, जन्म मरणातून मुक्त करणारा परमात्मा समर्थ असून, त्याच्याजवळ काय मागितलं? सर्वांपेक्षा उच्च असं एक स्थान मागितलं. सर्वही त्याला प्रदक्षिणा करतात. म्हणजे जास्ती अहंकारच आहे. देवापासून दूर जाण्याचा हा प्रसंग आहे. हा वर म्हणजे देवापासून दूर नेणारा आहे. अशी परिस्थिती आहे म्हणजे कर्माने मिळणारं जे फळ आहे ते अशा प्रकारचं आहे म्हणून कर्म करताना ते काही इच्छा धरुन कर्म करु नये म्हणतात. फलेच्छा असू नये.

*******

यत्कारोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासियत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥९.२७॥

अर्पण कर म्हणतात भगवंत.

क्रिया अर्पण कशा करायच्या? क्रिया काय हातात घेऊन देता येण्यासारखा पदार्थ आहे का? कार्य ईश्वरार्पण करणं याचा अर्थ मी कर्ता नाही. प्रत्येक कर्माच्या वेळेला निरहंकार वृत्ती झाली पाहिजे. म्हणजे कर्माची शक्तीही संपली. कर्मामध्ये जीवाला जन्ममरण द्यायची जी शक्ती आहे, ती गेली. कर्म करताना बुद्धी निरहंकार होणं, हीच ईश्वरार्पण बुद्धी आहे. वस्तुतः कर्तृत्व आपले नाहीये हे शास्त्रप्रमाणाने आणि सिद्धमहात्म्यांच्या सांगण्यावरून आपल्याला कळून येतं. त्याप्रमाणे समजून घेण्याचा प्रयत्न करायचा आहे.

''कशाने देवा तुझी पूजा करावी?'' तुकाराम महाराज म्हणताहेत. फळ, फुलं, पाणी सगळं तुम्हीच निर्माण केलंत. अहंकार नाहीये. आपण अभंगरचना केली असं तुकाराम महाराजांना कधीही वाटलं नाही. अभंगाच्या वह्या इंद्रायणीत बुडविल्यानंतर तिथेच बसून राहिले बारा दिवस. 'आपले अभंग गेले.' असं त्यांना वाटलं असेल का?

आपुल्या बळे नाही मी बोलत ।
सखा कृपावंत वाचा त्याची ॥

ही धारणा त्यांची आहे. माझी वाणी नाहीये. अर्थात ज्याच्या वाणीतून हे अभंग निर्माण झालेत, ते अभंग शिल्लक राहिले तर लोकांचे कल्याण होईल, ही तळमळ मनामध्ये आहे.

भगवान शंकराचार्य महाराजांनी सौंदर्यलहरी या नावाचा एक मोठा ग्रंथ लिहिला आहे. सर्व ग्रंथ लिहून झाल्यावर शेवटी ते म्हणतात,

''आई ही रचना माझी नाहीये. हे स्तोत्र मी केलं असं मी म्हणू शकत नाही. तसं म्हटलं तर निरांजने लावायची आणि सूर्याला ओवाळायचे हे काय शोभतं का?'' सूर्याचा प्रकाश केवढा आणि तुमच्या निरांजनाचा प्रकाश केवढा, काय उपयोग आहे?

सर्व शक्ती-ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती जगदंबेची आहे, परमेश्वराची आहे, अशी भावना आचार्य महाराजांची आहे. तुकाराम महाराजांची आहे.

तर ही निरहंकार वृत्ती आहे आणि अहंकार गेल्यामुळे ते अभंग परत मिळाले तुकाराम महाराजांना. ''तुमचे अभंग आहेत. जगाचे कल्याण करण्याकरता तुमची वाणी आहे, माझी वाणी नाही. असंच ते म्हणतात.''

*******

बलीराजाने तीन पावलं भूमी देण्याचं कबूल केलं. वामनांनी आपलं विश्वरूप प्रगट केलं आणि दोनच पावलात त्यांनी भूलोक, स्वर्गलोक व्यापून टाकला. मग त्यांनी विचारलं, ''तिसरं पाऊल कुठे ठेवू?'' आत्ता असं कोणा ब्राह्मणाला विचारता येणार नाही. ''तुम्ही इतकं कबूल केलं होतं, मग तितकं का देत नाही?'' म्हणजे पुन्हा त्याला बोलावणंच यायचं नाही. पण बलीराजा तसा नाही. समर्थ आहे. कबूल केलेलं आहे. त्याने सांगितलं, ''तिसरं पाऊल ठेवायला माझं शरीर अद्यापि शिल्लक आहे ना ! माझी भूमी दिली. राज्य संपलं. पण माझं मस्तक आहे, त्याच्यावर तिसरं पाऊल ठेवा.'' आता हे दान किती मोठं झालेलं आहे, राज्य तर सगळं गेलंच. शुक्राचार्यांची संमती नाहीये. ते म्हणाले, ''हे असं दान करता येत नाही.'' पण बलीराजाने सांगितलं, ''मी आता कबूल केलं आहे.'' इतकंच नाही तर शेवटी आपलं शरीरसुद्धा अर्पण केलं आहे. आत्मनिवेदन भक्ती याला म्हणतात. ही बलीराजाची आत्मनिवेदन भक्ती मोठी आहे. माझं शरीर घ्या म्हणाला. ''तीन पावलं भूमी देण्याचा मी संकल्प केला हो. पूर्ण केला असे सांगा.'' वामनांना आता काय बोलता येणार?

पण त्या बलीराजाची जी स्त्री होती, ती मोठी विवेकसंपन्न होती. तिने वामनांना प्रार्थना केली, ''महाराज, माझे पतिदेव अज्ञानाने बोलताहेत, तुम्हाला दान करायचं म्हणजे मालकी पाहिजे ना ! स्वत:च्या वस्तूंचे दान दुसऱ्याला करता येतं. 'इदं न मम ।' म्हणून ते स्वत्व सोडायचं आहे. ते दोन पावलं भूमी दिली असं म्हणताहेत, ही एक चूक आहे आणि तिसरं पाऊल त्यांच्या शरीरावर ठेवायला सांगताहेत. ह्यांचं शरीर? शरीर ह्यांनी केलंय का तयार? संपूर्ण जग ज्याने निर्माण केलंय तो जगाचा स्वामी आहे, एवढं ह्यांना कळत नाही? विश्वेश्वर स्वत:ला समजतात. स्वत:च्या शरीरावरचं स्वामित्व आपलं समजतात? आणि 'हे शरीर माझं मी तुम्हाला देतो आणि मी दान केलं' असं म्हणतात. कोणी सांगितलं दान करायला? तुमचीच वस्तू तुम्हाला द्यायची आणि दान केलं म्हणायचं, केवढं अज्ञान आहे ! त्याबद्दल ह्यांना क्षमा करा. हे दान होऊ शकत नाही.''

वास्तविक केवढं ज्ञान आहे ! सर्वस्व देऊन टाकलं. विश्वरुप दर्शन होण्याची योग्यता त्या बलीच्या संकल्पामध्ये आहे. हा (वामन) जे मागेल ते द्यायचं. त्यामुळे विश्वरूप दिसलं. पण त्याच्या स्त्रीला हे पसंत नाहीये. जोपर्यंत चित्तामध्ये अहंकार आहे. 'माझं शरीर आहे; माझं राज्य आहे' असं मनात आहे तोपर्यंत दान होऊ शकत नाही. दान करण्याचा अधिकार कोणालाच नाही. ''कशाने देवा तुझी पूजा करावी?'' तुकाराम महाराज म्हणताहेत. फळ, फुलं, पाणी सगळं तुम्हीच निर्माण केलंत.

*******

श्री गुरुमहाराजांच्या आशीर्वादाप्रमाणे नारायण स्वामींना प्रत्यक्ष नरसिंहसरस्वती स्वामीमहाराजांनी संन्यासाश्रम दिला आणि नरसोबावाडीमध्ये दत्तप्रभुंच्या आज्ञेने ते राहिले.

एक कुष्ठरोग झालेला मनुष्य गावाबाहेर झोपडी बांधून राहात होता. दत्तमहाराजांची आपल्यावर कृपा व्हावी आणि आपण या प्रारब्धकर्मातून मुक्त व्हावं अशी त्याची इच्छा. एके दिवशी भगवान नरसिंहसरस्वती दत्तात्रेयांनी त्याच्या स्वप्नामध्ये जाऊन सांगितलं, ''या ठिकाणी एक नारायण स्वामी महाराज म्हणून आहेत. रोज संगमावर सकाळी स्नान करण्याकरता ४ वाजतां जातात. तेव्हां त्या ठिकाणी तुम्ही जा. त्यांनी वर स्नान केल्यावर त्यांच्याखाली तुम्ही उभे रहा. त्यांच्या अंगावरचं पाणी तुमच्या अंगावर पडू द्या. तुमचा महारोग बरा होईल.''

त्या आज्ञेप्रमाणे तो ब्राह्मण स्नानाकरता नदीत जाऊन उभा राहिला. नारायणस्वामींच्या लक्षामध्ये सगळा प्रकार आला. नारायणस्वामी महाराज नदीच्या पात्रातून बाहेर आले. त्याला विचारलं, ''का बाबा तू इतक्या पहाटे ४ वाजतां कशाला आला आहेस?'' तो म्हणाला, ''स्नान करण्याकरता'' तेव्हां ते म्हणाले, ''मग स्नान करुन निघून जा'' तो म्हणाला, ''नाही, तुम्ही स्नान केल्यानंतर मला स्नान करायचं आहे'' महाराजांनी विचारलं, ''हे तुला कोणी सांगितलं?' तो म्हणाला, ''मला दत्तात्रेयांची आज्ञा आहे, माझा रोग बरा व्हायचाय, त्यांनी आज्ञा केली तुमच्याबरोबर स्नान करायची'' नारायणस्वामी म्हणाले, ''चल माझ्याबरोबर'' आणि त्याला घेऊन दत्तात्रेयांच्या समोर आले. नदीमध्ये अजून कोणी मंडळी आली नव्हती, बाहेर उभे राहिले. त्याला सांगितलं, ''स्नान कर'' केलं स्नान, त्याला सांगितलं, ''जुनी वस्त्र टाकून दे. दुसरी वस्त्रं नेस. तुझ्या अंगाला आता रोग नाही. आताच्या आता या गावातून निघून जा. सूर्योदय होईपर्यंत तू या गावात रहाशील तर तुझं शरीर पुन्हा पूर्वीप्रमाणे होईल.'' त्यांनी विचार केला हा सांगत हिंडणार सगळ्यांना नारायणस्वामींनी बरं केलं. त्याला घालवून दिलं आणि स्वत: गावाला जाण्याची तयारी केली.

आतून दत्तप्रभुंचा आवाज आला, ''काय स्वामीमहाराज? कुठं प्रवास आहे आता? गावाला निघाला? तुम्हांला आमचा कंटाळा आलेला दिसतोय!'' नारायणस्वामी म्हणाले, ''तुम्हांलाच आमचा कंटाळा आलेला दिसतोय.'' दत्तप्रभुंनी नारायणस्वामींचा दंड धरला, ''थांबा म्हणाले, वंदन करु नका. आम्हांला तुमचा कंटाळा आला म्हणून कोणी सांगितलं?'' नारायणस्वामींनी विचारलं, ''त्या ब्राह्मणाच्या स्वप्नात जाऊन त्याला सांगितलं माझ्याबरोबर स्नान करायला. तेव्हां अशा उपाधी आपण जर मला लावत असाल तर आपल्या सान्निध्यात येऊन काय करायचं? त्याचं प्रारब्धकर्म हा आमचा दोष आहे का? तो त्या जीवाचा दोष आहे. परंतु आपण आहात ना!'' दत्तप्रभू म्हणाले, ''अहो तुमच्यासारख्या ज्ञानी माणसाचं जगाकडे लक्ष नको कां? जगाचा उद्धार कसा व्हायचा?'' नारायणस्वामींनी उत्तर दिलं, ''जग ज्यांनी निर्माण केलं त्याचं काम आहे ते. आमचं काम नाहीये. आम्ही फक्त आपलं ध्यान करीत राहणार.'' त्यावेळी दत्तप्रभू ''जा आता तुम्ही लवकर स्नान करा. आम्ही तुमच्या वाटेला जाणार नाही.'' आणि असं म्हणून ते भांडण मिटलं. हे पराभक्तीचं म्हणून उदाहरण दिलेलं आहे.

*******

मनामध्ये जोपर्यंत पाहिजे पाहिजे म्हणून लोभ आहे तोपर्यंत माणसाची स्थिती आहे तशीच राहाते. दारिद्र्य असताना काही नाही म्हणून ताप आहे आणि संपत्ती मिळाल्यानंतर ''लाभे लोभः प्रवर्धते'' आचार्य महाराज सांगताहेत, ''दारिद्र्य आहे म्हणून दुःख आहे आणि मिळाल्यानंतर लोभ उत्पन्न होतो. आणखी मिळत नाही म्हणून दुःख आहे. त्यामुळे अपरिग्रह सिद्ध होणार कसा! अपरिग्रह हा मोठा गुण आहे. तर त्याकरता तुष्टी असणं आवश्यक आहे. ती तुष्टीच नसेल तर तो अपरिग्रह सिद्ध होणार कसा? त्या करता काही शास्त्रीय प्रयोग सांगितले आहेत. प्रयत्न सांगितले आहेत.

दानाचीही व्याख्या त्यांनी मुद्दाम केलेली आहे. 'देशे, काले, यथाशक्ती सत्पात्र दानम्' अशी व्याख्या केली जाते. यथाशक्ती हे मुद्दाम घातलंय त्यांनी. शास्त्रकारांनी काही सर्वच दान करायला सांगितलं, असं नाहीये. पण ती 'यथाशक्ती' म्हणजे दुसऱ्याने ठरवून उपयोगी नाही. आपली शक्ती किती आहे हे पाहून, आपण हे दान करू शकतो की नाही हा विचार करून, ज्याचं त्यानं ठरवायचं आहे. दुसऱ्यानेच त्याची शक्ती इतकी आहे, त्याने इतकं दान केलं पाहिजे हा सल्ला देणं याचा काही उपयोग नाही.

दान शब्दाचा अर्थ काय आहे ! दान म्हणजे 'मम' 'ममता' 'माझं माझं' हे सुटण्याकरिता 'न मम, न मम' असं दान सांगितलं आहे. ''आत्मा असंग आहे हे अनुभवास येण्याकरता दान आहे'', ही दानाची व्याख्या केली आहे त्यांनी दुसरीकडे. दान पदार्थाचं अत्यंत मोठं फल म्हणजे आत्मस्वरुप असंग आहे हे समजून येण्याकरता दान आहे. कशाशीही आत्मस्वरुपाचा संबंध नाही. कुठेही संबंध नाही.

तर 'असंगोह्यं पुरूषः' म्हणून जे उपनिषदामध्ये वर्णन केलेलं आहे, ते असंगत्व ज्ञान, आत्म्याचं असंगत्व दाखवण्याकरता आणखी ज्ञानाची प्रक्रिया सांगितली आहे. प्रत्येक पदार्थाबद्दल जर ''न मम, न मम'' म्हणजे ममता जर बाजूला झाली तर माझा काही संबंध नाही हे आत्मज्ञान त्या दृष्टीनं होण्याकरता दानाचा उपयोग आहे.

*******

ईश्वराचं आमच्याकडे लक्ष नाही, म्हणून काही लोक आक्षेप घ्यायला लागले. त्यावेळी उद्धवजींना उपदेश करताना भगवान् सांगताहेत -

मनुष्य देह कोणी दिला? आमच्या दृष्टीने मनुष्य स्वत:च्या इच्छेने देह धारण करू शकतो का? टाकू शकतो का? काही नाही. टाकणंही आमच्या हातात नाही. धरणंही आमच्या हातात नाही. महात्मे उपदेश करण्याकरता देह धारण करून येताहेत, सारखे फिरताहेत. परीक्षित राजाला उपदेश करण्याकरता शुकाचार्य महाराज स्वत: होऊन आले.

इतकी सगळी व्यवस्था जीवांच्या उद्धाराकरता मी केलेली असताना, जीव जर या भवसागरातून तरून जाण्याचा प्रयत्नच न करू लागला तर काय करणार त्याला. आत्मघात त्याचा त्यानेच करून घेतलेला आहे.

उपासकाने उपासनामार्गामध्ये ईश्वर आपल्याला नेहमीच अनुकूल आहे अशीच धारणा केली पाहिजे. ईश्वर आपल्यावर कधीही रागवत नाही, अशी नेहमी भावना असली तर त्याची उपासना व्यवस्थित होईल. जरा संसारातलं कमी जास्त झालं की लगेच ''इतकं आम्ही केलं ईश्वराचं आमच्याकडे लक्ष जाऊ नाही का? काय आम्ही इतकी सेवा केली, दानधर्म केला हेच आम्ही पुष्कळ रडगाणं गातो. तर नेहमीच ईश्वर अनुकूल आहे.''''ठेविले अनंते तैसेची रहावे'' यात तुकाराम महाराजांनी हेच सुचवलंय त्यात काही निष्क्रियतेचा उपदेश केलेला नाही. किंवा दैववादाचा उपदेश केला नाही. लोकमहेश्वरत्व यात व्यक्त केलेलं आहे. अनंताने ठेवलं तसं रहावंच लागेल तुम्हाला, असा त्याचा अभिप्राय आहे. तुम्ही रहा असा नाही.

तर या दृष्टीने संतांनी केलेलं मार्गदर्शन, त्यांना आलेला ईश्वरस्वरुपाचा अनुभव, ईश्वरशक्तीची जाणीव त्यांना असल्यामुळे त्यांनी त्याप्रमाणे सगळं मार्गदर्शन केलेलं आहे.

*******

विकार ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी सुख असलं तरी सुद्धा त्याने मनाचं समाधान मिळत नाही. हा उपदेश आचार्य महाराजांनी मुद्दाम केलेला आहे. संसारामध्ये दु:ख जास्ती आहे की सुख जास्ती आहे? सुखाकडे आपलं लक्ष कमी असलं तरी थोडं जरी सुख मिळालं तरी अधिक मिळण्यासाठी आपण जास्तीत जास्त प्रयत्न करतो. मनाच्या विरुद्ध पुष्कळ गोष्टी घडून येतात. तरीसुद्धा तिकडे आपलं लक्ष नाहीये. या करता विचार चांगला उत्पन्न झाला पाहिजे. आणखी मनाची चांगली तयारी झाली पाहिजे. जरी क्रोधादिक विकार उत्पन्न झाले तरीसुद्धा ते आवरण्याची शक्ती मनाच्या जवळ उत्पन्न झाली पाहिजे. विकारी मन होतं, विचारीही मन बनलं पाहिजे. तशी शक्ती मनामध्ये अभ्यासाने जर उत्पन्न झाली तर ईश्वराच्या कृपेने त्याला कुठेही सुख आहे. सर्वांची दु:ख तो दूर करण्याचा प्रयत्न करतो आहे. आपल्या सुखदु;खाची जशी आपल्याला काळजी आहे त्याप्रमाणे दुसऱ्याच्या सुखदु:खाचीही काळजी त्याला उत्पन्न होते आणि सर्वही जगाच्या उपयोगी तो पडतो आहे. ईश्वर कृपेने हे अशा प्रकारचे महात्मे दुसऱ्यांची दु;ख निवारण करू शकतात. त्यांच्याजवळ तशी शक्ती, सामर्थ्य आहे, नुसती बोलण्यापुरती भूतदया नाहीये. त्यांच्या मनामध्ये दया उत्पन्न झाल्यावर ते आपल्या शक्तीने ईश्वराच्या कृपेने दुसऱ्यांची दु:ख दूर करू शकतात. ही शक्ती त्यांनी मिळवलेली असते. त्या करता हा एक प्रयत्न आहे.

सर्व आरोग्य संपन्न राहोत. कोणालाही दु:ख राहू नये असा प्रयत्न करण्याची बुद्धी आणि शक्ती ज्यांना मिळालेली आहे ते महात्मे सर्व जगाचं कल्याण करु शकतात. जगाचं कल्याण संतांच्यामुळे, विभूतींच्यामुळे होतं. सर्वही जीव परमात्म्याचे अंश आहेत. ''ममैवंशी जीवलोके जीवभूत: सनातन: ।' तरी अंश निराळे आणि विभूती निराळ्या. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' म्हणतात.

ईश्वराच्या शक्तीचा विशेष रुपाने आविर्भाव ज्या ठिकाणी झालेला आहे त्या सगळ्या विभूती आहेत आणि ते विभूती म्हणून असलेले संत, महात्मे जगाच्या कल्याणाकरता प्रयत्न करत असतात. त्यांचा तो स्थायीभावच झालेला आहे ना! ते काही दाखवण्याकरता प्रयत्न करतात असे नाही. परोपकाराकडे त्यांचं लक्ष असतं. लोकांना सांगण्याकरता ते काही करत नाहीत. त्यांची मनोवृत्तीच तशी राहाते.

अशी मनाची वृत्ती बनण्याकरता मनुष्य जन्म आहे. कोणती वृत्ती बनवायची, दोष वाढवायचे की गुण वाढवायचे, हे समजलं पाहिजे. कोणते दोष मनामध्ये आहेत, कोणते गुण आहेत, किती कमी आहेत, किती जास्त आहेत हे सगळं आपल्या मनाचं निरीक्षण करून ते दोष घालवण्याकरता, सद्गुण संपन्न मन करण्याकरता, मन:शुद्धी करता ते संत महात्मे प्रयत्न करतात. त्यांच्यावर ईश्वराचा प्रसाद होतो. ईश्वराचं सहाय्य त्यांना होतं आणि जरी दु:खं आली तरीसुद्धा त्यात ते समाधानाने राहू शकतात.

*******

प.पू.श्रीवासुदेवानंदसरस्वती महाराजांनी श्रीपाद श्रीवल्लभांचे एक स्तोत्र केलेलं आहे. या स्तोत्रात भक्त देवाची आठवण करतो आहे की अजून आपली कृपा आमच्यावर कां होत नाही? आपल्याला माझा विसर पडला काय? का प्रभू आपल्याला झोप लागली आहे? गाढ झोप लागल्यामुळे आपल्याला माझी हांक ऐकू येत नाही काय? वास्तविक ईश्वराला झोप नाही. तो निर्गुण निराकार असल्यामुळे सर्व दोषांपासून मुक्त आहे. झोप वगैरे सर्व विकार जीवाला आहेत. ईश्वराला ते नाहीत. ज्ञानी मनुष्य आणि ईश्वर हे सदैव जागृत असतात. ते ज्या गोष्टींच्या ठिकाणी जागृत असतात त्या आत्मस्वरुपाच्या ठिकाणी सर्व सामान्य अज्ञानी जीव हे झोपलेले असतात आणि संसाराच्या ठिकाणी जिथे हे सर्व जीव जागे असतात म्हणजेच अडकलेले असतात, तिथे ज्ञानी पुरुष आणि ईश्वर हे सदैव झोपलेले असतात. त्यांच्या दृष्टीने संसार नाहीच आहे.

तर ती सुमती जी होती तिचा पुत्र होण्याचं दत्तप्रभुंनी मान्य केलं आणि त्याप्रमाणे तिला पुत्र झाला. श्रीपाद नाव ठेवलं त्या मुलाचं. श्रीपाद वल्लभ मोठे होऊ लागले. १५-१६ वर्षांचे झाल्यावर सहाजिकच आईबापांच्या मनांत मुलाचं लग्न करावं असं आलं. पण श्रीपादवल्लभांनी साफ नकार दिला. मी संन्यास घेणार आहे म्हणून सांगीतलं. पूर्वीची आठवण करुन दिली. 'मी तुझा पुत्र होईन' असं सांगीतलं होतं. पण त्याच वेळी, 'त्याच्या मनाविरुद्ध वागू नका' हेही सांगून ठेवलं होत. तिने क्रम-संन्यास घ्या वगैरे सांगून पाहिलं.

भगवान संन्यास घेणार हे कळल्यावर तिला आपल्या दोन मुलांची आठवण होऊन अतिशय दु:ख झालं. अनेक दिवस तिला त्या मुलांची आठवणही झाली नव्हती. स्वत: भगवान पुत्र होऊन आले. त्यांच्या सान्निध्यामुळे दु;ख वगैरे सर्व विसरली होती ती. पण भगवंताचा वियोग होणार हे कळल्यावर ते संसारातलं सगळं दु;ख आठवलं तिला. भगवंताचे चरण तर अंतरणारच आणि वर त्या दोन मुलांकडे शेवटपर्यंत पहावं लागणार. हे सर्व तिला आठवलं आणि तिने प्रार्थना केली श्रीपादवल्लभांना. त्यांनाही दया आली तिची. त्यांनीही आईची आज्ञा म्हणून, त्यांचं व्यंग दूर केलं आणि त्यांना शास्त्राचं ज्ञानही दिलं. इथे प्रारब्ध वगैरे कांही नाही, म्हणजे ईश्वर प्रारब्ध बदलू शकतो हे जे संत महात्मे सांगतात ते खरं आहे. कुठल्या कर्माचं फळ कधी व किती द्यायचं हे त्याला माहीत आहे. तो शक्तिमान आहे. बरं, नुसती दया नाहीये, दु:ख दिसलं, तर ते दुख: दूर करण्याची पूर्ण शक्ती आहे. 'प्रारब्ध आहे तुझं' असं म्हणाले नाही ते; त्या आईमुळे मुलांचं प्रारब्ध दूर झालं म्हणा किंवा ते संपण्याची वेळ आली होती म्हणा. इथे कर्म कोणाचं आणि फल कोणाला मिळालं! त्या आईच्या सेवेचेच फल त्या मुलांना मिळालं आणि तिलाही मिळालं.

तर या सुमतीमुळे भगवंताचा हा अवतार झालेला आहे. ''परित्राणाय साधुनां,..'' ही जरी प्रतिज्ञा असली आणि तो जरी त्यासाठी अवतार घेत असला तरी त्याला त्याप्रमाणे अवतार घ्यायला लावणं ही जीवाची शक्ती आहे. म्हणून ही सुमती आणि नंतर ती अंबा या दोघींचेही उपकार आहेत आपल्यावर, ज्यांच्यामुळे हे दोन अवतार झाले आणि भक्तांचा उद्धार झालेला आहे.

*******

सुखदु:ख:ही मनुष्याच्या मनावरती अवलंबून आहेत. कर्तव्यकर्म करणं हेच मुख्य सुख आहे. सुख निराळं कशाला मानायचं आहे ! असे विचार शिकवण्याकरता समर्थांचा अवतार मारुतीरायांनी घेतलेला आहे. ते स्वत: ''बुद्धिमतां वरिष्ठम्'' आहेत. त्यांनी जगात येऊन हे सगळं शिकवलं आहे. आपली बुद्धी सांभाळण्याचा प्रयत्न ज्यांनी केला आहे, त्यांना राज्य राखता येऊ शकते, आपल्या बुद्धीकडे दुर्लक्ष करून आणि त्या बुद्धीमध्ये लोभादि विकार उत्पन्न झाल्यानंतर शिवाजी राजांनी मिळवून दिलेलं राज्य पुढे कसं टिकलं असतं?

तेव्हा जास्तीत जास्त या विचारांचा प्रसार होणं महत्वाचं आहे. प्रसार याचा अर्थ बुद्धीमध्ये ते राहिलं पाहिजे. बुद्धीमध्ये असलेले जे काही दोष आहेत ते दूर झाले पाहिजेत. मनावर संस्कार करायचा. मनामध्ये काय काय दोष आहेत, समष्टीच्या मनामध्ये, व्यष्टीच्या मनामध्ये, कोणकोणते दोष आहेत, याचं निरीक्षण करणं आणि ते दोष दूर करण्याचे उपाय काय सांगितले आहेत आचार्य महाराजांनी. ज्याचं मन निर्दोष आहे त्याच्याप्रमाणे आचरण करणं. व्यष्टी आणि समष्टी या योगाने मन हे सुसंस्कृत होऊन जात आहे. आता सगळे दोष मनातले दूर झाले. गुणाधार जर मनामध्ये झाला, असं सुसंकृत मन झालं तर त्या संस्कृत मनाने कार्यसिद्धी होऊ शकते, हे पूर्वीच्या एकंदर मारुतीरायांच्या उदाहरणावरुन आपल्याला दिसून येतं. काही भीती नाही. लंकेत जाऊ शकतो मी. शंभर योजनं विस्तीर्ण समुद्र आहे. एवढ्या पलीकडे जाण्याची कोणत्या वानराची शक्ती आहे? अंगद म्हणाला, ''मी जाईन. पण परत येणार नाही.'' जायचं आणि परत यायचं अशा दोन्ही शक्ती पाहिजेत. हे जातो म्हणाले. गेलेले आहेत. 'मी एकटा आहे, मला सहाय्याला कोणी नाही.' असं नाही म्हणाले.

जाण्याचीही शक्ती आहे, परत येण्याचीही शक्ती आहे. कोण आहे रावण? काही पत्ता नाही. काही माहिती नाही. किती बलाढ्य आहे? किती त्याचं सामर्थ्य आहे, काही माहीत नाही. रामचंद्रांची सीता घेऊन जाणारा म्हणजे तर मोठा असला पाहिजे. काहीही असेल, जाऊन सीतेचा शोध करुन, सीतेचं समाधान करुन आणि ते कार्य करायचं आहे. तर हा जो आत्मविश्वास आहे, आत्मशक्तीच्या संबंधी तो विशेष आहे. ''भगवंताचे अधिष्ठान'' पाहिजे म्हणतात, त्या भगवंताच्या पूर्ण शक्तीशी आपला संबंध जर जोडला जाईल तर ती ईश्वराचीच शक्ती होत आहे. एक जीवात्मा अशा प्रकारचे अलौकिक कार्य करु शकतो.

*******

इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।
विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत ॥ ४.१ ॥

गीतोपदेश चालू असताना भगवान् अर्जुनाला म्हणाले, तुला मी योग सांगतोय तोच मी पूर्वी सुर्याला सांगितला. हा मार्ग नष्ट होण्याची पाळी आली म्हणून पुन्हा तुला सांगतोय.

अर्जुनाला मोह उत्पन्न झाला. विवेक नाहीसा झाला. अर्जुनाने भगवंतांना विचारलं, ''तुमचा जन्म तर अलीकडचा आहे आणि सूर्यनारायण किती पूर्वीपासून आहे. तुम्ही त्याला उपदेश कधी केला?''

परमेश्वराला काल मर्यादा आहे हा मोह आहे. तुमचा जन्म अलीकडचा आहे, पूर्वी तुम्ही नव्हता म्हणजे तुमची शक्तीसुद्धा मर्यादित आहे असे समजून अर्जुन बोलतो आहे. भगवद् गीतेचा उपदेश ऐकण्याची ज्याची योग्यता आहे असा अर्जुन प्रश्न करतोय. समोर दिसणारं भगवंताचं स्वरुप पाहून तो हा प्रश्न विचारतो आहे.

जन्माला आल्यापासून मोहरहित असणं फार महत्वाचं आहे. तशी सत्संगती घडली पाहिजे. आपले पूर्व दुष्कृत आड येऊन उपयोगी नाही. त्रिविक्रमभारतींसारख्या तीन वेदांचा अभ्यास ज्यांनी केला त्यांनाही हा मोह उत्पन्न झाला. दत्तप्रभू, राजाच्या भक्तीभावाप्रमाणे वनांत जात होते. त्याच्या इच्छेप्रमाणे इतरही कुठे जात होते, 'हे संन्यास धर्माला धरून नाही' असा त्रिविक्रमभारतींना भ्रम झाला. नुसता मनामध्ये संदेह उत्पन्न झाला असं नाही तर चार लोकांचा बुद्धीभेद करण्याचा प्रयत्नही त्यांनी चालू केला. दत्तप्रभुंचे आचरण आचरणधर्माला धरुन नाही असं वाटणं म्हणजे ईश्वराला कर्मबंधनही आहे असं मानणं, हा मोह आहे. श्रीकृष्णरुपी परमात्म्याला काल मर्यादा आहे, 'विष्णुमयं जगत्' हे आपण नुसतं ऐकतो, पण त्याप्रमाणे आपली बुद्धी निर्मोह झालेली नाही. ईश्वराला कालमर्यादा नाही, आकारमर्यादा नाही आणि वस्तुपरिच्छेदही नाही. हे तीनही मोह दूर झाले पाहिजेत. तर ईश्वर स्वरुपाचा साक्षात्कार झाला असं समजता येईल. जरी भक्ती, उपासना घडली तरी सुद्धा हा मोह आड येतो. पूर्व प्रारब्ध आहे. त्यामुळे तशी बुद्धी निर्माण होते.

निर्मानमोहा जितसङ्गदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामा: ॥१५.५॥

निर्मोह राहण्याची मूळ शक्ती ईश्वराची फार मोठी आहे. महात्म्यांचे वर्णन करताना भगवान सांगतात. ते मोहरहित झालेले आहेत. त्यांचे निरंतर चिंतन, अभ्यास चाललेला आहे. सगुण, निर्गुण परमात्म्याचे अखंड अनुसंधान त्यांच्या बुद्धीमध्ये आहे. त्यामुळे ते निवृत्तकाम आहेत. ईश्वराच्या शक्तीची पूर्ण जाणीव आहे असे महात्मे, माझ्याजवळ येतात. ईश्वरापेक्षा मी वेगळा नाही, हे ज्ञान अनेक जन्मांच्या अभ्यासाने होतं. मोहरहित स्थिती प्राप्त होते. अर्जुनाला निमित्त करून भगवान ही जाणीव करून देताहेत. तरीही मोह जात नाही. आपण जीवनमुक्त सच्चिदानंदघन आहोत अशी अवस्था प्राप्त करून घेणं किती कठीण आहे !

*******

'दु:खेष्वनुद्विग्नमना: सुखेषु विगतस्पृह:।'

हे मोठं लक्षण स्थितप्रज्ञाच्या लक्षणांमध्ये घातलेलं आहे. सुखं येतील पुष्कळ पण स्पृहा नाही. ''सुखेषु विगतस्पृह:'' हे सुद्धा मुद्दाम सांगितलेलं आहे.

ती मनाची भूमिका असणारे महात्मे जगामध्ये झालेले आहेत. रामरायांना सुद्धा बोलून दाखवावं लागलं -रामांचा त्याग जास्ती की भरताचा त्याग जास्ती आहे? कोणाचा त्याग जास्ती आहे? मिळालेलं राज्य ज्याने देऊन टाकलेलं आहे, रामांना अजून राज्य मिळायचं होतं. राज्याभिषेक व्हायचा होता. इतक्यात आज्ञा झाली - वनामध्ये चौदा वर्षे जायचं आहे. निघाले राम!

वसिष्ठ महर्षी म्हणतात, काय मनोवृत्ती आहे! अभिषेकाला बोलावणं पाठवलं तरीसुद्धा मनामध्ये काही नाही. हर्ष नाही. कोणताही विकार नाही. हर्ष हाही एक विकार आहे. वनात जायचे तरीही तयारी आहे. काही विचारलं नाही. सगळे अलंकार उतरवून दिलेले आहेत. अंगावरची वस्त्रेही काढून ठेवली. इतका मोठा त्याग केलेला आहे तरीसुद्धा राम म्हणतात माझ्यापेक्षा भरताचा त्याग मोठा आहे.

मिळालेलं राज्य जे आहे, आईनं मिळवून ठेवलेलं आहे, पित्याची अनुज्ञा मिळालेली आहे. पण याला काही चौदा वर्षांची अट नव्हती. वनवासाला चौदा वर्षांची अट घातलेली होती. म्हणजे कायमचं राज्य भरताकडे होतं. पण त्याने ते सोडून दिलं. हे नेतृत्व आहे. रामचंद्रांच्या नेतृत्वाचा हा प्रभाव आहे.

आणि दुसरं उदाहरण दुर्योधनाचं आहे. कपटाने जिंकून राज्य घेतलं. तरी वनवासामध्ये पांडव गेलेले आहेत. अज्ञातवासासारखी भयंकर अट त्याने घातलेली होती.

परंतु सज्जनांचं जे काही महत्व आहे ते महत्व दुर्जनांनासुद्धा मान्य करावं लागतं. अज्ञातवासामध्ये पांडव अज्ञात राहू शकणार नाहीत. खात्री आहे कौरवांना. त्यांना आपण केव्हांच शोधून काढू किंवा ते प्रगट होतील, त्यांच्या गुणांनी ! म्हणजे पांडव गुणी आहेत याला मान्यता दिल्यासारखं आहे. अज्ञातवासाची अट घालणं म्हणजे पांडवांचे गुण मान्य करण्यासारखं आहे.

तेरा वर्षे राज्य ताब्यामध्ये आहे. सगळी सत्ता आहे. त्याचप्रमाणे सगळा खजिना आहे. सैन्य आहे. सगळं आहे. तरी कबूल केल्याप्रमाणे आणखी बारा वर्षे वनवास झाला. अज्ञातवास झाला. कबूल केल्याप्रमाणे द्यायला पाहिजे राज्य, एकच गाव दिलं तरी पुरे आहे म्हणाले धर्मराज. दुर्योधन म्हणाला, युद्ध केल्याशिवाय काहीही मिळणार नाही. तर ही स्थिती आहे. भरतानेही राज्य घेतलं. राज्य केलं. दुर्योधनानेही राज्य घेतलं पण घेतानाच ते कपटाने घेतलं आणि देताना युद्ध करुन, सर्वनाश करुन दिलेलं आहे. स्वत:चाही !

तेव्हां कोणती बुद्धी चांगली आहे? व्यवहारामध्ये असं वागलं पाहिजे. आरंभाला जरी दु:ख झालं तरी सुद्धा सात्विक प्रयत्नशील महात्मा, जीवात्मा हा शेवटी सुखी होतो आहे आणि सुखंदु:खंही शेवटी मनुष्याच्या मनावरती अवलंबून आहेत. कर्तव्यकर्म करणं हेच सुख आहे. सुख निराळं कशाला मानायचं!

*******

प्रत्येकाने आपली बुद्धी सात्विक बनवायची आहे. सात्विक याचा अर्थ, म्हणजे काही पूर्ण शांती, पूर्ण अहिंसा असा त्याचा अर्थ नाहीये. पूर्ण अहिंसा कोणीही करु शकत नाही. पूर्ण झालेला, ईश्वरस्वरुप झालेला जो आहे त्यालाच फक्त पूर्ण अहिंसा माहिती आहे.

द्रोणाचार्य अनावर झाले. पांडवांचा विनाश होण्याची पाळी आली. श्रीकृष्णाने भीमाला सांगून 'अश्वत्थामा 'मेला' म्हणून सगळीकडे धून उठविली आहे. द्रोणाचार्यांच्या कानामध्ये हे जावं आणि त्यांचा युद्धाचा आवेश काही कमी व्हावा असा त्याचा उद्देश आहे. द्रोणाचार्यांना ते समजलं. हे शक्य नाही. अश्वत्थामा मारला कसा जाईल? इतकी अस्त्रविद्या त्याला दिली. हा कसा गेला? धर्मराज कुठे आहेत? अजातशत्रू धर्मराज आहे. जरी कौरवांचे सेनापती द्रोणाचार्य होते तरी द्रोणाचार्यांचा विश्वास धर्मराजांवर आहे. धर्मराजांनी जर सांगितलं, अश्वत्थामा मेला तर शस्त्रसंन्यास करावयाचा.

गोपाळकृष्णांनी धर्मराजाला विचारलं, 'काय सांगणार, बाबा, तू आता? द्रोणाचार्यांनी जर तुला विचारलं की अश्वत्थामा मेला हे खरं आहे काय, तर तू काय सांगणार?' तो म्हणाला, 'काय खरं असेल ते मी सांगणार. हत्ती मारलेला आहे.'

'मग इथं कशाला आलास? बारा वर्षे नाही, तिथं वनातच रहायचं होतं! तू जर सांगितलंस की अश्वत्थामा जिवंत आहे व हत्ती मारलेला आहे तर हा म्हातारा इतका संतापून उठेल की तुम्हा पांडवांपैकी कोणीही जिवंत राहणार नाही. तेव्हा सांगण्यासारखं हे सत्य आहे काय? सत्य म्हणजे भूतहित आहे. ''सत्यं भूतहितं प्रोक्तं'' म्हणतात. तेव्हां सत्याचं पालन पूर्णव्रत ज्याला म्हणतात ते महानव्रत - तुला करता येणार नाही. म्हणजे सत्य सर्वथा सोडून द्यावं असं नाही. सत्याचाही अभ्यास व्यवहारातल्या सगळ्याही अपूर्ण जीवांनी करायचा आहे पण अल्पव्रत म्हणून करायचा आहे. निदान शिबिराला गेलं, मंदिरात गेलं म्हणजे तिथे असेपर्यंत खोटं बोलणार नाही एवढं तरी व्रत पाळावं.

सत्याचं पालन पूर्ण होऊ शकत नाही. पूर्ण अहिंसेचं पालन पूर्ण होऊ शकत नाही, आणि काही तरी मनाचा गोंधळ झाल्यामुळे सगळ्या समाजामध्ये वाताहात होऊन जाते. म्हणून व्यवहार व्यवस्थित रीतीने आपल्याला करता आला पाहिजे. सामाजिक प्रपंचामध्येसुद्धा आपली बुद्धी कशी स्थिर राहिली पाहिजे. व्यवस्थित राहिली पाहिजे.

साधनचतुष्टय संपत्ती म्हणून जी सांगितलेली आहेत शास्त्राने - विवेक, वैराग्य इत्यादी ही सगळी साधनं ज्यांच्याजवळ आहेत त्यांनी वेदांताचा विचार करावा आणि आपली उन्नती करुन घ्यावी. पूर्ण तत्त्व जे आहे त्या पूर्ण तत्त्वापर्यंत जाण्याचा प्रयत्न करणाऱ्याला तो मार्ग मोकळा आहे. त्याला व्यवहारातूनही शास्त्राने मोकळीक दिलेली आहे. परंतु सर्वसामान्य जीवांची अवस्था तशी नाही. संसारात राहूनच सगळं करायचं आहे. द्वैतातूनच अद्वैताकडे जायचं आहे. द्वैतात राहूनच आणखी आपली बुद्धी सात्विक बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दैवी संपत्ती ज्याला म्हणतात ते सगळेही गुण सात्विक बुद्धीमध्ये येऊ शकतात.

*******

श्रीपादवल्लभ कुरवपूर क्षेत्रात अदृश्य झाल्यानंतरची एक कथा सिद्धांनी नामधारकाला सांगितली. एक ब्राह्मण व्यापारी श्रीपादवल्लभांचा भक्त होता. त्याने व्यापार करताना असा संकल्प केला की जर श्रीपादवल्लभांच्या कृपेने मला जर चांगला फायदा झाला तर मी कुरवपूर क्षेत्रात येऊन एक हजार मंडळींना अन्नदान करीन. ईश्वराची प्रार्थना करून, संकल्प करून तो उद्योगाला लागला. त्याने प्रयत्न केले आणि त्याला पुष्कळ फायदाही झाला. मग आपल्या संकल्पाप्रमाणे पुष्कळ द्रव्य घेऊन तो कुरवपूरला यायला निघाला. तिथे जाऊन श्रीपादांना नैवेद्य करून अन्नदान करायचं असं त्याने ठरवलं.

ही बातमी काही चोरांना समजली. ते ह्याच्याजवळ येऊन म्हणाले, ''आम्हीही श्रीपादांचे भक्त आहोत. आम्हीसुद्धा कुरवपूरला यात्रेला जात असतो. आम्ही तुमच्या बरोबर येतो.'' ह्याने विचार केला प्रवासात बरी सोबत मिळेल यांची. घेऊया बरोबर. निघाले ते. ह्याने त्यांच्यावर विश्वास ठेवला. वाटेत एका अरण्यात त्या चोरांनी त्या ब्राह्मणाला ठार मारले आणि त्याचं सगळं द्रव्य घेऊन ते निघून जाऊ लागले.

ब्राह्मणाचा संकल्प होता कुरवरपुरमध्ये जाऊन अन्नदान करायचं. चांगल्या किंवा वाईट कोणत्याही वासना निर्माणच होऊ नयेत म्हणून प्रयत्न केला पाहिजे. पण समजा त्या झाल्याच तर निदान त्या दृढ होऊ नयेत ह्यासाठी तरी प्रयत्न केला पाहिजे. या ब्राह्मणाची सद्वासना पक्की झालेली आहे. त्याला जेव्हां चोरांनी मारलं तेव्हां 'आपला नवस काही पूर्ण आता होणार नाही' याचं त्याला वाईट वाटलं असणार.

तर त्या चोरांनी ह्याला मारल्यावर भगवान श्रीपादवल्लभ एकदम त्या ठिकाणी प्रगट झाले. चोरांना ह्यांची काहीच कल्पना नव्हती. आपल्याला कोण प्रतिबंध करणार असं वाटलं त्यांना. पण हातात त्रिशूळ, चक्र वगैरे आयुधे घेतलेले श्रीपाद आहेत त्यांनी त्या चोरांना मारलं. श्रीपादांच्या हातून मरण आल्याने चोरही मुक्त झाले. जिवंत राहिले असते तर हेच पाप करीत बसले असते. त्या चोरांपैकी एक जण विचारी होता. तो श्रीपादांना म्हणाला, मी जरी या चोरांबरोबर आलो तरी मला हे त्या ब्राह्मणाला मारतील याची कल्पना नव्हती. यांच्याबरोबर आल्याचा मला पश्चाताप होतोय पण आपण मला क्षमा करा.

श्रीपादांनी त्याला क्षमा करून सांगितलं, 'त्या ब्राह्मणाचे तुटलेलं मस्तक पुन्हा धडाला जोड आणि त्याच्यावर हे भस्म टाक.' त्या चोराने त्याप्रमाणे केल्यावर तो मृत ब्राह्मण पुन्हा जिवंत झाला. आणि श्रीपादवल्लभ अदृष्य झाले. मग त्या चोराने त्या ब्राह्मणाला सर्व घडलेली हकीकत सांगितली. आणि तो त्या ब्राह्मणाबरोबर कुरवपूरला आला. त्या ब्राह्मणाने महाराजांची पूजा केली. पुष्कळ अन्नदान झालं. त्या व्यापाऱ्याने काही देवाला संरक्षणाला बोलावलं नाही. त्याने फक्त फायदा झाला तर श्रीपादांच्या क्षेत्रात जाऊन अन्न संतर्पण करण्याचा संकल्प केला. पण ते सर्वही कार्य आपलंच आहे असं समजून देवाने त्याला पुन्हा जिवंत केला. चोरांना मारलं. त्याचा संकल्प त्याच जन्मात पूर्ण करून घेतला. पुढचा जन्म कशाला?

*******

रसज्ञा वशा तारकं स्वादु लभ्यं गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ।
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥

मनुष्यजन्म प्राप्त झाल्यानंतर भगवंताचं नामस्मरण घडलं पाहिजे आणि ते घडलं नाही या अपराधाची आपण क्षमा करावी अशी प्रार्थना महाराज या स्तोत्रामध्ये करताहेत.

वाणीने नामस्मरण करता येतं. मनाचा निश्चय असेल तर ते अखंडही करता येतं. सर्व संत महात्म्यांनी अखंड नामस्मरण करुनच आपला दुरितक्षय करुन घेऊन ते मुक्त झाले.

कर्म करायचं आणि जन्माला यायचं. त्यातून तारणारं हे नाम आहे. म्हणजे त्यात किती सामर्थ्य आहे हे सांगितलं महाराजांनी. दुसरं महत्व सांगितलं की ते स्वादु आहे. अत्यंत मधुर आणि हितकर आहे. परीक्षितराजाच्या उदाहरणावरून आपल्याला हे समजून येते. राजा निराश झाला होता. पण भगवंताची योजना अशी की शुकाचार्य आपण होऊन त्याच्याकडे आले आणि संपूर्ण भागवत त्यांनी राजाला सांगितलं.

ते चरित्र अमृतासारखं आहे या भूमिकेतून राजाने ऐकल्यामुळे त्याचा प्राणमयकोषाचा अध्यास दूर झाला. ज्या वेळेला प्राणमयकोषापासून मी वेगळा आहे असं जेव्हां जीवाला समजतं त्यावेळी तहान, भूकेचा संबंध सुटतो. आपल्याला आपण पंचकोषांपेक्षा वेगळे आहोत हे खरं ज्ञान झालं तर सुखदु;खाचा संबंध दूर होतो.

नामाचं तिसरं महात्म्य महाराज सांगतात की ते 'लभ्य' आहे. कोण सांगणार आम्हाला नाम? नाम कुणीतरी सांगितलं पाहिजे, त्याचा उपदेश केला पाहिजे. भगवंताने विश्व निर्माण केलं आणि सर्व जीवांच्या कल्याणाकरता कृतकृत्य झालेल्या महात्म्यांना 'जीवांचा उद्धार' करण्याची प्रेरणा दिली. 'गुरु कर्णधारम्' म्हटलं आहे.

महात्मे आहेत जगामध्ये. ईश्वराच्या प्रेरणेने सांगताहेत. इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष त्यांनी जरी सांगितलं नाही तरीसुद्धा ते नाम मिळतं. कबीरांची कथा सांगतात. रामानंदांकडे जाऊन कबीरांनी नामाचा उपदेश करण्याची प्रार्थना केली. रामानंद म्हणाले, ''तू मुसलमान आहेस तुला काही मी नाव सांगू शकत नाही.'' कबीर बिचारे निराश होऊन घाटावर तसेच बसले. काय करणार? एवढ्यात रामानंद घाटावर स्नानाला जातांना कबीरांना त्यांचा पाय लागला. रामानंदांच्या तोंडातून ''राम, राम'' बाहेर पडले. झालं. कबीरांनी तोच उपदेश मानला आणि नाम घेण्यास सुरुवात केली. म्हणजे नाम सांगितलंच पाहिजे असं नाही. ते अशा तऱ्हेने जरी 'लभ्यं' झालं तरी ते घेणाऱ्या जीवाचा उद्धार होतो.

वाल्मिकी महर्षींची अवस्था याही पूर्वीची होती. सुरवातीला ते वाटमारी करणारे कोळी होते. पण महात्मे भेटले, उपदेश केला आणि त्यांना पश्चाताप झाला. पण त्यांना रामराम म्हणताच येईना. त्यांच्या हातून इतकं पाप, इतक्या हत्या घडल्या होत्या की ते मरामराच म्हणायला लागले. परंतु श्रद्धा आहे. गुरुमहाराजांनी सांगितलेल्या मंत्राचा जप मरा, मरा उलटा जरी झाला तरी त्याचं पर्यवसान राम, राम म्हणण्यात झालं. असं हे लभ्य आहे. कुठून तरी मिळतं नाम आणि कल्याण होऊन जातं. हे नामाचं महत्त्व महाराजांनी दाखवलं आहे.

*******

या पुण्यामध्येच पेशव्यांच्या काळात शाळीग्राम शास्त्री म्हणून होऊन गेले असं सांगतात. मोठे पंडीत होते. त्यांच्यासमोर कोणीही वादविवादास जात नसे. पण त्यांना तळमळ लागली होती की, आचार्य महाराजांचं भाष्य आपल्याला कोणाच्यातरी मुखातून ऐकायला मिळावं. आचार्य महाराजाचं थोडं तरी भाष्य आपल्या कानावर पडलं पाहिजे. सर्व पंडितांकडे गेले ते. पण त्या सर्वांनी सांगितलं, ''तुम्ही एवढे ज्ञानी, तुम्हाला आम्ही काय सांगणार''

तळमळ लागलेली. कसं समजेल आपल्याला आचार्यांचं भाष्य? अन्न नाही, पाणी नाही. एका मंदिरात गेले असता तिथे एक संन्यासी बसले होते. यांना पाहताच संन्यासी म्हणाले, ''या शास्त्रीबुवा! तुम्हाला आचार्यांचं भाष्य ऐकायचंय का? रोज सकाळी या.''

शाळीग्राम शास्त्री दुसऱ्या दिवशी सकाळी आले. त्या संन्यासी महाराजांनी भाष्य सांगायला सुरुवात केली. ऐकणाऱ्याला वाटायचं, हा कोणी ब्रह्मलोक वगैरे कोणता लोक पाहूनच आलेला महात्मा असावा. त्यांनी आधीच सांगून ठेवलं होतं की त्यांना घरी भिक्षेला वगैरे यायचा आग्रह करायचा नाही. ते भिक्षेला येणार नाहीत. शाळीग्राम स्वत: उत्तम पंडीत होते. त्यांचा अभ्यास तयार होता. जिथे जिथे अडले होते, ते संन्यासी महाराजांना विचारून घेतलं. त्यांनीही उत्तमप्रकारे समजावून सांगितलं. सगळे संशय दूर केले. योग्य व्यक्तींकडून आचार्यांचे भाष्य ऐकायला मिळालं, त्याने शास्त्रीबुवांचं चित्त शांत झालं. भाष्य निरूपण संपल्यावर त्यांनी प्रार्थना केली, ''महाराज! आमच्या घरी आपण भिक्षेला आलं पाहिजे.'' स्वामी महाराज म्हणाले, ''तुम्हाला अगोदरच सांगितलं होतं. आम्हाला भिक्षेला वगैरे बोलवायचं नाही.'' ''चला पुढे. येतो आम्ही.'' असे स्वामी महाराज म्हणाले. शास्त्रीबुवा पुढे निघाले आणि काही मिनिटांनी स्वामी महाराज येताहेत की नाही पाहायला मागे वळून पाहतात तो काय, काही नाही. स्वामी महाराज गुप्त झाले होते. इकडे तिकडे शोध केला, पण ते सापडले नाहीत. शास्त्रीबुवांना फार वाईट वाटलं. शास्त्रीबुवांना इतकं वाईट वाटलं की, त्यांनी त्या दिवशी अन्नपाणी घेतलं नाही. रात्री त्यांना संन्यासी स्वामी महाराजांनी दृष्टांत देऊन म्हटलं, ''शास्त्रीबुवा! हा भलता आग्रह का धरता? तुम्हाला कोणी भाष्य सांगितलं असं वाटतं? भाष्य ज्यांनी लिहिलं, त्यांनीच भाष्य सांगितलं. हा आग्रह नको भिक्षेबिक्षेचा.''

म्हणजे तळमळ जर मनामध्ये उत्पन्न झाली, तर साक्षात्कार होऊ शकतो, इच्छा पूर्ण होऊ शकते.

*******

ज्यांच्या सर्व वासनांची समाप्ती झालेली आहे अशा महात्म्यांकडे पूर्ण वैराग्य आहे. भगवंताची पूर्ण कृपा आहे. त्यामुळे प्रारब्धाची आडकाठी येऊ शकत नाही. भगवान गोपालकृष्णांनी उपदेश करतांना सांगितलं उद्धवजींना, संन्यासी पुरुषांनी पृथ्वीवर नेहमी फिरत राहिलं पाहिजे. कोणत्याही गावामध्ये एका रात्रीशिवाय जास्त मुक्काम करायचा नाही. ज्यांचं प्रारब्ध असेल ते आपोआप तिथे येतात जिज्ञासेने शंका विचारतात. सद्‌बुद्धीनं विचारल्यावर त्यांना सन्मार्गदर्शन करायचं. ज्याप्रमाणे श्रद्धा असेल त्याप्रमाणे आचरण केलं तर कल्याण होईल. ते कार्य झालं की निघाले दुसरीकडे. पुन्हा काही संबंध नाही. तर सर्वही समाजाचं कल्याण करण्याकरता सर्वत्र त्यांनी प्रवास केला पाहिजे. हे संन्याशाला मुद्दाम सांगितलं आहे. पण जास्ती कुठं थांबायचं नाही. कुणाच्याही घरात म्हणा, मंदिरात म्हणा, एक रात्र रहायचं, स्वामी दुसऱ्या दिवशी गेले दुसरीकडे, कुठं राहिले, कुठं गेले काही पत्ता नाही, असं व्हायला पाहिजे. संचाराच्या योगाने आणखी अनेक लोकांना सन्मार्गदर्शन घडतं. म्हणजे संन्यास सर्वांना उपकारक आश्रम आहे. गृहस्थाश्रम उपकारक म्हणून कालीदासांनी वर्णन केलेला आहे. परंतु खरा उपकारक म्हणजे संन्यासाश्रम आहे. पूर्ण योग्यता आणखी मनाची, इंद्रियांची, संयमाने निर्माण करून मनातल्या सगळ्याही वासना घालवून भगवंताची उपासना अखंड चालू आहे आणि समाधी सिद्धी ईश्वर प्रसादाने प्राप्त करुन देऊन आणि सर्व लोकांचा उद्धार करताहेत.

सारखा जगाचा प्रवाह नित्य मानणारे लोक आहेत. परंतु जगाचा नाश होतो. तर हे ज्ञान 'वासुदेव सर्व' ज्ञान झाल्यानंतर सबंध जग संपलेलं आहे. जगाचा नाश झाला. अज्ञानही गेलं. पुढची व्यवस्था सांगतात आचार्य महाराज. पूर्वी झालेली कर्म ही अनंत जन्मांमध्ये झालेली आहेत. ही सगळी संपून जातात. पूर्वी केलेल्या कर्मांचा आणखी नाश होतो. ब्रह्मसाक्षात्काराने पूर्वीची संचित कर्मं नष्ट झालेली आहेत. क्रियमाण कर्मांचा संबंध नाही. निर्वासन अंत:करण, भगवत परायण अंत:करण झालेलं आहे. साक्षात्कार झालेला आहे त्या अंत:करणाला त्या ठिकाणी कर्माचा संबंध असू शकेल का?

वैराग्य संपन्न असणार आहेत, त्यांना ब्रह्मलोक सुद्धा नको, काही नको. राजसूय यज्ञ ब्रह्मलोक मिळवण्याकरता म्हणून धर्मराजांनी केला असं सांगतात. पुनरावृत्ती नाही हा फायदा असेल तिथे, ब्रह्मदेव असेपर्यंत तिथे थांबा म्हणाले. लगेच मुक्ती नाहीये. तर त्या दृष्टीने ब्रह्मलोक सुद्धा आम्हांला नको, काही नको, इतकी वैराग्य भावना, इतकी निर्वासनावस्था मनाची संपादन करणारे महात्मे शेवटी जीवनमुक्त स्थितीतूनही देहमुक्त होतात. देहत्याग त्यांचा होतो. कर्म संपल्याशिवाय जन्म थांबणार नाही.

*******

भगवान सांगतात, ''मनामध्ये कोणतीही वासना न राहणं ही भूमिका तयार झाल्याशिवाय श्रवण नाही.'' ही भूमिका तयार होण्याकरता पूर्वांग, आणि उत्तरांग त्यांनी सांगितलं आहे. तीव्र वैराग्य ज्याला म्हणतात ते पूर्वांग आहे. साधन संपत्तीमध्ये उपरती म्हणून एक आहे. शास्त्रज्ञ, उपरती शब्दाचे दोन अर्थ करतात. व्यवहारातलं लक्ष पूर्णपणे बाजूला झालं पाहिजे. काहीही व्यवहार मनामध्ये राहून उपयोगच नाही.

भागवतामध्ये एक कथा आलेली आहे. रहूगण राजाला जडभरत उपदेश करताहेत. राजाच्या शिपायांनी जडभरतांना धरून आणलं. त्यांच्या खांद्यावर पालखी दिली तरी मानापमान काही नाही. पण नंतर जडभरतांचं खरं ज्ञान किती आहे, केवढा ज्ञानी महात्मा आहे हे कळल्यानंतर तो रहूगण राजा त्यांना शरण आलेला आहे. आणि त्यांनीही राजाला उपदेश केला. त्यावेळी त्या रहूगण राजाने एक प्रश्न विचारला आहे. ''व्यवहारापासून निवृत्त व्हायचं, संसार सोडून द्यायचा असं म्हणता, पण संसार खोटा आहे असं कुठाय? संसार खराच आहे की! कारण खोटा असेल तर सोडून द्यायचा. संसार असल्यावर संसार संबंध आहे'' त्यांनी उदाहरण दिलेलं आहे, चुलीवर खाली लाकडं पेटलेली आहेत. पातेल्यामध्ये पाणी आहे. तर लाकडं पेटल्यानंतर ते पातेलं तापलं आणि पाणीही तापलं. त्यात तांदूळ घातल्यानंतर तांदूळही शिजून भात तयार झाला. दिसणं खरंच आहे की, त्याप्रमाणे देह, इंद्रिय, प्राण, स्थूल शरीर, सूक्ष्म शरीर सर्वांशी संबंध ठेवणारा आत्मा, त्याला संसार नाही. सुखदु;ख नाही, असं समजायचं कसं?

जडभरतांनी स्पष्टपणे उत्तर दिलेलं आहे, ''जे दृष्टीला स्पष्ट दिसतंय ते खरं आहे असं गृहित धरून तू प्रश्न विचारलेला आहेस. तू प्रश्न केलेला आहेस, कारण तुला हा संसार खरासा वाटतो. तुला ज्ञान होणार नाही. जोपर्यंत तुझ्या मनामध्ये संसाराबद्दलची सत्यत्व बुद्धी आहे तोपर्यंत तुला ज्ञान होणार नाही. केवळ अध्ययनाने ज्ञान होतं नाही. महात्मे जे आहेत, त्या महात्म्यांना शरण गेल्याशिवाय ज्ञान होत नाही म्हणाले.

*******

अर्जुनाला विश्वरुप दिसावं असं वाटत होतं. श्रीकृष्णांना तो 'विश्वरुप दाखवा' असं म्हणाला. तशी व्यवस्था करून दिली त्यांनी. साध्या चक्षुंनी पाहता येणार नाही म्हणून दिव्य चक्षू दिले. पण ते विश्वरूप प्रकट झाल्यावर, 'नको, नको' म्हणाला. भगवान म्हणतात, 'मी प्रसन्न झालो म्हणून तुला हे विश्वरूप दिसलं.' प्रसन्न या शब्दाचा अर्थ, 'भक्ताची इच्छा पूर्ण व्हावी असा ईश्वराचा संकल्प होणं,'असा आचार्यमहाराजांनी केला आहे. त्या संकल्प शक्तीने अर्जुन ते रूप पाहू शकला. पण ते तेज सहन न होऊन त्याने नको म्हणताच ते रूप अदृष्य झालं. ही ईश्वराची लीला आहे. अर्जुन आणि श्रीकृष्ण हे नरनारायणाचे अवतार आहेत. पण दोन असले तरी एकच आहेत.

आपण तरी निराळे कुठे आहोत? पण आपला निराळेपणांचाच जास्त अभ्यास आहे आणि तेच अज्ञान आहे. हे अज्ञान कमी व्हावं अशी तळमळ लागली पाहिजे. देवाची कृपा केव्हा होईल अशी सारखी वाट पहाणं ही तळमळ आहे.

देवाची कृपा व्हावी ही तळमळ मनामध्ये असणं महत्वाचं आहे आणि आपण केलेल्या कर्मांचं फळ भोगलंच पाहिजे. मनामध्ये उत्पन्न होणारे निरनिराळे विकार जाण्यासाठी वेगवेगळे उपाय आहेत. त्यांचा अभ्यास तरी किती करणार? सगळी कारणं योगशास्त्रकारांनी सांगितलेली आहेत.

दयाभाव उत्पन्न झाला म्हणजे मनांमध्ये क्रोधादी विकार हळुहळू दूर होतात आणि दयाभावाचा अभ्यास करायचा म्हणजे कसा करायचा? ती कोणी तरी दिली पाहिजे. दया करावी म्हणून होत नाही. पुष्कळ दुःख पहातो आपण. आपल्या दयेचा काय उपयोग? आपण ते दुःख दूर करू शकतो का?

द्रौपदीला, अश्वत्थाम्याच्या आईला दुःख होईल, या भावनेने त्याची दया आली आणि तिने त्याला जीवदान दिलं. त्यामुळे धर्मराजसुद्धा संतुष्ट झाले. 'दुःशासनाला शासन झालं पाहिजे' असंही म्हणत होती. पण भक्ती करीत राहीली आणि शेवटी त्या भक्तीचं फळ मिळालं ना! 'अश्वत्थाम्याला सोडून दिलं पाहिजे', असा तिने आग्रह धरल्यावर पांडवांना त्याला सोडून द्यावं लागतं आणि ते सगळं न्याय्य, योग्य ठरलं आहे. ज्याला परिपाक म्हणतात तो परिपाक व्हावा लागतो म्हणजे लोणचं मुरावं लागतं ना! स्वाद यायला थोडा वेळ लागतो. परिपाक होत असतो. तो कसा होतो, काय होतो, आपल्याला कसं कळणार? अतींद्रिय आहे ना सगळं ! इंद्रियांशी संबंध नाही, तिथे बुद्धीचा कुठं संबंध येणार? विद्यारण्य स्वामींच्या प्रार्थनेमध्ये सगळं आलेलं आहे. 'ज्ञानरूप आहे, सर्वव्यापक परमेश्वर आहे, असा अनुभव मला यावा' इत्यादि सगळ्या संतांची, सत्पुरुषांचीच प्रार्थना आहे त्यात. प्रार्थना तळमळीने चालू ठेवायची. त्या संस्कारांचा परिपाक होत असतो.

*******

सगळे प्रतिबंध दूर करण्याचं सामर्थ्य ईश्वरभक्तीमध्ये आहे. ही ईश्वरभक्ती निर्माण झाली पाहिजे. म्हणजे पूर्ण विश्वास ईश्वरशक्तीवर पाहिजे. आपल्या बुद्धीला प्रेरणा करणारी ईश्वरशक्ती आहे, ही भावना झाली पाहिजे. ही भावना म्हणजेच ईश्वरार्पण बुद्धी आहे. 'मी काहीही केलं नाही, करत नाही किंवा करु शकत नाही.' ही जाणीव निर्माण झाली म्हणजे जे कर्म होईल ते शुद्ध कर्म आहे.

भगवान गोपालकृष्ण उद्धवजींना उपदेश करताना हेच सांगतात, 'शुद्ध कर्म कोणचं? मला अर्पण झालेलं कर्म शुद्ध आहे' अर्पण झालेलं याचा अर्थ, 'स्वत: मी करतो आहे', हे ज्यांनी सोडून दिलेलं आहे. कर्तृत्वबुद्धी दूर होणं ही ईश्वरार्पण बुद्धी आहे. ही ईश्वरार्पण बुद्धी उत्पन्न व्हावी म्हणजे त्याच्या योगाने जे जे काही पुण्यकर्म वगैरे घडतं ते सर्वही प्रतिबंधरहित होतं, सर्व प्रतिबंध दूर होतात. हे सहाय्य आहे ईश्वराचं. मुख्य म्हणजे खरा अहं, शुद्ध अहं, तिथे सापडतो. केवळ प्रयत्नांनी आपली बुद्धी आपल्याला स्थिर करणं शक्य नाही. ध्यानाचा अभ्यास झाला म्हणजे स्थिरता प्राप्त होते. साधना आहे, सगळं आहे. पण ध्यानाचा अभ्यास व्हायला पाहिजे ना ! अनेक विचार आहेत मनामध्ये. मनाचा स्वभावच आहे की नेहमी विचारामध्ये एक विचार, दुसरा विचार, अनंत विचार आहेत. अनंत वृत्ती मनाच्या आहेत. त्या सगळ्या वृत्ती कशा बंद व्हायच्या आपल्या प्रयत्नांनी? म्हणून त्या सर्वही वृत्ती कमी कमी होताना पूर्ण वृत्तीरहित मन, शुद्ध स्थिर मन ज्यावेळेला होईल त्यावेळेला खरं ध्यान लागेल आणि विषयाचा आणि मनाचा संबंध त्यावेळेला तुटेल.

हे सनतकुमारांनी ब्रह्मदेवांना विचारलेलं आहे. काय करावं म्हणाले, मन जातं इंद्रियांच्याकडे. पुन्हा विषयांचा संबंध आला की पुन्हा ते संस्कार होतात. खरं सुख जे आहे ते सापडत नाही. बुद्धीने, मनाने पुन्हा पुन्हा विषयांकडे जाणं, विषय मनामध्ये येणं हे बाजूला कसं करायचं? ब्रह्मदेवांनासुद्धा काय उत्तर द्यावं ते कळेना. भगवंतांनी त्यांना उपदेश केला, मन आणि विषय सगळे जे पदार्थ आहेत ह्याचा आधार कोण आहे म्हणाले. कुठे उत्पन्न झालेलं आहे सगळं, तिकडे त्याचं ध्यान सुरु झालं पाहिजे आणि ते ध्यान जितकं अधिकाधिक होत जाईल, तितकं बाहेरच्या विषयांपासून मन बाजूला होईल. विषयाचा आणि मनाचा वियोग हा त्यावेळेला घडतो. ध्यानाभ्यास हा त्यांनी मुख्य सांगितलेला आहे.

*******